brown
book

THE BOOK WAS DRENCHED

संगीत

स्थानिक-स्वराज्य

अथवा

सचित्र म्युनिसिपालिटी नाटक

लेखक

श्रीयुत माधव नारायण जोशी,

संगीत 'विनोद', 'आनंद', 'अळाची गाय' व 'सत्त्वसाफल्य'
इत्यादि नाटकाचे कर्ते.

प्रथमावृत्ति-१९२५

किंमत १२ आणे

प्रकाशक
अनंत सखाराम गोखले,
५७० शनवार, पुणें.

याच ग्रंथकाराचें
नवीन नाटक

अल्लाची गाय!

आनंदविलास नाटक मंडळीचे
फोटोंसह
लवकरच तयार होईल.

मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पु

प्रस्तावना.

मराठी रंगभूमीच्या आश्रयदात्यांच्या आज कित्येक वर्षें चांगले परिचयाचे झालेले नाटककर्ते रा० रा० माधव नारायण जोशी, हे पुनः एकवार आपल्या रसिक आणि मार्मिक श्रोतृवृंदापुढें आपली नवी कृति मांडीत आहेत. हल्लीं आपणांस स्वराज्याचे सर्व अधिकार मिळाले पाहिजे आहेत, इतकेंच नाहीं तर ते यापूर्वींच कित्येक वर्षे मिळावयास पाहिजे होते, अशी सर्वतोमुखीं मागणी सुरू आहे. अशा वेळीं स्थानिक स्वराज्याचा जो अल्पस्वल्प अधिकार आज चाळीस वर्षें मिळाला आहे त्याचीं कामें आपण कितपत नेकीनें आणि हुषारीनें पार पाडीत आहों, तें आपलें आपणांस कळावें, म्हणून रा० जोशी यांनीं आपणांपुढें हा एक आरसा मांडिला आहे. अर्थात् त्यांचा हेतु स्तुत्य आहे यांत संशय नाहीं. आतां स्वराज्याच्या अधिकाराची पात्रता आपल्या म्युनसिपालिट्या आणि लोकलबोर्डें यांच्या चोखपणावरच केवळ ठरविली पाहिजे असें नाहीं. स्थानिक-स्वराज्यसंस्थांतून काम करणारे लोकच स्वराज्याच्या भावी हक्कांचे चालक होतील असा कांहीं नियम सांगतां येत नाहीं. कदाचित् हल्लीं आपल्या ग्राम-पार्लमेंटांत झळकणाऱ्या लोकांच्या चुकांकडे आणि गोंधळाकडे पाहून सध्यां बाजूस बसलेले अधिक चांगले लोक पुढें येतील, आणि आपल्या वाढत्या जबाबदारीचा बोजा शिरावर घेतील असाही एक संभव आहे; पण अशा प्रकारें अधिक चांगल्या लोकांनीं पुढें यावें म्हणून तरी आपल्या स्थानिक-स्वराज्याची हल्लींची दैना लोकांपुढें नाटकरूपानें मांडणें अवश्य होतें यांत शंका नाहीं.


गेल्या चाळीस वर्षांचा स्थानिक-स्वराज्यसंस्थांचा इतिहास स्थूलदृष्ट्या अवलोकन केला तर पुष्कळ सुधारणा झाली आहे असेंच म्हणावें लागेल. परंतु मतदारांचा वर्ग अधिकाधिक विस्तृत करण्याचें धोरण ठेविल्यामुळें पहिल्यापेक्षां कमी दर्जाच्या लोकांस कमिट्यांत निवडून येण्यास सवड झाली आहे. यामुळेंच रा० जोशी यांनीं वर्णिल्या प्रकारचे

सभासद निवडून येतात, आणि आपल्या कृतींचे पोवाडे गाण्यास कवीस संधि देतात. या नाटकांत वर्णन केलेले सर्व अनन्वित प्रकार कोणत्याही एकाच शहरांत एकाच वेळीं पहावयास मिळतील असें नाहीं, तथापि कवीनें अतिशयोक्ति केली आहे, किंवा असंभवनीय चित्र रेखिलें आहे, असेंही म्हणतां येत नाहीं. सुशिक्षित आणि अशिक्षित या दोन्ही प्रकारच्या लोकांस, या नाटकाच्या द्वारें, आपआपल्या कर्तव्याची जागा असा नाटककर्त्यानें इषारा दिला आहे, याबद्दल रा० जोशी यांस धन्यवाद दिला पाहिजे.

या नाटकांतील पद्यें अलीकडच्या इतर संगीत नाटकांतील पद्याप्रमाणें रागदारींत गवयी थाटानें गाण्यासाठीं तयार केलीं नाहींत, आणि त्या पद्यांप्रमाणें निरर्थकही नाहींत, हें फार चांगलें आहे. सामान्य जनतेच्या मनांत घोळण्यास आणि त्यांना अर्थबोध होण्यास पोवाडे वगैरे अनुभवाच्या कसोटीस उतरलेल्या जुन्या वृत्तांचाच कवीनें आश्रय केला आहे. दुसरी गोष्ट ही कीं, या नाटकांत अश्लील अमंगल किंवा उपमर्दकारक भाषाप्रयोग टाळितां येतील तितके टाळण्याचा ग्रंथकर्त्यांचा प्रयत्न आहे. खऱ्या विनोदास या गोष्टींची गरज नाहीं हें या नाटकांत वारंवार प्रत्ययास येतें. या बाबतींत नाटककर्त्याचें अभिनंदन करावयास पाहिजे. शेवटीं रा० जोशी यांना आतांपर्यंत जें यश मिळालें आहे तें या नाटकासही मिळो अशी इच्छा दर्शवून ही प्रस्तावना पुरी करितों.

६७८ सदाशिव पेठ, पुणें.
ता. २९ मे १९२५.

वि. रा. जोशी



रावबहादुर लक्ष्मण जनार्दन आपटे

रावबहादुर लक्ष्मण जनार्दन आपटे,

बी. ए., एल्‌एल्. बी.

प्रेसिडेंट, शहर म्युनिसिपालिटी, पुणें.

यांस

साष्टांग नमस्कार विनंती विशेष,

प्रस्तुत नाटक लिहून तयार झाल्यानंतर त्यांतील कित्येक प्रसंग आणि पद्यें आपणांस निवेदन केलीं. त्यांबद्दल आपल्या नेहमींच्या खुल्या दिलानें आपण आपली पसंती व्यक्त केली; इतकेंच नाहीं तर, मीं नाटकांत जे घोटाळे आणि अनिष्ट प्रघात वर्णन केले आहेत, ते कांहींच नव्हत त्यांपेक्षां अधिक घोर आणि निंद्य प्रकार जागोजाग नजरेस पडतात असें आपण मला सांगितलें; त्यावरून नाटकरूपानें हे सर्व लोकांपुढें मांडिले तर लोकशिक्षणास मदत होईल असेंही आपण बोलून दाखविले. हल्लीं नाटक तयार झाल्यावर आपणांस तें समर्पण करावें, असे माझ्या मनांत आले. आपला सरळ, गोड स्वभाव, निस्पृहता, सार्वजनिक कामांत पक्षभेद मनांत न आणितां कार्यसिद्धीकडे लक्ष ठेवून वागण्याची पद्धति इत्यादि गुणांवर लुब्ध होऊन ही परवानगी मीं मागितली आणि आपण ती उदारपणें दिली. सांप्रत हे नाटक अत्यंत आदरपूर्वक आपणांस समर्पण करीत आहे त्याचा स्वीकार व्हावा. कळावें, ही विनंती.

पुणें,
ता. १ जून १९२५.

आपला नम्र
माधव नारायण जोशी

आभारप्रदर्शन आणि विज्ञप्ति

हे पुस्तक तयार करण्याचे कामीं माझ्या अनेक मित्रमंडळींनीं प्रोत्साहन दिलें व परोपरीनें साहाय्य केलें आहे. माझे मित्र श्रीयुत विनायक रामचंद्र जोशी, बी. ए., माजी संपादक 'सुधारक' यांनीं माझ्या विनंतीस मान देऊन सदर पुस्तकास मार्मिक प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. त्याचप्रमाणें आनंदविलास नाटकमंडळीचे मालक रा० गणेश विनायक बीरकर व रा० हरिभाऊ आपटे यांनीं अतिशय उत्साहानें हें नाटक नटवून-सजवून रंगभूमीवर आणल्याबद्दल त्यांचा; येथील विजय छापखान्याचे मालक रा० अनंतराव गोखले यांनीं आपल्या नेहमींच्या दक्षतेनुरूप हें पुस्तक अल्पावधींत फारच सुंदर छापून तयार केलें, याबद्दल त्यांचाही मी सदैव ऋणी आहें. तसेंच माझ्या व्यवसायबंधूंस व रसिक वाचकवृंदासही नम्रपणें एक विनंति केल्याशिवाय रहावत नाहीं. माझ्या अल्प समजुतीप्रमाणें आणि ज्ञानाप्रमाणें हें नाटक मीं रंगविलें आहे. अर्थात् त्यांत अनेक दोष असणें अगदीं स्वाभाविक आहे. परंतु मजपेक्षां जे अधिक विद्वान् व अनुभवी असतील त्यांनीं या प्रकारची नवीन विषययोजना करून लोकशिक्षणाचा मार्ग पत्करावा हें मीं सुचविलें असें होईल तर मी आपणास कृतार्थ समजेन.

माधव नारायण जोशी

संगीत

स्थानिक-स्वराज्य

अथवा

म्युनिसिपालिटी नाटक

ईशस्तुति

मंगला माधवा चरणिं करि वंदना। पामरा-करिं घडवि देशसेवा ॥ध्रु०॥
हीनबल स्वजन हे बापुडे जाहले। कोण तुजवीण घे कैवार देवा ॥१॥
भयद कालें पहा अंत अति घेतला। कालनिर्माणका धाव देवा ॥२॥
हिंदभूमीजनानि सौख्यहितसाधनीं। वाटो विसावा दे भाव जीवा ॥३॥

सूत्रधारः—झाली इतकी ईशस्तुति पुरे झाली. अलीकडे तो परमेश्वर स्तुतीला अगदीं कंटाळला आहे. कारण जो पहावा तो आपला नुसत्या स्तुतीला कंबर बांधून तयार झालेला दिसतो. आपण माणसामाणसांत अशी आपमतलबी स्तुतीची धूळ फेकतों तसाच धूळ टाकण्याचा प्रसंग जेव्हां देवावरही आपण आणला तेव्हां त्या बिचाऱ्यानें डोळे मिटून आमच्या स्तुतीला कान बंद करून घेतले. आतां नुसत्या तोंडाच्या स्तुतिरूप बडबडीला तो भीक घालीनासा झाला आहे. त्याला वटवट नको आहे. काम पाहिजे आहे. चल तर, प्रथम कार्याला प्रारंभ करूं आणि कार्य करीत असतां त्यांत यश देण्याविषयीं त्याची करुणा भाकूं

नटीः—कोणच्या कार्याला सुरवात करायची आणली आहे मनांत ? कार्य तर कळूं दे प्रथम मला ?

सूत्रधारः—व्यर्थ व्यर्थ माझ्या सहवासांत दिवस गेले तुझे! जरा समोर पहा! पाहिलेंस, आम्रमंजरींनीं अलंकृत झालेल्या वृक्षावर जसा कोकिलांचा थवा बसून त्यांचा मंजुळ स्वर ऐकूं येतो, किंवा सरोवरांत प्रफुल्लित कमलांवर जसा मधुकरांचा गुंजारव कर्णमधुर वाटतो, तसाच या रंगभूमीला वेढून टाकलेल्या मार्मिक, रसिक आणि सद्हृदय प्रेक्षक-समुदायाचा गोंगाट ऐकून तुला कोणच्या कार्याला प्रारंभ करावयाचा, याची नाहीं का कल्पना येत? पाहिलास का किती आतुरतेनें हा समुदाय प्रारंभाची वाट पहात आहे!

नटीः—हें पहा, मी तुम्हांला थोडें स्पष्ट बोलतें, राग नको त्याचा यायला! कायहो, तुम्हाला पुन्हां एखाद्या नाटकाची अवदसा आठवली वाटतं? त्या 'विनोदाचे' आणि 'आनंदाचे' झाले तेवढे धिंडवडे पुरे नाहींत का झाले? काय नि काय! कांहीं बाकी ठेवलीका लोकांनीं म्हणायची?

सूत्रधारः—पण लोकांनीं कांहीं बाकी ठेवलीका येऊन पहायची? अग हें चालायचेंच! एक मनुष्य सगळ्या जगाला कसा खुष करणार? हें पहा मी कांहीं दहापांच सोंवळ्या टीकाकारांच्याकरितां नाटक करीत नसतों. मला त्यांच्याविषयीं मनांतून आदर आहे, त्यांच्या उदात्त आणि सात्विकपणाबद्दल मला कौतुक आहे, पण सांप्रतच्या परिस्थितींत त्यांचें ऐकावयाची सोय नाहीं! झालीस वाटतें टीकाकारांना सामील? मोठा जुलूम आहे बुवा तुम्हां सोंवळया लोकांचा! अगदीं नाकावर माशी नाहीं बसूं देत तुम्ही?

नटीः—समजलें! उगीच वितंडवाद येथें कशाला? जगाचा मुख्य धर्मच जर वैचित्र्य आहे तर तुमच्या व माझ्या आवडींत व रुचींत वैचित्र्य असणें स्वाभाविक आहे. सांगा तर आतां कोणच्या कार्याला प्रारंभ प्रथम करावयाचा तो! तुमच्या नाटकाचें नांव तरी काय आहे?

सूत्रधारः—माझ्या नाटकाचें नांव स्थानिक स्वराज्य अथवा आमची मुनासिपालिटी. हें पहा छापील पुस्तक!

नटीः—म्हणजे! इतक्यांत छापून देखील टाकलेंत वाटतें? धन्य आहे बाई तुमची! कथानक तरी काय आहे?

सूत्रधारः—कथानक होय? शेंकडों कथानकें आहेत त्यांत!

नटी:—पण सगळीं कथानकें मूळ कथानकाला धरूनच आहेत ना?

सूत्रधार:—अग तर! मुख्य प्लॉट मुनसिपालिटीनें स्वतःच आहे; त्यालाच अनुलक्षून सर्व प्रवेश आहेत!

नटी:—पहा पुन्हां रागावलांत! तुम्ही माझ्या म्हणण्याचा अर्थ नाहीं समजलांत! तुमच्या नाटकाचा हेतु काय?

सूत्रधार:—ऐक तर! सध्यांच्या काळीं आमच्यांत राजरोस वावरणाऱ्या कांहीं आपमतलबी, दांभिक, भोंदू लोकांनीं घातलेला धिंगाणा चांगला चव्हाट्यावर आणून त्यांचा चांगला खरपूस समाचार घ्यावयाचा! त्यांचा स्वार्थसाधु स्वैरसंचार जगाला दाखवावयाचा! निर्भीडपणानें, निस्पृहतेनें व कोणच्याही विवक्षित व्यक्तीला अनुलक्षून न लिहितां त्यांच्या स्थानिक स्वराज्याचा धुडगूस अशा रीतीनें जगास दाखवावयाचा कीं तो पहात असतां ते या रंगभूमीच्या आरशांत आपले आपल्यालाच हंसण्यांत दंग होऊन जातील! मग घरीं गेल्यावर खुशाल त्यांनीं नाटकाचा सारांश, कथानक, हेतु यांचा निवांत विचार करावा!

नटी:—एकंदरींत तुमच्या कल्पनासाम्राज्यांत सरसकट बारा टक्केच आहेत म्हणायचे? चांगला नाहीं, वाईट नाहीं, सज्जन नाहीं, पंडित नाहीं; जो येईल तो भरडून काढायचा उपहासाच्या जात्यानें?

सूत्रधार:—तूं अजून मूळपदावर आहेसच! अग वेडे, मूर्खांचा, दांभिकांचा उपहास करणें म्हणजे पर्यायानें आपोआपच सद्‌गुणांचा परिपोष केल्यासारखें नाहींका होत? म्हणे सरसकट बारा टक्के! असें कसें होईल? शक्य तरी आहे का? या ठिकाणीं, या वेळेसच, या रसिक-वृंदांतच असे थोरथोर राष्ट्रभक्त, स्वार्थत्यागी, परोपकारी सत्पुरुष बसलेले आहेत कीं, त्यांची कितीही स्तुति केली तरी ती अपुरीच होईल! त्यांनीं केवळ राष्ट्रोद्धाराकरितां व लोककल्याणाकरितां इतक्या यातना, मानखंडना आणि हालअपेष्टा सहन केल्या असतील कीं, आमच्या-सारख्या सामान्य जनांनीं त्यांचे उतराई होण्याकरितां आपल्या शरीराच्या कातड्याचे जोडे जरी त्यांच्या पायांत घातले, तरी त्यांचे उपकार फिटणार नाहींत! अशा माझ्या मायभूमींतील सज्जन बंधुभगिनींचा उपहास माझ्या स्वप्नीं तरी येईल का? इतकेंच नव्हे तर, प्रिये—

पद

मी सदा नमित या राष्ट्रधुरंधर विभुती ॥ पूजितों ध्यानीं
मनिं चित्तीं ॥ ध्रु० ॥ औदार्य धैर्य नय नीति ॥ गुणवंत
चतुर जे असती ॥ जे वदति तेविं आचरती ॥ जन-
हितीं जन्म जे घेती ॥ १ ॥ मदमत्सर न शिवे चित्तीं ॥
ज्या स्तुतीं दंभि ये खंती ॥ परसुखेंचि प्रमुदित होती ॥
ओवाळिन प्राण त्यांवरतीं ॥ २ ॥ आकाश जरी
कोसळलें ॥ भूपतिनें करवतीं धरिलें ॥ सत्याहुनि अणु
नच ढळले ॥ अनभिषिक्त भूपति व्यक्ती ॥ ३ ॥

अशा व्यक्तींच्या पुढें कोण मान वांकविणार नाहीं ? कळलेंना माझें हृदय इत्थंभूत तुला आतां ? आतां पुन्हां अडूं नकोस या मुद्द्यावर !

नटीः—असाच जर तुमच्या हृदयांत सज्जनांविषयीं आदर आणि भावना आहे तरमग माझें बोलणेंच खुंटलें ! मी तुमच्या कार्यांत सर्वतोपरी काम करण्याला अगदीं आतुरतेनें तयार आहें, आज्ञा व्हावी !

सूत्रधारः—ठीक आहे ! जा तर आंत, सर्व पात्रांची सिद्धता आहे कीं नाहीं ते पाहून ये जा. (ती जाते) चार डोक्यांच्या ब्रह्मदेवाची मनुष्य एक वेळ समजूत घालील, पण एक डोक्याच्या बायकोची समजूत पटविणें कठीण ! आमची ही वळली तर सूत नाहीं तर--(नटी आदळ आपट करीत रागावून येते) या, आतां तुमचीच गोष्ट बोलत होतों !

नटीः—नाहींच जायची तुमची जन्माची संवय ! म्हणे पात्रांची सिद्धता आहे कीं नाहीं ती पाहून ये ! कसलीं कपाळाचीं पात्रें आलीं आहेत ! आंतल्या बाजूला तर एक मेला मुकद्दम नि दोन महारणी बसल्या आहेत ! कशाला हो ह्या मुकादमाला नि टवळ्यांना बोलावलेंत तुम्हीं, नाहीं ते घरांत विटाळचंडाळ कालवायला नि थेर थेर करायला ! थांबा मी जाऊन त्यांना आत्तां हांकून देतें ! अरे पांडू ! अरे गणू ! ओढा रे चांगल्या झिपऱ्या नि घाला चार फेरसुण्या पाठींत !

सूत्रधारः—अग होय, होय, होय! पहा अडलीस घुन्हां याच जाग्यावर! अग, तो खरोखरीचा मुकादम नि त्या महारणी नव्हेत! अग, जसा देव तशीच पूजा बांधिली आहे त्यांनीं! मींच सांगितलें होतं त्यांना तसें रंगायला! (हंसते.) हा वेडे! इतकी फसलीस ना? मला सगळे स्वतः-च्या कल्पनेच्या मालकीचें अगदीं नवीन पाहिजे! मला आपलें सत्तेचें धोंगडें आवडतें; दुसऱ्याची शालजोडी नको! मला दुसऱ्यांच्या काव्य-कल्पना, कोटया, भाषांतर, उतारे यांचें ऋण काढून नाटकाचा सण पार पाडायचा नाहीं! माझे आपले गरीबाचे सुदाम्याचे पोहेच का असे-नात तेच मी या प्रेक्षक बांधवभगिनींना देणार आहें. चल तर, तीं बिचारीं पात्रें बराच वेळ रंगून बसलीं आहेत! त्यांच्या तोंडाचा रंग देखील तड-कडूं लागला असेल! मुनसिपालिटी देवीच्या नमनाला सुरवात करायला त्यांना सांगूं! चल तर!

अंक पहिला

प्रवेश पहिला

[स्थळः—रस्ता. पात्रेंः—रंगराव, अंबू व गंगू.]

रंगरावः—

पद [चाल—केशवकरणी अघटित लीला०]

नगर देवते ! मुनसिपालिटे ! माधव तुज वंदन ॥ करितसे घालुनि लोटांगण ॥ जनमोहक तव अगम्य लीला सिंधूसम गहन ॥ थकले कवि वानुन गाउन ॥ ध्रु० ॥ थाटानें तूं पाट लाविसी दर तिन तिन वर्सानं ॥ करुनिया नगराचें मंथन ॥ शृंगारसुंदरे ! तूं वेल्हाळे ! काढिसि मग हुडकुन । नेमके नंदीचे नंदन ॥ कोणी हातिं तराजू धरी ॥ कोणी कापड विक्री करी ॥ कोणी नापिक खुंटावरी ॥ कोणी नित्य हमाली करी ॥ कोणी गुस्त्यांचे कैवारी ॥ कोणी विधवांचे चौधरी ॥ कोणी पदव्यांच्या हो भरीं ॥ खुशालचेंडू उडाणटप्पू यांवर गे भाळुन ॥ अर्पिसी यांस तनमनधन ॥ धूर्त सात्त्विक, ज्ञानी, पंडित, सज्जन, झिडकारुन ॥ धरिसि कां ठोंबे कवटाळुन ॥१॥ पदव्या कीर्ती दांभिक मिळविति कितिक लाळ घोटुन ॥ प्रसंगीं घाण बूट चाटुन ॥ तनसडिसाठीं नरडीलाहि देतिल नख लावुन ॥ जनहित यांचे मनिं कोठुन ? ॥ ग्रामव्यवस्था वर्णन करितां जाइल कालिदास भागुन ॥ तिथें मी काय अज्ञ मतिहिन ॥ यथाशक्तिनें वर्णन करितों ऐका लक्ष देउन ॥ जरि चुकलों ध्यावें सांभाळुन ॥ गटारें रस्त्यावरि वाहती ॥ धुराळा रोधित रविची गति ॥ कचरा लपवित पेट्यांप्रति ॥ बेडुक अळुखांचीं गर्जती ॥ पलटणी डांसांच्या धावती ॥

नाकांमधले केंस जळाले खमंग दुर्गंधिनं ॥ गेलें सॅनिटेशन उलथुन ॥ बोळांमध्यें बाळ गोपाळ बैसुनि करि कुतुहल रांगेनं ॥ सुशोभित करिती रांगोळिनं ॥ २ ॥ तेल पळविलें म्हणोनि विरही कंदिल करि मिणमिण ॥ गेले कितिक प्राण सोडुन ॥ मार्ग क्रमितां प्रलयकालच्या ऐशा तिमिरांतुन ॥ लोळती कितीक ठेचाळुन ॥ नरजन्मिच या शिंगें देशी नागरिकां लागुन ॥ बसविशी थोबाडें सुजवुन ॥ पाउस पडतां ढोंपर बुडती रस्त्यांत चिखलांतुन ॥ पडती नरनारी निसरुन ॥ धोतर पगडी लुगडें बुचडा तिनतेरा होउन ॥ उभयतां पोहति कवटाळुन ॥ करिती संध्या मेंबरनांवें पटपट मुखिं घेउन ॥ अर्पिती पोहत चिखलांतुन ॥ त्यांच्या बापा आज्या पणज्या त्रयिला संबोधुन ॥ टाकिती सहकुटुंब उद्धारुन ॥३॥ गढूळ रेंदा फिल्टर वॉटर टिपिटिपि नळ गाळिती ॥ जैसा शंभू अभिषेकिती॥ मजला वाटे हे नळ रडती ! केवळ तुझ्या नांवानं ॥ स्फुंदुन, स्फुंदुन, आक्रंदुन ॥ अचमन करतां हळूच मासा तळहातीं येउन ॥ बैसे विप्रोदरीं दडि देउन ॥ नाना रोगें जन पीडले ॥ प्लेगें ठाण सदाचें दिलें ॥ पटाकिनें निशाण फडकाविलें ॥ नाडले मलेरियानें भले ॥ विषमज्वरही फोफावले ॥ गोवर, देवींना फावलें ॥ खोकले क्षयही सरसावले ॥ बापुडे लोक भांबावले ॥ एन्फ्ल्युएंझा तिखट जाहला कानामागुन येउन ॥ मेले असंख्य दुबळे जन ॥ डाक्तरची बेट्यांची पिकली ! गरिबांच्या पैशानं ॥ बसले मोटारी घेउन ॥ अनाथ गरिबें पटपट मरती त्राहित्राहि भगवन ॥ त्राता कोण तुजवांचुन ॥४॥ नगरदेवते मुनसिपालिटे ! माधव तुज वंदन ॥ करितसे घालुन लोटांगण ॥ध्रु०॥

झालें इतकें नगरदेवतेचें स्तवन पुरें झालें! ठेवा तुमच्या त्या झांजा बाजूला आणि लागा देवतेच्या सेवेला तावडतोब! मी शहरसफाईची आणि घरोघर उंदरांचे सांपळे पुरविले गेले आहेत कीं नाहींत त्याची तपासणी करून आलोंच तावडतोब!

प्रवेश दुसरा

[स्थळः–रस्ता, कंदील व कचऱ्याची पेटी भरलेली.]

गंगूः—

कुठवर पाहूं वाट सख्याची चंद्र कीग ढळला जी ॥
माथ्यावरी ॥ अग अंबे अग अंबे—

अंबूः—काय तरी तुझा गळा म्हनू! उतरलना मदन खालती! अग, आतां बाईच तोंड बंद कर कीं, आतां रस्ता झाडशील का लावनीच म्हणशील; आतां थोडं राहलंया झाडायचें! आतां त्वांड बंद करून झाटप बिगी बिगी.

गंगूः—माझं त्वांड बंद झालंया म्हणजे हातबी बंद पडतुया बघ! अंबे, माझं आक्शी मुनशीपालटीच्या लेंबरावांनीं हात नी त्वांड दोन्हीबी सुरू पाहिजे बघ!

अंबूः—म्हनजी कायग? मला नाहीं हेरलं अजून, बाईच समजून सांग तर खरं!

गंगूः—म्हनजी आपल्या गांवची मुष्टीपालटी आहेना? तथं जाऊन-शान गांवांतल मोठमोठ दुकानदार शेठसावकार लोक त्वांड करतात ना? आन हातानंबी लोकांचा पैका दाबतात ना? तस्स्, रात्रंदिवस माझ हात नी त्वांड सुरू पाहिजे बघ! तीकतं मोठ्या लोकांचे लांब कशाला, अग, आपला रंगोबा, मुकादम, ज्याच्या त्याच्यापासून चंची मागून बकरीवानी तोंडानं चरतोया, आन हातानं मजुरांच्या खोट्या हजऱ्या लिहूनशान पैकाबी दाबतोया, हिंग असं!

अंबूः—अवकळा, लयी द्वोड हैस! तुला अक्शी समदं राजकारण कळतंया! आन कुठं शिकलीस इकतं ग्यान?

गंगूः—कुठं म्हनजे! ह्या गांवांतल्या समद्या शाळा मीच झाडत्यें नव्ह का मुष्टीपालटीच्या !

अंबूः—तवाच तुझा नवरा रांड टाकून गेलाया तुला ! शान त्यो सावकाराचा पोरगा होता ना तुझ्या मागं ? कायग मंग पोर कुठं आहे तुझं आतां ? पांजरपोळांत सोडलंस व्हय ?

गंगूः—म्हनजी ! तेच्या बाला मी सोडतें व्हय ! एक दीस नेलंकी त्येच्या घरींच आन दावलं त्येच्या बाला! तवा घाबरला सावकार न् काय ? प्वार घेतलंन ठेऊनशान् त्येनं ! आज पांच वर्सं झालीं मला पंधरा रुपये पोटगी देतोया गुपचूप. त्ये रस्त्याला झाडायची पाळी असली म्हणजे नंदर पडतंया कधीं कधीं ! अक्शी कसं हिऱ्यावानी हाय पग ! प्वार पन् प्वार लाखांत प्वार हाय बघ ! हत योकबी नंदर पडत नाहीं बघ तसं !

रंगरावः—गंगे, तोंड बंद कर ! चल हात चालू दे बिगी बिगी !

गंगूः—चाललंया नव्हका, बरं झालं लौकर आलास ! मीं म्हन्तलं, कुठं उंदराच्या सांपळ्यांतच अडकून पडलांत ! कारं रंगराव ! आज आठवण झालीया व्हय ह्यो रस्ता झाडायची तुम्हाली ?

अंबूः—आज दोन वर्सात कुनी हकड आलं असल तर शपुत !

गंगूः—कारं रंगराव ! आजच, आजच, कुठला उमाळा फुटलाया तुम्हासनी ह्यो रस्त्याचा ?

रंगरावः—तुला काय करायच्या चांभारचवकशा नाहीं त्या ? झाड म्हटलं झाडावं !

गंगूः—आम्ही चांभारचवकशी करतोंय ! का तुम्ही करतां ? आज दोन वर्सात न झाडलेला रस्ता तुम्हीं आम्हांसनी झाडाया हुकुम दिला; तवा या रस्त्याची चांभारचवकशी हमीं केली का तुम्हीं ?

रंगरावः—अग, आज या रस्त्यांनीं कलेक्टरची का गव्हर्नरची मोटार जाणार आहे, असं कळलं तेव्हां डाक्तरनीं हुकूम दिला तावडतोब केर-कचरा धुराळा साफ करून सूर्योदयाच्या आंत पाणी शिंपडायचा ! म्हणून तुमच्या घरीं मोठ्या पहांटेस आलों तडफडत, नाहीं तर माझं काय अडलं होतं ? पेशवाईत नव्हता बोवा असा कधीं भास गव्हर्नरच्या–नी कलेक्टरच्या !

गंगू:—कांरे रंगराव! कोन कलक्टुर कां गंवर्नर कां कोन हुता बा! इकडून मोटारींतून आनार म्हणतोस त्येची मोटार भुर्र्र् फुसकन् इकडून आनार तिकल्यामंदी त्यास इतका कचराबी दिसतुया धुराळाबी लागतुया व्हय्! त्यो तेवढा मानूस हाय् आन् हातली समदीं मानसं काय जनावरं हायती व्हय? त्येसनी कांहीं धुराळान् कचरान् घान नाहीं का?

अंबू:—त्येसनी कांहीं नाक नाहींती व्हय घान यायला!

गंगू:—तीं काय समदीं गाढव हायती व्हय् कचऱ्यांत लोळायला?

अंबू:—त्यांसनी काय डोळे नाह्यती व्हय खांच खड्डयांतून चालायला?

गंगू:—त्येसनी काय शिंग शेपटी फुटलीया असंच दोन वर्स रहायला! लई कांगाव करतोयूस तुझ्या बाचा!

रंगराव:—अग, आम्ही काय नुसते हुकुमाचे ताबेदार! तिकडे डाक्तरचं आणि मेंबरांचं काय गौडबंगाल असतं तें आम्हांला काय कळणार! त्यांनीं हुकूम दिला आम्हीं बजावला! (इतक्यांत एक बाई कचरा पेटींत न टाकतां जवळच टाकते) आतां काय करावं! अहो त्या पेटींत टाका! भलतीकडेच काय टाकतां?

गंगू:—आं चांगली शानी सुरती दिसतीसया आन शेनपन कुठं तिरुथयात्रेला पाठवलंस व्हय? अतां काय म्हणावं तरी बाई ह्येसनी! टेहळून काय पाहतीस? डोळे नाह्यती व्हय पेटींत टाकायला?

बाई:—ए बाई, तोंड किती करतेस! सगळ्या गांवांत असाच टाकतात कचरा! काय ग बाई तोंडाळ तरी! हें मोलमजूर अलीकडे भारी उर्मट झाले आहेत! अगदीं ताळतंत्र सोडलाय् मेल्यांनीं!

रंगराव:—अहो बाई, तुमच्यावर खटला भरला जाईल आत्तांच्या आत्तां!

बाई:—जा, खटला भरीव नाहींतर तिकडे कोर्ट भरीव!

गंगू:—तूं मात्र संमदा रस्त्या भरीवलास कचऱ्यानं आन् पोराच्या कागदानं, हाय तरी कुनाचं ह्यो घर?

बाई:—वराहशास्त्रीबुवांचं आहे समजलीस! भर रे मेल्या खटला, ही मी उभी आहें! चावट कुठले! [जाते.

रंगराव:—जा बाईसाहेब, तुम्ही जा! जा! जा! गंगे काढून टाक!

अग नशीब समज! नुसता कचरा नी कागदांचे बोळेच टाकले; आणखी नाहीं कांहीं टाकलें! नाहींतर अडकून पडलों असतों पंचनाम्यांत इथल्या इथेंच! अग हा बराहशास्त्री मानेजिंग कमिटींतच आहे! नाहीं तें लवांड उपस्थित होऊन सकाळच्या प्रहरींच पोटावर पाय यायची वेळ आली होती! असं नव्हतं बुवा आमच्या पेशवाईत! बरं चल! ए अंबे! दमलीस फार, चल, तें राहूं दे!

[एक ब्राह्मण पुन्हां कचरा बाहेर टाकतो व तोंडानें 'शांताकारं भुजगशयनं' म्हणतो.]

अंबूः—आं! आतां काय म्हनू तरी हेसनी! आज काय समदं येड्याचं इस्पिताळ मोकाट सुटलया व्हय? अरे टेहळून काय पगतोस! डोळे नाहिंती व्हय पेटींत टाकाया! आं! कायरे!

पद

सांग हत कशास ठेवलीर पेटी?॥ डोळ काढून कुणा
दावासि ही दमदाटी॥ धृ०॥ अंब केळ्याची सालपट
करटी॥ लगान मुंजीचीं काढून खरकटीं॥ शेणगोळ्याची
आली तशी भरती॥ काय हत रडल मुनसिपालिटी!॥१॥

गंगूः—निघ! मानुस हैस की जनावर हैस मेल्या!

रंगरावः—पुन्हां पाहिलें तर तंगडीच मोडीन बघ! बरी बरी खोड मोडलीस बेट्याची! ये! इकडे अशी! जरा काढ बघूं! आणली हैस का? चुनेगची!

अंबूः—चंची व्हय! आन् ती कशी विसरन्! आन् तुम्ही कशाला तसदी घेताया? मीच लावून देतें तुम्हाली? आतांशीं रंगराव तुम्ही अगदींच विसरलांत गरीबास्नी!

गंगूः—आन् माझ्या घरीबी नाहीं आलांत या सहा महिन्यांत तमाखु खायाला?

अंबूः—(पान लावीत असतां म्हणते) आज मोठ्या पाहाटस इकडं येतांना कोंडीबा सलूनवाला हायना? तो मोठा मेंबर? त्येच्या घरीं चाललं होत गानं त्या चंद्राजीचं, त्येच्या मेव्हन्याला कॅन्ट्राट मिळालं म्हून मुष्टीपालटीचं!

गंगूः—अक्शी समद कस दारुनं लालबुंद होऊन उल्लू झाल होत पहा! आन् तीबी रांड चंद्री दंताडी कशी ताना मारून काळीज तोडीत होती पगा त्येचं! " आहो माथ्यावरी चंद्र की हो ढळला जी "

अंबूः—हूं हें घ्या पान!


रंगरावः—अरेइच्च्या असं काय! तरीच आपले ते दादासाहेब रडतोंडे, डाक्तर बचनाग, तो रुस्तुमजी थापाडिया आन तो लंबेअली मुरगीखां तो गट्टुलाल तिकडे झुकले होते! असं काय! चालायचंच! असें कांहींतरी म्युनसीपालटींतलं अवदान किंवा घबाड सांपडलं कीं जलसे ठरलेलेच! काय विडा रंगलाया तुझा अंबे!

गंगूः—अक्शी जोड्याच्या तोंडांत मारतुया तुझा दांताचा रंग! आं आन् ह्यो कोन?

अंबूः—व्हय्, व्हय् त्योच तो! तुझा शेख हुसेन! काल घोड्याच्या शर्तीतून आनला असेल पैका तुला देया पाई! बघ कसा आपल्या नादांतच झुकत झुकत येतोया?

(शेखहुसेन चपराशी कमरबंद बिल्ला लावून एक फाईल, इंडीकॅप व हुक्का ओढीत येतो;)

शेखः—यारो सच कहताहूं शर्यत खेलो! जान गई तो पर्वा नही! जोरू गई तो पर्वा नही! नोकरीकीतो ऐसीतैसी; लेकीन वो नसीबके कसोटीपर एकदफा तोभी जाकर आपना सर मलो. एकदिन नसीबका चक्कर फिर जायगा! आज पंधरा बरस कसम है बाबांजानकी, अगरचे कुरानेशरीफ पढाहूंगा या सुना हूंगा! मेरे बाबाजान चचाजानकेभी नाम मै भूलगया, लेकीन ये 'दिलावर' 'शहाजादा' 'डनबार' इनकी पेडिगरी बरजबानी रखाहूं! मुजाखानही! एक दिन नसीबका चक्कर फिरजायगा! क्या गुडाखु मजा दे रहा है, और क्या खुश बो फैल रही है, जैसाके मै इस्तंबूलके बगीचेमें सहल कर रहाहूं! ये कोन नजर आरहा है! हाय! हाय्! मेरी प्यारी गंगूजान! हायरे तेरे नखरेमें गरम मसाला! ये तो मेरा जानखा जा रही है! जैसाके चुवेका कलेजा बिल्ली दमदमाके चबाती है वैसा ही लौंडी आखोंके खंजीरसे मेरा कलेजा नोच नोचके खा जा रही है! अरे प्यारी गंगु जरा यहां तो आव!



शेखहुसेनः—अरे यार रंगराव् ! तुमभी मजा कर रहेहो ! [पृष्ठ १३.

दोहा

हम तुम्हारे चेहरेपर मरते तुम क्यूं नजर चुराते हो ॥
गालोंकी शराब हमे पिलाकर तुम मस्त बनाते हो ॥ १ ॥
क्या चांदसा मुखडा तुम्हारा रंग जमाता है ॥
घुंगटमें इष्कका दर्या छलबलाता है ॥ २ ॥
पतली कमर लचक जायेगी क्यूं मटकते हो ॥
आंखोंके खंजीरसे मेरा कलेजा नोच खाते हो ॥ ३ ॥
अलबेली, बाकी, मखमली मुलायम, क्या भामिन है ! ॥
नही यार ! ये गांव के म्युनिसीपालिटी की काली नागीन है ।४
आज तक कमेटीके मेडकियां और चूव्बे हजम किये हो ॥
क्या यार का खेंकडा भी निंगलनेका इरादा रखते हो ? ॥ ५ ॥

गंगू:—अदुगर फेक तुझा हुक्का का बुक्का ! चोवीस घंटा कुडकुड करूनशान पानी पेतोस तवा ह्यो पोट का पखाल हाय ! माझं समदं घर भरवलंसकीं मेल्या ह्यो गुडाखुनं, राखोड्यानं, आन् हुक्यानं ?

शेख:—अरे यार रंगराव ! तुमभी मजा कर रहेहो ! ठीक है ! अरे क्यौं चिल्लाती है ये हुकेशरीफके नामसे ! अबे प्यारी ! ये दिल्लीके तख्तकी बडेबडे मोंगल बादशाहोंकी मालुम ! ये हमारे मुसल्मानोंकी नशानी है !

रंगराव:—मोठा लेकाचा दिमाख दाखवितो आहे बादशाहीचा आणि मोंगलाईचा ! आम्ही काय लेका हिंदूंनीं बांगड्या भरल्या आहेत होय ? हिंदूंनीं बांगड्या भरल्या आहेत होय ?

अंबू:—जाऊन द्या कीं रंगराव कशाला उगीच हमरीतुमरी, भांडण नी झगडा !

रंगराव:—मला नाहीं आवडत नांव ठेवलेलीं आम्हां हिंदूंना ! सोड ग अंबे ! काय आम्हांला निशाणी नाहीं म्हणतोस होय ? ही पहा अंबी ! (अंबूच्या हातून हिसकावतो.) ही पहा निशाणी आमच्या पेशवाईची ! ही पहा निशाणी आमच्या हिंदुपत पातशाईची ! ही पहा निशाणी आमच्या मराठेशाहीची !

गंगू:—अय् अय्! योकानं हुक्का पिऊन आन योकानं पानतंबाखु खाऊन आपली इजार आन् धोतुरबी गमावलं त्येचि निशानी हाय खरंच!

शेख:—यार रंगराव! क्यौं गुस्सेमें आते हो! सच! ये मेरी गंगू सच कहती है! जानेदो झगडा फिसाद, ये तो दिन हमारे मौलाना शरीफ और तुम्हारे गांधीतिलकशरीफ क्या कहते है? के हिंदु और मुसलमीन दोनो भाई है! और आपसमे झगडा करना ठीक नही है! आव गले लगो!

रंगराव:—हां असं असलं तर ठीक आहे! आमची मुळींच ना नाहीं!

शेख:—आव यंहा बैठेंगे और तुम्हारे पुरानमे कुरान! और कुरानमें पुरान मिला देंगे! लेवो तुम हुक्का पीवो और मै तुम्हारे चंचीमेंका पान खाताहूं! अबे गंगू जरा पान तो बना!

रंगराव:—म्हणजे! चल हट! पुराणांतलं वांगं कुराणांत आणि कुराणांतलं कोंबडं पुराणांत घालूं म्हणतोस होय! चल हट! मी हा असा मराठेशाहीलानि पेशवाईला बट्टा लावणारा नाहीं.

शेख:—अच्छा तो जाने दे. झगडा कायकू और! मुझाखा नहीं तूं मुरगा और मै बैंगन अलग अलग बैठके खा जायंगे! मै तुझे नही हात लगाऊंगा, फिर तेरेकु इंटाळ तो नहीं होगा? (दोघे बसून हुक्का ओढतात, पान खातात.)

रंगराव:—कायरे शेखहुसेन! हें बगलेंत पोतडेंरे कसलें आणलें आहेस?

शेख:—क्या करना यारो! ये पेट जलानेके वास्ते नोकरी करना जरूर है! ये आपने मुनसीपालटीकी कल एक ज्यादा मीटिंग है करके सब मेंबरलोगोंके घरकू नोटीस ले गया था. येकतों ये नोटीस है, और ये मेरा प्यारा लखपतीका हंडिक्यॅप है! प्यारी गंगू कल जरूर तेरे लिये 'दिलावर' और शहाजादा लगाउंगा! परवा नही एक दिन नसीबका टक्कर फिर जायगा!

रंगराव:—कायरे लेका शेख हुसेन! नोटीस फिरवलीस म्हणतोस आन् ती तर कोरीच दिसते! आन सह्या कुठें केल्या आहेत मेंबरांनीं?

शेख:—ऐसा कैसा होगा? मैं खुद हर एक मेंबरके सामने नोटीस मीटिंगकी पेश कीया और दस्तखतलीया हूं!

रंगराव:—अरे लेका! हा बघ कोरा आहे कागद आणि सह्या तुझ्या लखपतीच्या हंडिकॅपवरच केल्या आहेत! अरे तू मुनसीपालिटीच्या मीटिंगला बोलावलंस का रेसीसच्या मीटिंगला?

शेख:—हां! ऐसी कैसी गलती हो गई भाई? मैं भूलके हंडीकॅपही सामने रखदीया शायद! लेकीन वो गधोंने आंख मूचकर दस्तखत कैसी करदिये भाई? तोबा! तोबा! येतो आफत आके पडी! हाय हाय! येतो नसीबकी खोपडी फुटनेकी नौबत आं पहूंची!

अंबू:—एक दिन नसीबका चक्कर फिरजायगा!

शेख:—अरे क्या मश्करी कर रहे यारो! चल भाई रंगराव! वो पांडोबा शिरस्तेदार तेरे पहिचानका है उसे जरा समजाके दुसरी नोटीस लिखवा लेयेंगे! क्या करना, नाहीं तो नोकरी जायेंगी! आजतक डनबार, किलटोय, दिलावर को पांच रुपये लगाताथा! आज जैसाके नोकरीके लिये वो पांडोबा शिरस्तेदार कोही पांच रुपये लगा देतां हूं!

रंगराव:—अरे लेका पांच रुपये त्याला कशाला देतोस, लाव तुझ्या डनबारला! ह्या सह्या कापून दे नोटिशीला गोंदांनीं चिकटवून.

शेख:—सुभान अल्ला! तूने तो अच्छी हिकमत निकाली! इसी वास्ते मै हरमेश कहतांहु कि हमारे हिंदुभाई बडे अकलमंद और चलाख होते है! और नही तो हम्! अरबस्तानके अडमुठे हूंठ लंबेचवडे खडे है

रंगराव:—चल! बाबा करतां काय!

गंगू:—ये शेख तुरकड्या! आन् ही मोंगलाईची निशानी घाल की तुझ्या तोंडांत!

अंबू:—आन् ही पेशवाईची पेठ का माझ्या हातांत?

रंगराव:—तें कांहीं नाहीं ओळीनंच झालं पाहिजे, पहिल्यांदा ही मोंगलाई जाऊं दे, त्याच्या मागून ही पेशवाई, आणि येऊं दे त्याच्या मागून तुमची विलायतबाई!

शेख:—अरे चलो, जलदी! कदम बढाव. वो देख! कोंडिबा हजामके वहांसे जलसा बरखास्त होकर सब लोक इदरसेही आरहेहैं!

प्रवेश तिसरा

[कपिला मास्तरणीचें घर]

कपिलाः—जगाचें अंतिम रहस्य म्हणजे पैसा, आणि पैसा म्हणजेच जग! आरोग्य, शक्ति, युक्ति, मान, सन्मान, औदार्य तसेंच सौंदर्य, ज्ञान, लौकिक, या सर्वांचा जर कोणत्या एका शब्दांत समावेश होत असला तर तो शब्द म्हणजे पैसा. आणि या पैशाचा अभाव म्हणजेच दारिद्र्य, दुःख, अज्ञान, क्लेश, रोग आणि पाप. तो पैसा मिळविण्याच्या साधनांना मात्र आमच्यांतल्या कांहीं प्रतिष्ठित दुष्टाचार्यांनीं निरनिराळीं नांवें दिलेलीं आहेत. चोर, उचले, भामटे, दरवडेखोर, किंवा व्यापारी, अधिकारी, सेनापती आणि राजे, खरें पाहूं गेलें असतां एकाच मूळतत्त्वाचीं रूपांतरें आहेत. हेतु एकच, तत्त्व एकच, सारखेच धंदेवाईक, पण एकाचा लहान प्रमाणावर धंदा म्हणून तो निंद्य, आणि दुसऱ्याचा मोठ्या प्रमाणावर म्हणून तो वंद्य! मला तर असें वाटतें कीं हे सर्व खगोल अंतराळांतल्या आणखी एखाद्या मोठ्या गोलासभोंवतीं हिंडत नसून ह्या लहानशा चिमुकल्या पैशाच्या गोलाभोंवतींच हिंडत आहेत. खरोखर बा धना—

पद

मोहना! सख्यासुवर्णा! करिसि सृष्टिसंजीवना। जीवां
जीवना॥ध्रु०॥ दुःखलोह स्पर्शुनि करिसी॥ सौख्यमया
कांचनराशी॥ आधारभूत सकलांसी॥ करिसी मुक्त
तापदाना॥ पापा क्षालना॥१॥

ज्याच्यामागें सर्व जग लागलेलें आहे, त्याच्यामागें मीही लागलें तर कसला आला आहे दोष? पण बाई, धन आणि प्रेम—हरकत नाहीं, पाहीन प्रेमाचेंही धनासारखेंच साधलें तर. हो, बरी आठवण झाली; आमच्या इंजिनियर कळसूत्रे, डॉ० बचनाग, चीफ आफिसर गायतोंडे, आणि प्रो० ठोंबे यांनीं सांगितलें कीं, कोंडिबा सलूनवाल्यांच्या इथला जलसा झाल्यावरोबर तुमच्या इथें पुन्हा चहा घेऊन मग घरोघर जाऊं. तशी जलसा आटपायच्या आधीं लगबगीनें घरीं आलें नी चहाचं आधण ठेवायला नथूला सांगितलें. अरे नथू! ठेवलेंस नारे आधण!

नथू:—होय. बारा कप ठेवले.

कपिला:—बरें तर जा तिकडे. उकळी आली म्हणजे मला सांग.

[कोकिला प्रवेश करते.

कोकिला:—बरें झालें बाई, तुम्ही लवकर निघून गेलांत. जलसा झाल्यावर काय नि काय धिंगाणा घातला सगळ्यांनीं! तो मेला बाळासाहेब धुंद होऊन तिच्याजवळ जाऊन बसला काय! कपाळावर रुपया चिकटवला काय, कायनी काय. शेवटीं जगद्गुरु तस्तावर झोंकांडा खाऊन नख-शिखांत भरला! असा गोंधळ घातला सर्वांनीं!

नथू:—अधणाला उकळी फुटायच्या रंगांत आहे. चहा घालूं का थांबूं थोडा वेळ?

कपिला:—येतीलच आतां इतक्यांत मंडळी. आल्यावर मग चहा घाल हो! (पांडोबा प्रवेश करतो.) कोण हें! इश्श! या पांडोबा, कसे अगदीं बोलावल्यासारखे आलांत हो! बरें झालें; आज तुमची सर्व मालक मंडळी जमणार आहेत, तेव्हां कामावर रुजू व्हायच्या आंत सगळ्यांशीं तुमची सलगीची इन्ट्रोडक्शन अनायासेंच करून देतें.

पांडोबा:—फार मेहेरबानी आपली!

कपिला:—बसायचें आपण! आमचें कांहीं खाजगी भाषण चाललेलें नव्हतें.

कोकिला:—कायग कपिले! हा तुझा नवीन सरदार धेनुवल्लभ हा ग कुठें गांठलास कुबेर?

कपिला:—अग, तो किनई एकदां आमच्या शाळेवरून मोटारींतून जात होता; तों बाई कावळा बसायला आणि डहाळी मोडायला एक गांठ पडली. अगदीं आमच्या शाळेच्या समोरच त्याच्या मोटारीला कांहीं अपघात झाला! त्याला कांहीं दुखापत झाली नाहीं पण मी आपली ताबडतोब तिकडे गेलें आणि विचारपूस केली, तशी त्यानेंही माझी विचार-पूस केली! ही कायती प्रथम भेटीच्या योगायोगाची गोष्ट!

कोकिला:—असें का? काय ग, चांगला शिकला सवरलेला आहे का?

कपिला:—छेग! शिकण्यासवरण्यांत शंखोबा आहे! यःकश्चित् लहानसा दांडीतराजूवाला होता, पण बाई त्याचें नशीब होतेंना कुबेरा-

सारखें! ही लढाई सुरू झाली नि निमित्त झालें! तो होता जातीचा जरा धाडशी आणि लटपट्या! इकडून तिकडून पैशाची थोडी जुळवा-जुळव करून रंगाचा केला व्यापार! काय बाई म्हणतात ना, देव देतो त्याला आढें फोडून देतो! आज दहा वर्सांत तो कुबेर झाला! आधींच टारें त्यांत शिरलें वारें, त्याला कुणी सहज दारूचें पिकेटिंग पहायला नेला. तो गांवांत बभ्रा झाला कीं, त्यानेंच पिकेटिंग केलें म्हणून! मग काय विचारतां? लागलींच गांवांत श्रीयुत देशभक्त झाला!

पांडोबाः—आजकाल श्रीयुत, दे० भ०, लो० मा० व्हायची प्रत्येकाच्या जिवाची धडपड चालू आहे, कारण या मायपोटांत वाटेल त्या प्रकारच्या मूर्खांना बेमालूम दडी मारतां येते.

कपिलाः—त्यांतून पडला तो पैसेवाला! एकदां पैसे मिळाले म्हणजे मग पदव्या, मान, सन्मान आणि शहाणपणाला का तोटा आहे?

पांडोबाः—अहो, हात धुवून पाठीस लागतात पदव्या!

कपिलाः—पण मनाचा मात्र मोकळा आहे बिचारा!

कोकिलाः—अग म्हणूनच लौकर मोकळा व्हायचा संभव जास्त! पण अशाला का तूं अगदीं मुठींत आणून ठेवलास? आहेस बाई जहांबाज!

पांडोबाः—तो कुबेर मुठींत सांपडला म्हणून तर सगळे मुनसिपल शंकर सांपडले यांच्या हातांत! साहजिक आहे. अशा शंखोबांना जरा डोळेफोड नीटनेटकें मनुष्य नांवाकरितां ओळखीचें असावेंसे वाटायचेंच! तितकीच त्यांची कीर्ति वाढते!

कपिलाः—अग पण, आधीं होता वाघ्या मग झाला पाग्या! पण आपला त्याचा येळकोट कांहीं जाईना! तो फुरफुरला कीं लागलींच! लागला वेडेवेडे चार करायला! त्याला म्हणे आतां चांगल्या सुशिक्षित नागरिकांत मिसळण्याची हौस सुटली आहे. त्याला अगदीं हाय्यर सोसायटीचा जंटलमन बनायचें आहे.

कोकिलाः—असें का! म्हणजे? पुन्हा बसला वाटतें धूळपाटीवर श्रीग करायला? मुनसिपालिटींत येतो म्हणतो कीं काय?

कपिलाः—अग! कर्माची कहाणी तर तीच आहे! नुसता मुनसि-

पल शंकरच नव्हे! अगदीं अगदीं नगरनंदी करा म्हणतो आहे! प्रेसिडेंट करा म्हणतो आहे!

पांडोबा:—हं! कसंतरी पाठीला शेण लावून बैल म्हणा म्हणतो आहे झालें!

कपिला:—आतां म्हणे त्यानें इंग्रजी शिकायला सुरवात केली आहे! सगळें सगळें शिकायला सुरवात केली आहे. अष्टौप्रहर खळ नाहीं मुळीं हातापायाला.

कोकिला:—तूं कोणची कला शिकवते आहेस त्याला? कांहीं का विषय ठरेना, तूं नाहीं म्हणा कोणत्याही विषयाला अडून पडायचीस! तसं आमच्या सुईणींचें नाहीं ग! आमचा एक विषय म्हणजे आरोग्य! आणि त्याचेच सगळे प्रकार! तसें तुम्हां मास्तरणींचे नाहीं! तुमचे म्हणजे नाना विषय अन् नाना प्रकार! बाकी कपिले, ही वेळ आहे बघ तुझी आतां. अशा नंदीबैलाकडून आपलें जन्माचें कल्याण करणें म्हणजे कांहीं पाप नव्हे, ह्या राष्ट्राच्या शरिरांत हीं असलीं हुराळलेलीं श्रीमंत गाढवें म्हणजे चरबीचे संचय आहेत. यांतूनच चरबीचा फैलाव होऊन राष्ट्राचें पोषण होतें! तो आहे सर्वस्वी तुझ्या वचनांत! चांगली कातरी चालीव! जसा कांहीं खिसा होता की नव्हता!

कपिला:—तें आहे ग माझ्या पूर्ण लक्षांत! पण बाई, त्याची फ्रेंड-शिप झाली हा एक आपला भोगच उभा राहिला आहे माझा! त्याच्या इथें वर्णी लावायच्या करितां जो तो माझें डोकें उठवतो आहे. या नोकरीमुळें सगळ्यांच्या तोंडावर तोंड नेहमीं पडायचें, रिकामा वाईटपणा यायचा झाले! आतां अगदींच कुणीं गळ घातली, म्हणजे देत्ये झालें एक शिफारसपत्र खरडून, मग तिकडे तुम्ही मरा, काय वाटेल ते करा—अगबाई! मंडळी आली वाटतं?

नथू:—मग चहा घालतों तर आधणांत. [जातो.

कोकिला:—(स्वगत) हेंच धेनुवल्लभाचं दान माझ्या फांशाला पडलं असतं तर! ही सोंगटी केव्हांच मुनसिपालिटीच्या पटांतून उठून गेली असती! हं! एकेकाचं नशीब असतं झालं. (उघड) तुम्ही रिसीव्ह करा सगळ्यांना, मी आंत सगळी चहाची व्यवस्था लावतें. [जाते.

कपिलाः—ठीक आहे. (प्रो० ठोंबे, चीफ ऑफिसर गायतोंडे, डॉ० बचनाग, कोंडीबा न्हावी, गद्दुलाल मारवाडी, वगैरे येतात.) यावें, यावें बसा!

प्रो० ठोंबेः—गुडमॉर्निंग, कपिलाबाई गुडमॉर्निंग!

कोंडिबाः—रामराम, रामराम.

गद्दुलालः—जय गुपाळ, जय गुपाळ!

कपिलाः—येवढें कांहीं संकोचित व्हायला नको. आपण ज्यांची नेमणूक केलीत तेच हे पांडुरंगराव. अगदीं अगदीं आपल्यांतले आहेत हो. बसा. यांच्या देखत बोलायचालायला मुळीं देखील संकोच नको कुणाला.

चीफ ऑफिसरः—हें काय सांगायला का हवं? तुमची शिफारस आणि अनाठायीं होणार? कल्पनाच नको. बसा बसा. पांडोबा, तुम्हीही बसा. कसं काय प्रो० ठोंबे! कसा काय झडला जलसा?

प्रो० ठोंबेः—रियली आय से वुइ ऑल एन्जॉइड् दॅट जलसा!

चीफ ऑफिसरः—ओ! सरटनूली प्रोफेसर, तुम्हांला नाहीं वाटत, डॉक्टर बचनाग?

डॉक्टरः—ओ! सरटनूली, चीफ ऑफिसर गायतोंडे यांचें आणि माझें अगदीं एक मत आहे. छे छे, आज अगदीं दंताडीनें बहार केली बुवा! केव्हां उजाडलें कळलें देखील नाहीं. का गद्दुलाल खरें कीं नाहीं?

गद्दुलालः—अरे भाई कांई बोल्या! चांद्री दंताडीनें घणी मजा उडाईयो है. एसा घाणा हुयोडो है की भाई म्हारे तो प्राण निकल पडीयो है.

कोंडिबाः—अशि भार उडवली बघा!

डॉक्टरः—अहो, पण आमच्या कोकिलाबाई कुठे आहेत?

कपिलाः—त्या आंत चहाची व्यवस्था करीत आहेत.

प्रो० ठोंबेः—मग अगदीं आरोग्याच्या नियमानुसार चहा होणार तर एकंदरींत!

डॉक्टरः—तें काय विचारायचें? यांच्या शिक्षणाखालींच आहे तो! आमच्या गांवांतल्यासारखें आरोग्य आणि शिक्षण हातांत हात घालून चाललेलें क्वचितच दिसेल!

चीफ ऑफिसरः—अहो, हातांत हात घालूनच काय ? गळ्यांत गळा म्हटलेंत तरी चालेल. याईपेक्षां शहरसुधारणा केली असती हो ! पण हे मेंबरलोक आहेत ना जिथें तिथें अडमडायला ! (कोंडिबा व गट्टुलाल यांस) अंहं ! तुम्ही आमच्यापैकींच ! जो मेंबर पहावा तो आपला आम्हांलाच दमदाटी करतो ! द्रौपदीला पांचाचीच छळणूक होती, पण या चीफ ऑफिसरच्या द्रौपदीला पंचवीस पांडवांची गांजणूक नेहमीं सहन करायी लागते. नेहमीं या पांडवांची गुलामी करण्यांत माझा अर्धा जीव होतो ! शहरकाम करायला फुरसत मिळते आहे कुठें ? एकेकाचा दिमाख, लहर, आणि मानमरातब, संभाळतां संभाळतां प्राण कासावीस होतो. बाकी आम्ही फार पंचायतींत जातच नाहीं म्हणा !

डॉक्टरः—बाकी तुम्ही मोठे सावध आणि धूर्त आहांत बुवा चीफ-ऑफिसर ! कायहो, तुम्हीं त्या जकातनाकें आणि शाळेच्या रिपेरीला चार हजार रुपये उकळलेत ? मी हजर होतों. मी मुळींच बोललों नाहीं त्यावेळीं.

प्रो॰ ठोंबेः—काय ? मूळच्या दोन हजारांच्या इमारतीला चार हजार रिपेरी ? आहे बुवा तुमच्यांत करामत !

चीफ ऑफिसरः—खुबी तर तिथेंच आहे. अहो, परवां थोरला रस्ता-रिपेरीला आठ हज्जार ठणकावले. नुसता दोन्ही बाजूंच्या गटारांतला गाळ रस्त्यावर पसरून रूळ फिरविला. क्यों ! याला म्हणतात काम !

डॉक्टरः—कायहो, खडीचें नांवही नाहीं ?

चीफ ऑफिसरः—अहो, या तीन शेंड्यांनीं खडींत नुसती मातीच दडपली होती. क्यों, याला म्हणावें काम, का डॉक्टर ?

कोंडिबाः—मंग तें कांहीं नाय, आनखिन योक दंताडीचा जलसा झडलाच पाहिजे, का गटटुलाल ? खरं का नाय ?

गट्टूलालः—और एक चांद्रीणे, घागरा धुंगट पिणवाकर, ईशिईशि हातपांव हिलवाकर जलसा करवाणा जरूर छे ! अरे कांई अचंबा करीयो छ्य् ? आबात ईशि हसबाजीशी नही छे !

डॉक्टरः—आहे खरें बुवा ! काय हो, तुम्हीं ती म्युझिअमकरतां तीन मजली नुस्ती दगडी बिल्डिंग उठविली; त्याचे वरचे मजले तर अगदीं झक झाले ! आतां तळमजल्यांत कसलें अजून काम सुरू आहे ?

चीफ ऑफिसरः—तें होय! पहिले दोन मजले बांधून त्यांना शोभेसा मागाहून तळमजला उठवतों आहें!

गट्टुलालः—बष् बष्, धन्य है! धन्य है! आपणा चीफ ऑफिसर तो एषा जाणो की जेषा बिश्वकर्मा है.

कोंडिबाः—व्हय्, व्हय्, अक्षी बिरामदेव हाय, अक्षी बिरामदेव हाय!

कपिलाः—पण ब्रह्मदेवाचें नुसतें पांचवें तोंडच कसें बाई यांच्या घडाला चिकटलें?

प्रो॰ ठोंबेः—देवाच्या हातून गर्दीत लागलें गेलें झालें! चीफ ऑफिसर तुम्ही म्हणतां तें बरोबर आहे. पण काय हो. त्या म्युझिअम्मधलीं चित्रें, कवडया, बाहुल्या वगैरे जिन्नस?

चीफ ऑफिसरः—अहो, त्याची नाहीं का तुम्हांला गंमत ठाऊक? तुम्हांला आहेना, कपिलाबाई ठाऊक? अहो, त्या वेळेला होते चैत्राचे दिवस! मग मेंबर लोकांनीं आपल्या इथं हळदीकुंकवाची गौर मांडायला नेलीं चित्रं! आतां नुस्ता एक कारकून नी केरसुणी राहिली आहे त्या म्युझीअम्मध्यें! छे, छे! त्यावेळची ती खिरापत, बत्तासे, पन्हीं, रस आणि कैऱ्या किसून घातलेली डाळ आठवली म्हणजे अजून दांत आंबतात माझे! एकंदरींत काय, नुसता ताबुताचा दंगा आहे झालें?

कपिलाः—अहो, मन चंगा तो कथोटमे गंगा. मन निर्मळ पाहिजे, मन साफ पाहिजे! अहो, परवां त्या ढबुराव चौफुल्यानें नाहीं का आमच्या डॉक्टरना चिठ्ठ्या देऊन गांवच्या मैलगाड्या आपल्या शेतांत रिचवल्या. मैला असला म्हणून काय झालं? मन साफ पाहिजे, मन निर्मळ पाहिजे!

गट्टुलालः—हां हां, सत्य है. मन चंगा तो कथोटमे गंगा! अरे कुंडिबा, येतो खुल्लो खुल्लो शवदो है! अरे लाखकी करो चोरी और कवडी का करो दान इशीशे कलजूगमें प्रसन्न है भगवाण. इश हात देणा इश हात लेवणा.

पांडोबाः—जे दुसऱ्यांना लांच देतात, भीड घालतात, ते स्वतः नागरिकांच्या पैशाच्या खतानें आपलें पोट पिकविणार नाहींत, असें कल्पांतीं घडणार नाहीं.

कोंडिबाः—बराबर हाय, मन शाप पाहिजे, मन शाप पाहिजे!

धोंडोपंतः—काय रंगोबा ? तुम्ही आलांत का चवकशी करून ? काय हो कशी लागली आग ?

रंगरावः—काय सांगावा तो प्रसंग ! अहो, त्याच्या घरासमोर रस्तारिपेरीचं रात्रपाळीचं काम सुरू होतं ! वाफेचा रूळ खडी दावीत होता ! आणि त्या वाफेच्या रूळाच्या एंजिनमधून सारखा ठिणग्यांचा झोत उडत होता ! त्यावर तारेच्या जाळीचं झांकण नव्हतं ! एकंदरींत कपाळ फुटलं नी घर पेटलं !

धोंडोपंतः—अररर ! काय हो, टेलिफोन नाहीं का झाला तावडतोब ?

रंगरावः—काय बोलतां तुम्ही धोंडोपंत ? टेलिफोन नाहीं का झाला ? अहो, टेलिफोन म्हणजे आकाशवाणी का होत असते ? अहो, लोक धांवले इकडे तिकडे ! दिला टेलिफोन ! पण त्या नळकंड्यांत अडकलं होतं झुरळ ! बॅटरींत पडला होता उंदीर ! आणि खांबावरची चिनीची तार गुंडाळायची दौत गेली होती फुटून ! म्हणून दिलेला टेलिफोन या मृत्युलोकावर न जातां, पाताळांत शेषाला गेला !

धोंडोपंतः—काय म्हणतां ? पण आग विझली कशी ?

रंगरावः—कसली विझते ! त्या घराभोंवतींचीं आणखी चार घरं लोकांनीं ओढून पाडलीं ! मग कुणी माती फेंकतात ! कुणी विटा, कुणी चुना वगैरे वगैरे. कुणी कांहीं कुणी कांहीं ! जेमतेम विझली झालं !

धोंडोपंतः—काय हो ? पाण्याचें नांव नाहीं ? पण आगीचा बंब नव्हता का ?

रंगरावः—अहो, नव्हता कसा ? हजर होता.

पद

अहो ! शिंग फुंकीत गेला, पाण्याचा इंग्रजी बंब ॥
मुनसिपालटीचा गेला, पाण्याचा इंग्रजी बंब ॥ ध्रु० ॥ दोन
घंट्यावरी धनि बोंबा मारी । घरिं उसळला आगीचा
डोंब ॥ आग सोमेश्वरीं बंब रामेश्वरीं लोक पाहोनी झाले
दंग ॥ १ ॥ बंबवाले सगळे झिंगले झोकुन भांग, अहो
बंबावर वितवित जंग ॥ त्याचा नळ फाटका वरि गाडा

मोडका पडलं इंजीनचं चक्रचि बंद ॥ २ ॥ हौदा पाणी
नसे नच विहीर कुठें फायर प्लगचा न लागला थांग ॥
बंब पोंचे तोंवर झाला कोळसा तिथं, घरधन्यासि होई
अर्धांग ॥ ३ ॥ अहो घंटा वाजवित आला रिकामा
पाण्याचा बंब ॥

चला आतां इतक्यांत म्युनिसिपल शंकर सर्व तिकडेच गेले आहेत आपणही जाऊं तिथं !

धोंडोपंतः—आतां अगदीं कसून तपासणी चालू या म्हणावं ? चला तर. उचला पाऊल, तिथें आपल्याला गेलें पाहिजे, नाहीं तर हे मेंबर्स आमच्या पोटाला आग लावायचे ! हं !

गंगूः—ऐकलंसना समदं ? फेक तुझा हुक्का तो आतां ! माझ्या गरिबाच्या झोपडीची देशील होळी करून !

शेखः—अरे जानेदे तेरे झोंपडीकू ! जलगई तो बला गई ! देख कल गवनूरका कप है ! बोल तेरे नामसे कितने घोडे लगा देऊं ? क्या हंसरही है ? देख एक दिन् ये नसीबका चक्कर फीर जायगा !

गंगूः—फिरतया चक्कर तुझं कबरींत आतां ? [जातात.

पांडोबाः—मनाची हौस होती ती फेडून घेतली. वर्तमानपत्र, सभा, आणि गांवांतली ओरड यांवर विश्वास बसेना म्हणून नाजूक शिफारशीनें अगदीं मुनसिपालटीच्या काळजांत शिरलों, आतां खरं इंगित कळलं. मेंबरांच्या, मुनसिपल कामगारांच्या आणि यांच्या बगलबच्चांच्या कोणाच्या कोठें आंवळे शिजतात, कोणाच्या कां पोटांत ढवळतं, कोणाची कां एवढी तळमळ चाललेली असते याचा लख्ख प्रकाश पडला. मला अत्यंत दुःखानें प्रांजलपणानें कबूल करावं लागतं कीं, ही मुनसिपालिटीचा झोटिंग पातशाही म्हणजे अत्यंत नीचपणाच्या कमालीची मानपानबाजी, चैनबाजी, नफेबाजी आणि सट्टेबाजी आहे. लोककल्याणाच्या पांघरुणाखालीं जनरल बॉडी मॅनेजिंग कमिटीवर गुरगुरते. मॅनेजिंग कमिटी अधिकाऱ्यांवर डोळे काढते. अधिकारी शिपाईप्याद्याला दमदाटी करतात आणि शिपाईप्यादे गोरगरिबांच्या माना मुरगळतात. एकंदरींत सुखसोईसाठीं आणि संरक्षणा-

साठीं दिलेला जनतेच्या कराचा पैसा चांगला घशाखालीं उतरून पचनी होऊन साफ होतो. चला, तो धेनुवल्लभ वाट पहात बसला असेल, तरी आपण आपल्या नवीन कामगिरीवर जाऊन रुजू झालं पाहिजे.

प्रवेश पांचवा

[स्थळः–धेनुवल्लभांचा दिवाणखाना]

धेनुवल्लभः—जिथें पैसा आहे तिथें सर्व कांहीं आहे! या लढाईनं तर मजा उडवून दिली! काय साला थाट आहे! आतां या जन्मांतच करून दाखवितों विद्या! विद्या विद्या म्हणजे काय बिशाद आहे! आमच्या प्रोफेसरसाहेबांनीं काय पहा शब्द सांगितला तो! हो! करतलमलवत्. तळहातांतल्या आंवळ्यासारखी विद्या हस्तगत करून टाकतों. माझ्या संपत्तीकडे बघून जशी संस्थानिकांनीं लाळ घोटावी, तशीच माझ्या विद्वत्तेकडे पाहून पंडितांनीं तोंडांत बोटें घालावीं अशी पुढच्या पावसाळ्याचे आंत विद्या संपादन करतों. आत्तांपर्यंत बऱ्याच डाकबंगल्यांना मदत दिली, धर्मशाळांना मदत केली, दुष्काळ-फंडाला मदत केली, हॉस्पिटलला फंड दिला तरी अजून सरकारांतून आम्हांला एखादें पदवीदान सुटत नाहीं! काय करावें हो! जरा एखादी पदवीबिदवी असली म्हणजे थोडा दबदबा राहतो! काय करावें? शेंकडों बंगल्यांवर खेटे घालून पायाचे टाके ढिले झाले! कांहीं वेळ तर त्या बंगल्यावरच्या बदमाश शिपुरड्यानं मला गचांड्यासुद्धां दिल्या! काय सांगूं, मला अजून आठवत आहे तो प्रसंग! मला सकाळीं बंगल्या-वर एकानं बोलावलंन् आणखी अमुक एक इस्पितळाला मदत केलीत तर तुम्हांला पदवी मिळण्याचा संभव आहे, असं तो म्हणाला मात्र, ताबडतोब दहा हजारांचा चेक फाडून दिला! दुसऱ्या दिवशीं उन्हातान्हांत धांवत बंगल्यावर गेलों. उन्हांत तळमळत दोन तास उभा होतों! शेवटीं एक शिपुरडा दिसला, त्याला माझी व्हिजिटिंग कार्ड दिली. तशी थोड्या वेळानें साहेब आंतून डॅम फूल, ब्लॅकहेड असें मोठ्यानदां म्हणत आला! तशी मला कांहीं इंग्रजी बिलकूल येत नाहीं, मला वाटलं, मी एक पदवी

मागायला गेलों, तों सरकारांतून मला तीन पदव्या मिळाल्या वाटतें! पण शेवटीं त्याचा उलगडा झाला. तो जो आला नाकासमोर तो एकदम गळचेंडी धरून बुटाचा पाय असा खुबीनें माझ्या पाठीशीं लावला कीं, जसा गलोलींतून धोंडा फेंकावा तसा तडक बंगल्यांतून सडकेवर उड्डाण करून येऊन पडलो! अगदीं सिनेमाच्या सारखें झालें! शेवटीं शिपायानें बाहेर येऊन सांगितलें कीं, बंगल्यांत मेमसाहेब साहेबाला शिव्या देत होती, तेव्हां तें मला दिसलें कीं काय असें वाटून साहेबानें मला रागानें निरोप दिला, याबद्दल साहेब बेंग पार्डिंग करून दिलगिरी दाखवितो आहे! तेव्हां माझा जीव खालीं पडला. आणि वाटलें कीं हरकत नाहीं; साहेब मनमोकळा असतो तें खरें आहे! त्याच्यांत माणुसकी होती. असो. आत्तांच त्याचं पत्रही आलं आहे कीं यंदां वर्षारंभीं कदाचित् तुम्हांला पदवी मिळेल! पाहूं या नशिबाचा योग जुळला तर! सध्यांच आमचं येत्या मुनसिपालटींत जाण्याचं कसं काय शिजतं आहे तें पहावं. आमच्या कपिलाबाईकडून मीं लावली आहे चांगली आंच! जर का हें शिजलं आणि तिकडून जर का एखादं पदवीदान सुटलं तर दुधांत साखर होईल. माझ्याकडून मी अगदीं रेसभर प्रयत्नांत कसूर ठेवीत नाहीं. कौन्सिलरला शोभेलशी रहाणी, थाटमाट, पोशाख वगैरेंत चूक काढण्याची चांगल्या चांगल्या मुरलेल्या कौन्सिलरांची सुद्धां छाती नाहीं! बरं, विद्येच्या आणि ज्ञानाच्या बाबतींत म्हणाल तर तिकडेही सारखी धुमश्चक्री चालू ठेवली आहे. अरे पांडुरंग, अरे पांडू, काय रे ती आंब्याची डाली प्रेसिडेंट रावसाहेबांच्याकडे पाठवलीस का?

पांडोबाः—होय, रावसाहेब.

धेनुवल्लभः—(अत्यंत आनंदानें) काय म्हणालास तूं?

पांडोबाः—डाली पाठवली महाराज, आत्तांच् रावसाहेब देऊन आलों.

धेनुवल्लभः—काय म्हणतोस? महाराज! रावसाहेब!

पांडोबाः—होय सरकार.

धेनुवल्लभः—काय सरकार! (त्यास कडकडून भेटतो.) अरे स्वर्गातल्या देवगंधर्वा, कोणच्या क्षुल्लक पातकामुळें पुन्हा या मृत्युलोकीं अवतरलास तूं?

महाराज! रावसाहेब! सरकार! बस् बस् बस्. मेरे पितर सरगभये! आण आण तो आरसा इकडे! आनंदाच्यामुळें चेहरा लालबुंद होत चालला आहे! नजर ठरत नाहीं आरशांत चेहऱ्यावर. पांड्या! तुला आपलं थोडं खासगी विचारतों. कायरे या गांवांत जे कौन्सीलर्स आहेत त्यांच्यापेक्षां मी अधिक रुबाबदार, उमदा आणि खानदानीचा दिसतो काय रे?

पांडोबाः—सरकार! हें काय विचारावं आणि या चाकरानं काय सांगावं! ह्या सरदारापुढें हीं कौन्सिलरं, म्हणजे नुसती मुनसिपालिटीच्या पांजरपोळांत शिरलेलीं पाठीला खोगर लागलेलीं मरतुकडीं तट्टं आहेत, बघा! ह्या माझ्या सरकारची, ह्या सरदाराची, ह्या जातिवंत खानदानीच्या अरबी घोड्याची ह्या तट्टांना सर येणार म्हणतां होय? नांव कशाला पाहिजे! सात वेळ जातकुळी बदलली पाहिजे! त्या वेळेस हीं तट्टं, ह्या माझ्या अरबी घोड्याचे नातू म्हणून घेतील!

धेनुवल्लभः—पांड्या! पांड्या! अरे पुराणपुरुषा! गजब करतोस तूं तर! घे हें माझं जरीचं उपरणं!

पांडोबाः—नको सध्यां सरकार! शेवटीं मी तुमचाच आहें! अरे हे प्रोफेसर ठोंबे आलेच.

धेनुवल्लभ—काय म्हणतोस? या! या! बसा! आपल्याविषयीं सर्व कपिलाबाईने मला पूर्वींच कळविलं आहे. बसा! तुम्हीं आपली अगदीं आईटमेंट् राखलीत बोवा. या बसा!

प्रो० ठोंबेः—काय? आईटमेंट्! हं! हं! हं! अपाइंट्मेंट् वाटतें! कसं काय? आपली तब्येत वगैरे बरी आहे ना? ठीक आहे! आपली काय इच्छा आहे शिकण्याची? कोणचा विषय? तयारी आहे माझी.

धेनुवल्लभः—सगळें कांहीं शिकण्याची आहे. हें पहा थोडक्यांत सांगायाचें म्हणजे प्रोफेसर ठोंबे, मला सगळ्या जगानें विद्वान् म्हणून मान वांकवली पाहिजे. अशी कांहीं तुमच्यांत करामत असेल तर करा! काय करावें हें सगळें लहानपणींच शिकायला पाहिजे होतें!

प्रो० ठोंबेः—कांहीं हरकत नाहीं. तुमच्यांत उल्हास, हौस आहे हें कांहीं थोडें नाहीं. अजून कांहीं वेळ गेली नाहीं (It is never too

late to mend) समजलांत कीं नाहीं. आपल्याला थोडंसं इंग्रजी येतं कीं नाहीं?

धेनुवल्लभः—होय, पण मला बिलकूल येत नाहीं असें समजूनच चला.

प्रो० ठोंबेः—ह्याचा अर्थ सत्कार्याला केव्हांही प्रारंभ करावा.

धेनुवल्लभः—इंग्रजी अगदीं बरोबर आहे.

प्रो० ठोंबेः—ठीक तर मग प्रथम कोणतं शिकवूं बोला! तर्कापासून सुरवात करूं?

धेनुवल्लभः—पांड्या! हें तर्क काय आहे?

प्रो० ठोंबेः—अहो, ह्या तर्काची बरीच भानगड आहे. मनाच्या तीन अवस्था प्रथमावस्था, द्वितीयावस्था, तृतीया—

धेनुवल्लभः—काय ज्ञान आहे! काय ज्ञान आहे! अगाध, अगम्य आहे! हें फार भानगडीचं आहे बाबा!

प्रो० ठोंबेः—ठीक आहे! मॉरल फिलासफी शिकवूं?

धेनुवल्लभः—पांड्या! हें काय नवीन लचांड?

प्रो० ठोंबेः—यामुळें आत्मसंयमन कसं करावं, मनोविकारांचं दमन कसं करावें, वगैरे, वगैरे, पापपुण्य!

धेनुवल्लभः—पाप! पुण्य! वगैरे, वगैरे, सगळें सत्ययुगांत जाऊं द्या! मला तर मनोविकार मुळींच दाबतां यायचे नाहींत! पांड्या! सगळा जन्म गेला मजा करण्यांत, आतां कसलं दमन शिकवितो आहे हा प्रोफेसर!

प्रो० ठोंबेः—ठीक आहे. तुम्ही फिजिक्स शिका! त्याच्यामुळें पदार्थांचे गुणधर्म, पंचतत्त्वें, धातु वगैरे वगैरे जगांतील सर्व विद्यमान गोष्टीं-विषयीं. जसें:—ढग, पाऊस, वीज, वादळ, बर्फ, गार वारा वगैरे.

धेनुवल्लभः—पांड्या! काय ज्ञान आहे! काय ज्ञान आहे! नुसतीं नांवें सुद्धां जन्मांत पाठ व्हावयाचीं नाहींत. ह्या सर्व गौडबंगालांत शिरणें म्हणजे सर्व विद्यमान जग डोक्यावर घेण्यासारखें आहे! हें पहा! तुम्हांला स्पष्ट सांगतों. मला मुनसिपालिटीचा प्रेसिडेंट व्हायचें आहे. तेव्हां तिच्याविषयीं मला माहिती सांगा!

पांडोबाः—बस्,बस्.एक घाव दोन तुकडे! याला म्हणावें मानपानबाजी!

प्रो० ठोंबेः—वा! वा! तुम्हीं मला अब्रू बचावून काढलात! ठीक

आहे ! हें काय सांगावें, आपण या वेळेस अलौकिक तारतम्य दाखविलंत ! खरोखर मी तुमची स्तुति करीत नाहीं. आपण उपजत विद्वान् आहांत.

धेनुवल्लभः—शाबास प्रोफेसरसाहेब, तुम्ही खरोखर मनुष्याची पारख करणारे आहांत !

प्रो० ठोंबेः—ठीक आहे. आपण म्युनिसिपल कॉन्स्टिटयूशनच प्रथम घेऊं.

धेनुवल्लभः—होय, मुनसिपल कानसटीपेशनच प्रथम घ्या.

पांडोबाः—झालं आहे खरंच मुनसिपालिटीला कॉन्‌स्टिपेशन, पहावं आतां धेनुवल्लभाचा जमालगोटा कसं काय काम करतो तें.

प्रो० ठोंबेः—ठीक. आपण प्रथम म्हणजे एम्. एम्. सी. नंतर एम्. एल्. सी.!

धेनुवल्लभः—होय, होय! एम्. एम्. शी. काय आहे रे पांडुरंग ?

पांडोबाः—अहो लहान मुलं 'शी' नाहीं का म्हणत ? अहो, जवळ जवळ तसेंच. मुनसिपालिटीचे लोक जी 'शी' करतात ती एम्. एम्. शी. आणि गवर्नरचे कौन्सिलर्स जी कौन्सिलांत 'शी' करतात म्हणजे घाण करतात, ती एम्. एल्. शी. घाण दोहींला सारखीच येते.

प्रो० ठोंबेः—मेंबर ऑफ धी लेजिस्लेटिव्ह कौन्सिल! आहे! आहे! तुमच्या नशिबांत तो योग दिसतो आहे !

धेनुवल्लभः—आपण फार मार्मिक आहांत बुवा ! पांडू ! उगीच विध्वान आहेत ?

प्रो० ठोंबेः—हें पहा, १९०१ च्या तिसऱ्या ॲक्टाप्रमाणें म्युनिसिपालिटी स्थापन केली. नागरिकांनीं आपल्या गांवची व्यवस्था करण्याकरितां चारपंचमांश कौन्सिलर्स निवडावयाचे. समजा, अठावीस मेंबर निवडून काढावयाचे. त्याचे चारपंचमांश म्हणजे साडेबावीस लोकांनीं निवडावयाचे व साडेपांच सरकारनीं निवडावयाचे.

धेनुवल्लभः—हा तर मोठा पेंच आहे इथें ! अर्धा कसा निवडावयाचा!

पांडोबाः—त्यांत काय आहे ? बावीस संबंध खुळचट त्यांत एक अर्धवट. झाले साडेबावीस !

प्रो० ठोंबेः—हां! बरोबर शंका आहे तुमची ! आहे खराच पेंच !

स्थानिक....३

याचा कांहीं उलगडा म्युनिसिपल ॲक्टांत नाहीं. हें मी उद्यां आमच्या कोपऱ्या क्लबचे दादासाहेब रडतोंडे वकील, यांना विचारून सांगेन! कारण हा कायद्याचा भाग पडला! असो. त्यांनीं पुढें आपल्यांत प्रेसिडेंट, व्हाइस प्रेसिडेंट, वगैरे वगैरे निवडायचे. पुढें त्यांत स्कूलबोर्ड कमिटीज्, मॅनेजिंग कमिटीज् नेमायच्या. त्यांचे चेअरमन निवडायचे.

घेनुवल्लभः—अबबूब्! या ज्ञानांत शिरणें म्हणजे अगदीं भूमध्य समुद्रांत बुडी मारण्याप्रमाणें आहे! छे! छे! ह्या इंग्रजांची राज्यपद्धति म्हणजे भारी गिचमिडीची! कोण भयंकर उलथ्यासुलथ्या कोलांट्या ह्या! कायदा शिकण्यांत जन्म जायचा, त्याप्रमाणें वागायला पुढें फुरसत रहात नाहीं.

प्रो० ठोंबेः—अहो, एवढ्यांतच काय झालं आहे! अंमलबजावणी खातीं, जकात खातीं, अबकारी खातीं, कितीतरी त्यांत अनंत खातीं आहेत.

घेनुवल्लभः—हें पहा प्रोफेसर, हा एवढा जंजाळ नको बुवा! कोण? वराहशास्त्री, या! आमचें आतां आटपत आलें आहे! थोडीं दहा मिनिटें! हें पहा आपण सांगितल्याप्रमाणें नवीन कोरा जंगी मृदंग आणून ठेवला आहे. बसा. अहो ठोंबे! हे तालनिष्णात आहेत! बसा शास्त्रीबुवा. आपणही ऐका! हं तर प्रोफेसर! हे सगळे मुनसिपालिटीच्या आकटाचे जंजाळ उलगडणें म्हणजे पुन्हा वेरूळचीं लेणीं कोरण्यासारखेंच आहे! मला येवढें ब्रह्मघोळांत न घालतां थोडक्यांत त्याचे दृश्य फायदे सांगा! म्हणजे उलगडा झाला!

वराहशास्त्रीः—काय हो? ही आपली मुनसिपालिटी तालबद्ध आहे का? का बेताल आहे? माझं तर असें मत आहे कीं, मुनसिपल प्रोसिडिंग्ज् चालू असतांना प्रेसिडेंटच्या मागें एक पखवाजी ठेवावा म्हणजे मेंबर बेताल होणार नाहींत! मीं हा ठराव पुढें मांडला होता पण कांहीं मेंबरांनीं तो हाणून पाडला.

प्रो० ठोंबेः—हा तर मोठा उंटावरचाच दिसतो, आपलं इंप्रेशन करायला बघतो आहे!

वराहशास्त्रीः—मी उटावरचा नसून पादचारी आहें! माझे ताल, वैद्यक, तशीच होमोपाथी, वगैरे हरहुन्नर पाहून येथील महाजनसभेनें मला 'सिंह' ही पदवी दिली आहे, मी आपल्या सारखाच पदवीधर आहें.

पांडोबाः—अहो, सिंहाच्या मागें ग्राम असेल !

वराहशास्त्रीः—मीही आपल्यासारखाच पंडित आहें.

पांडोबाः—अहो, पंडिताच्या मागें अरण्य असेल !

धेनुवल्लभः—आपण थोडे थांबा. बोला मला दृश्य फायदे कोणते ते ?

प्रो० ठोंबेः—ऑलराइट ! ऐका ! कमिटीज्, प्रोसिडिंग्ज्, लॉज्, बाय-लाज्, वगैरे अनंत अडचणींचे, आडवळणाचे मार्ग सोडून दृश्य फायदे किंवा थोपट मार्ग ऐका ! आपल्या दारासमोर कंदील लावतां येतो.

धेनुवल्लभः—हिअर, हिअर.

प्रो० ठोंबेः—रस्ता रुंदीची लाईन फिरून टाकतां येते.

पांडोबाः—हिअर ! हिअर !

प्रो० ठोंबेः—आपलें गटार रोज उपसून घेतां येतें.

धेनुवल्लभः—हिअर देअर, देअर हिअर.

प्रो० ठोंबेः—गव्हर्नरच्या लेव्हीला बोलावणें येतें, सर्व नागरिकांचे मुजरे घेतां येतात.

धेनुवल्लभः—काय म्हणतां ? माय गॉड ! काय ज्ञान आहे ! काय ज्ञान आहे ! काय इंग्रजी राज्य आहे !

वराहशास्त्रीः—अरे ! हा तर इंप्रेशन पाडायला लागला ! माझ्यापुढें छाप पाडायला लागला ! थापेसरशी उडवून देईन.

प्रो० ठोंबेः—चौकांतील घर नादुरुस्त आहे ते पाडलं पाहिजे. तें घर घेण्याचा मालकास धाक घालून रावसाहेबांचा दरारा कायम राखतां येतो. ह्याशिवाय सिनेमाला, नाटकाला फुकट जाणं, दूधकी लोटी, मलई नमुन्यावारी चाखणं, म्युनिसिपालिटीचा कडबा घरच्या म्हशींना घालून दूध-दुभतं करणें, मेव्हण्याचें उकिरडाखिडार स्टोअर ठेवण्याकरितां दोनशें रुपये भाड्यानें घेणें, किंवा मार्केटच्या गाळ्याच्या परवानगीच्या धाकानें भाजीपाला, फळफळावळी चरणं, पानाला हात लावूं नये अशी म्युनिसिपल गार्डनला पाटी लावून पब्लिक गार्डनमधील मोगऱ्यांच्या कळ्यांच्या वेणीचा आपल्या पात्राकडे रतीब लावणें, असे अनंत पोटभेद आहेत.

धेनुवल्लभः—तादृश्य फायद्यांचे तर डोंगरचे डोंगर आहेत. पण कायहो, त्या गरीब लोकांना कांहीं पैसा मोबदला द्यावा लागत नाहीं ? मज

आहे. परमेश्वरा ! पुढें सात जन्म जरी उंसाच्या फडांत जन्माला घातलंस तरी ह्या जन्मीं प्रेसिडेंट होण्याचं भाग्य माझ्या ललाटीं नसलं तर निदान मेंबर तरी कर, एवढी तुला हात जोडून या धेनुवल्लभाची काकुळतीची विनवणी आहे ! काय ज्ञान आहे ! काय अधिकार आहे ! काय फायदा आहे ! काय न्याय आहे ! पैसा मोबदला द्यावा लागत नाहीं ! पांड्या ! काय ज्ञान आहे ! काय कायदा ! काय फायदा ! काय न्याय आहे !

पांडोबाः—सरकार, हा न्याय पूर्वापार चालत आलेला आहे:

पद

जगिं धन्या धत्तुरा गड्या मलीदा मिळतो । हा न्याय
असाची असतो ॥ध्रु०॥ प्रतिवादि उपाशी मरतो ॥ रोगीहि
क्षयानें जातो ॥ वेश्यारत भणंग बनतो ॥ परि वैद्य,
वकिल, वकलाचा हा वकार विजयी असतो ॥१॥
मावळा शेत पिकवीतो । कुणितरी धरण बांधीतो ॥
जलसमाध सकलां देतो ॥ पळवुनी चोर गरिबांचे
उलटी हकाटी करितो ॥२॥ अधिकारि बिगारी धरितो ॥
मोबदला लाथा देतो ॥ पानथरीस सूज चढवितो ॥
जो बळी तोचि गरिबांच्या धरोनि काना पिळतो ॥३॥

वराहशास्त्रीः—पहा, सगळं पद तालांत म्हटल्याबरोबर कसं गोड लागलं तें ! कोणच्याही कारभारांत ताल पाहिजे ! राष्ट्राराष्ट्रांत ताल नाहीं म्हणून लढाया होऊन बेताल होतात. अगदीं प्रचारांतली म्हण ! ताल सोडला !

धेनुवल्लभः—वाहवा, काय ज्ञान आहे ! काय ताल आहे ! काय ताल आहे !

प्रो० ठोंबेः—अरे, हा छाप पाडायला लागला ! तुम्ही मूर्ख आहांत.

वराहशास्त्रीः—सरदार ! हे शतमूर्ख आहेत ! सरदार ! माझं म्हणणं तर ऐका ! तालांत काल आहे आणि कालांत ताल आहे. ताल त्रिकाल अबाधित आहे.

धेनुवल्लभः—प्रोफेसर ठोंबे, तुम्ही जरा थांबा! बोला, बोला कोणते ताल आहेत? त्यांचीं नांवें तर घ्या म्हणजे मला कोणचा प्रथम शिकावा तें कळेल.

वराहशास्त्रीः—ऐका महाराज! आदिताल, एकताल, चौताल, सुरफाक्ता, झंपा, धमार. हे सर्व ताल डफ, खंजिरी, चौघडा, मृदंग, ढोल, दुंदुभी यांवर वाजवितां येतात! ही अशी विद्या आहे कीं, नुसता जर गजपर्ण बोल काढला तर मस्त हत्ती देखील चीं चीं करीत परत फिरतो!

धेनुवल्लभः—अहो! बोला! तुमचा धमार आणि सवारी मला अवश्य शिकला पाहिजे! माझी नैसर्गिक प्रवृत्ति नेहमीं वीररसाकडे झुकते! मला शामळट, नेभळट, पुळचट मेंबर व्हायचं नसून चांगला बाणेदार, पीळदार प्रेसिडेंट व्हायचें आहे! काय हो! या धमार सवारीनें स्फुरण चढतें कीं नाहीं?

वराहशास्त्रीः—तें काय विचारावें सरकार! ही पहा सुरुयातच करतों. मारला चीत हा प्रोफेसर!

प्रो० ठोंबेः—काय थापा मारतो! म्हणे चीं चीं करतो! अरे, हा तर इंप्रेशन पाडून गेला!

वराहशास्त्रीः—तुमच्या वडिलांनीं फक्त तुमचें नांव ठेवण्यांतच अक्कल दाखवली आहे. ऐका सरकार, धमार आणि सवारी! जर आंगरख्याचे बंद तटातट तुटले नाहींत तर नांव बदलून देईन—

धेनुवल्लभः—वाहवा! पांडबा, तरवार आण! अवसान आतां अगदीं झेपत नाहीं.

प्रो० ठोंबेः—अरे अरे! ह्या शास्त्र्यानें डाव जिंकला. अहो, हें गौणशास्त्र आहे.

वराहशास्त्रीः—तुझीं सगळीं कॉलेजांतील शास्त्रें ह्या मृदंगांत मीं कोंबून ठेविलीं आहेत. ऐका आतां धमार!

धेनुवल्लभः—बोला धमार! (तरवार उपसून उभा राहतो.) पांडुरंगा संभाळ! मी अवसानांत चुकून वार करायचा! विरश्री बेफाम चढली आहे!

पांडोबाः—काळजी नको! बोला धमार.

वराहशास्त्रीः—धि धि धि धिरकिट, धिडनग कत्ता गदिगन, नाना

धिट नगधी घडन्न गन्ना कत्ता गदिगन धुंधुं तिटि तिटि, त्रकिट किट, बदिगन धी.

धेनुवल्लभः—(बोल ऐकत असतांना तरवार पाजळतो. मध्येंच बैठक व अवसान घेऊन वार करण्यास थांबतो, शास्त्री अरेरेरे म्हणत मृदंग पुढें करतो) बोला! या वेळेस मी मुनसिपालिटीचा प्रेसिडेंट कमांडर इन् चीफ शोभतो कीं नाहीं ?

प्रो० ठोंबेः—अहो शास्त्रीबोवा! काढा पिढा, होय म्हणा!

सर्वः—सेनाखासखेल, मुनसिपल कमांडर इन् चीफ सरदार धेनु-वल्लभकी जय!

पहिला अंक समाप्त



घेनुवल्लभः—बोला ! मी मुनसिपालिटीचा कमांडर इन् चीफ शोभतो का नाही ?   [पृष्ठ ३८.

अंक दुसरा

प्रवेश पहिला

[स्थळः-रस्ता. पात्रेंः- अंबू व रंगराव.]

अंबूः—रंगराव ! अकशी चेहरा पडलाया तुमचा ! चीफ ऑफिसरनं मारल्या व्हय कमरेंत लाथा काम चुकवलं म्हून ?

रंगरावः—तसं नव्हे ग अंबे ! अलिकडे तुला पाहिलें म्हणजे माझ्या पोटांत कसें भडभडून येतें. काय करायचें ? आपल्यासारखं प्रेम सगळ्या मुनसिपालिटींत कोणाचं असेल तर शपथ. आपल्या सुइणीचं आणि डॉक्टराचं, कपिलेचं आणि धेनुवल्लभाचं, आपल्या चीफ आफिसरचं नी चंद्री दंताडीचं, वराहशास्त्र्याचं नी ठकूमावशी सैंपाकिणीचं, कोंडीबाचं आणि माळणीचं, ह्यांचं प्रेम आपल्या पासंगालासुद्धां लागणार नाहीं ! पण काय करायचं ? काय ग, तुझंही पण माझ्यावर प्रेम आहेना ?

अंबूः—हें काय बरं असं विचारतां रंगराव ? मी तर तुमच्या पायाचं खटकूर आहें. ह्यो पघा रंगराव, मी जरी म्हारीन असल्यें, तरी तुम्हासंग मला महाराणीसारखं सुख होतंया पगा ! तुमी दिसभर नंदर पडला नाहीं म्हंजी मला कसं रानांत चुकलेल्या हरनीवानी होतंया पगा !

रंगरावः—अग अग, अंबे, अंबे, तुझ्यापुढं कलमी अंबे देखील गोर्डीला फिके पडतील बघ; या आनंदामुळे उडी मारून आकाशांतल्या चंद्राला लोंबकळून जावेंसे वाटतें बघ ! किती गोड बोलतेस तरी तूं !

पद

गोड बोला बोलून जीव नादिं लाविला ॥ भोळ्या मनाला
जादू माझ्या केला ॥ध्रु०॥

अंबूः—तुम्हाविण दुनिया ओस दिसे ही मनिं मुळिं मज
गोड वाटेना ॥ मासळि पान्याविन तळमळ करी ॥

रंगरावः—वेडापिसा हा रंगराव झाला ॥ १ ॥

छे, हें असं चोरटं प्रेम कांहीं कामाचं नाहीं! ह्यांतून मार्ग शोधून काढलाच पाहिजे! कारण सध्यांचं म्हणजे धर्मशाळेंत निद्रा, अन्नछत्रीं जेवण, असं चालू आहे. कांहीं तरी कायदेशीर इलाज पाहिजे. (ती जवळ येते.) अग, असें नेहमीं नेहमीं चारचौघांच्या देखत माझ्या अंगाशीं खेटून शिवाशीव करूं नकोस. किती झालें तरी तूं महारीण आणि मी पडलों क्षत्रिय! काय करावें? एकीकडे माझी जात आणि एकीकडे तुझें महारणीचं प्रेम! मला मोठा पेंच येऊन पडला आहे! आमच्या जातीनें मोकळीक ठेविली नाहीं, धर्माची आज्ञा नाहीं, मुनसिपालिटीचा तसा कायदाही नाहीं!

अंबूः—पन रंगराव, काढाना कांहीं तरी तुमी विलाज! कायद्याची लई अडचण पडलीया खरंच! पदोपदीं नडतोया कायदा!

रंगरावः—या जातीच्या, धर्माच्या, मुनसिपालिटीच्या कायद्यामुळं माझी कशी चारचौघांत कुचंबणा होऊन राहिली आहे–गळचेपी झाली आहे पहा! या दुष्ट, हरामखोर कायद्यामुळं चारचौघांच्या देखत आपल्या दोघांना असं केंविलवाण्या तोंडानं एकमेकांकडे पाहून गुपचूप बसावं लागतं. (एकमेकांकडे केंविलवाणें पाहतात.) ह्या दुष्ट कायद्यामुळें, काय करावें, असं खिन्न होऊन मान खालीं घालावी लागते. (खिन्न होऊन माना खालीं घालतात.) काय करावं, ह्या निर्दय कायद्यामुळें असं सरते-शेवटीं लांब लांब बसून, निराशेनें, दुःखाचे सुस्कारे टाकून प्रेमाचे हुंदके देत रडावं लागतं. (दोघें लांब बसून, श्वास सोडून हुंदके देतात.)

अंबूः—रंगराव! जर का मुनसिपालिटीचा कायदा असता, तर बघा चारचौघांच्या समोर असं हंसऱ्या तोंडानं येकमेकांला डोळ्यानं खुनावलं असतं! (त्याप्रमाणं खुणावतात व खिन्न होतात.) पन काय कारायचं, तसा कायदा नाहीं! जर का कायदा असता (उठून उभे राहतात.) तर चारचौघांत असं येकमेकांसंगं ख्येटून उभं राह्यलों असतों! (खेटून उभे राहतात.) पन काय करायचं! कायदा नाहीं! (लांब होतात.) जर का कायदा असता, तर असा येकमेकांच्या खांद्यावर हात ठेवला असता! (तसें करितात.) पन् काय करायचं! कायदा नाहीं. (लांब होतात.)

रंगरावः—जर का कायदा असता, तर चारचौघांच्या देखत एक-

मेकांला आलिंगून असा गळ्यांत गळा घालून तुझ्याशीं मोहतूर लावला असता! (खांद्यावर हात टाकून गळ्यांत गळा घालतात.) पन काय करायचं! अरे, अरे! काय कायदा आड येतो पहा आमच्या?

अंबूः—आतां ह्या कायद्याला काय विलाज करावा! लई भंडावलं कायद्यानं!

रंगरावः—हरकत नाहीं! सांपडला इलाज! आधीं माणूस कीं आधीं कायदा?

अंबूः—आधीं माणूस मंग कायदा!

रंगरावः—शाबास! कायदा कुणीं केला?

अंबूः—माणसानं!

रंगरावः—आपणही माणसंच आहोंत! आहांत ना? तर मग त्या कायद्याचं पुस्तक माजिस्ट्रेटाच्या आणि वकिलाच्या गळ्यांत बांधून हा माणूस निराळ्याच कायद्यानं देवासमोर शपथ वाहून तुझ्याशीं मोहतूर लावून टाकणार! कबूल तुला?

अंबूः—द्येवासमोर अक्शी कबूल म्होतूर! पन रंगराव—

पद

म्होतुर झाल्यावरी मी सांगेन तसंच ऐकायचें ॥ ध्रु० ॥
तपासणिच्या वेळीं ह्कडतकड कुठें तिरव्या डोळ्यांनीं
नाहीं तुम्हीं पहायचं॥ वांकडी टोपी करून रात्रीं आठा-
पुढें घराबाहेर नाहीं भटकायचं ॥१॥ चिरिमिरी म्हणा,
पगाराचे तसं सम्द रुपय माझ्या हातीं द्यायचे ॥ इष्क-
बाजी करून, चहाभजीं खाऊन दारू पिऊन नाहीं
झिंगायचें ॥२॥

रंगरावः—पण तूं देखील अंबे—

अदळ अपट करून, गाडगींमडकीं फोडून शिव्यागाळीनं
नाहीं रागावायचें ॥ माझा डोळा चुकवून मोठ्या पहांटे
उठून गल्लीबोळांत नाहीं धुंडाळायचें ॥

अंबूः—**चिमणाचिमणीवाणी येकांमेकांसंग,**

रंगरावः—(एकमेकांच्या गळ्यांत हात घालून तिच्या हनुवटीस हात लावून) **गोडीगुलाबिनें नांदायचें** ॥५॥

चल तर त्या देवासमोर ह्या कायद्याची खोड मोडून टाकूं. [जातात.

प्रवेश दुसरा

[**स्थळः**–म्युनिसिपल दवाखाना. **पात्रें**:–धोंडोपंत, अंबू, डॉक्टर, कोकिला व रंगराव.]

धोंडोपंतः—ह्या रोग्यांचीं औषधं खलतां खलतां मी आजारी पडायची वेळ आली आहे! आमचा डॉक्टर बचनाग आणि कोकिला सुईण गांवाच्या मागें सारखीं हात धुवून लागलीं आहेत, तरी गांवची मृत्यु-संख्या अजून कायमच आहे! कारण आमचा हा धर्मार्थ दवाखाना, आणि गांवांतले दुसऱ्या डॉक्टरांचे दवाखाने म्हाताराकोतारा, तापकरी, दमेकरी, केसिसचा तावडतोब निकाल लावून टाकतात! कोणचीही सिरीअस केस उलगडल्याशिवाय राहिली आहे असं मला तर आठवत नाहीं! राम! राम!! राम!!! घंटाभर कुटतों आहे! घाम सुटला मला; पण अजून याला ढिम्म नाहीं! आतां तर बत्ता हालतां हलत नाहीं! दोन्ही हातांनीं उपटला तरी निघत नाहीं. नारायण! छे! छे! हें खलबत्याचें प्रकरण कांहीं ठीक दिसत नाहीं! ठेवून देतां झालें! दोन मजूर इकडे तिकडे ओढायला लागल्याशिवाय हें कांहीं लचांड सुटणं शक्य दिसत नाहीं! हें औषध खाणाराचं शेवटचा राम म्हणायला नुसतं नरडं उघडलं तर मला विचारा! आपण आतां टेबलावरचीं स्टॉक मिक्श्चर्स करून ठेवावींत झालं! अंबे, बरं झालं तूं आलीस! पाणी आण तिकडून! (अंथरुणावरचा रोगी कण्हतो) लागलास का तूं घुमायला?

एक रोगीः—अरे! मला थोडं उठवून तिथलं जरा कुणीतरी थोडं मांडं द्यारे! अग आई! अग आई!!

अंबूः—हतं येऊन मराया गोड वाटतंया येसनी! अर ये बाबा!

दिसांतन घोटभरबी पानी पीत नाहींस आन् दिसांतन पन्नास वेळ भांडं मागतुयास, तवा हायतरी कुटला तुझ्या पोटामंदी समुंदर!

घोंडोपंतः—कायरे बाबा अगस्ती! दवाखाना ठेवशील ना जाग्यावर?

दुसरा रोगीः—अरे मला अतिशय भूक लागली आहे रे! अजून मला घोटभर देखील दूध मिळालं नाहीं रे! कोणी दूध द्यारे!

अंबूः—घोंडोपंत! दूध मागतोया पगा?

घोंडोपंतः—द्यायना? मग पाज त्याला!

अंबूः—अतांचं दूध नाहीं येत लवकर दवाखान्यांत! हा नवीन पावना आलाया दवाखान्यांत. घोंडोपंत, तुम्हीच पाजा ह्यासनी! अरे बाबा, असं समद्यांचं इवाळनं ऐकून आम्हांसनी उमाळा येऊं लागला तर त्येच पलंगावर पडायची आमास्नीबी पाळी येयची! इकत्यांत काय घाड भरणार है तुमास्नी! थांब अगुदर पानी आनतेंया!

[बकेट घेऊन पाणी आणण्यास जाते.

घोंडोपंतः—दूध मागतो आहे! ठेवलं आहे याच्या बापानं! बाकी मुनसिपालिटीच्या बजेटांत नसतं असं नाहीं मात्र! अहो, डॉक्टरच्या इथं रोज चार चार घंगाळ दूध, चहा, कॉफी नी कोको झडतो आहे! चिकन, ब्रॉथ, बिस्किट, आरारूट, फळफळावळ यांच्या तर ठिकऱ्या लागल्या आहेत! त्यानं आज उभ्या वर्षांत घरीं दिव्याला तेल आणलं असेल तर शपथ. नुसते दवाखान्यांतले काडलिव्हर ऑईलच जाळतो आहे! [अंबू येते.] आलीस! बरं झालं! तूं जरा यांना पहा! मी तेवढीं स्टॉक मिक्श्चर्स करून ठेवतों!

अंबूः—घोंडोपंत, आज नळाच्या पान्याला लई घान मारतीया बघा! तोंडांतबी घालवना! थोडं थोडं किडेबी दिसत्याती!

घोंडोपंतः—असूं दे, किडे नि घाण! औषधानं जाईल छपून त्याची घाण आणि किडे तर उलट चांगले! जास्त पौष्टिक पाणी! टॉनिक वॉटर!

एक रोगीः—अरे, आज औषध नाहीं रे मिळालं कांहीं, माझा सारखा डोळा खुपतो आहे! आग होती आहे भयंकर!

धोंडोपंत:—अंबे, ओत हें त्याच्या डोळ्यांत! अजून लोकांचे डोळे उघडेनात! उघडतो कीं मिटतो आहे देव जाणे!

[अंबू औषध कानांत ओतते.

एक रोगी:—अग अग अग! डोळ्यांत घालायचं तें कानांत काय टवळे ओतलंस?

धोंडोपंत:—बरं! बरं! तोंड किती करतोस? येईल कानांतून थंडोसा डोळ्यांना! तें बोरीकलोशन आहे. दोन्हीकडे चालतं!

अंबू:—हिंग असं! मीबी पाहतीया नव्ह का आज आठ वर्सं! काय बाई! टवळे म्हनतुया! दम! मिळेल आतां तुसनीबी भांडं!

धोंडोपंत:—आज आमची ही कोकिला-बचनागाची दुकल कुठं झुकली आहे कुणाला ठाऊक! मुनसिपालिटी मातोश्रीनें आहेच तैनातीला मोटार दिलेली! बसले असतील झालं—कुठंतरी लताकुंजांत मजा मारीत, नाहीं तर प्रायव्हेट व्हिजिटिंगमध्यें पैसे उकळीत! सर्व जग आपसांत एक-मेकांच्या मूर्खपणावर पोट भरतें आहे झालं! पेशंट आणखी आले वाटतं! काय हो, काय आहे? (३-४-५ नंबरचे रोगी येतात.)

तिसरा रोगी:—काय हो, डॉक्टर नाहींत का इथं?

धोंडोपंत:—ते काय रिकामटेकडे आहेत इथं बसून रहायला?

तिसरा रोगी:—आम्हाला एक वेळ तपासून घ्यायचं आहे हो! आम्हीं फार वेळ खेटे घातले! आज भेट करवाच आमची!

धोंडोपंत:—किती फाजील बोलतां हो! इथं तपासून घ्यायचं असेल तर फी द्यावी लागेल! काय? आहे कबूल?

तिसरा रोगी:—अहो, हा मुनसिपालिटीचा धर्मार्थ दवाखाना आहेना? मग फी कसली मागतां?

धोंडोपंत:—कायदेशीर जरी दवाखान्यांत घेतां येत नसली, तरी राजीखुषीच्या कायद्यानं पेशंटांनीं डॉक्टरच्या खिशांत फी टाकलीच पाहिजे! असलें कबूल तर उभे रहा नाहींतर चला उचला पाय!

तिसरा रोगी:—रोगपरीक्षेबद्दल मोठी ख्याति आहे यांची. जाऊं द्या फी पडली तर. बरें आहे! कबूल! देतों फी!

धोंडोपंत:—ठीक आहे! (द्या त्याच्या आजोबाचें कर्ज!) हें पहा,

त्यांना भयंकर कामं असतात! सॅनिटेशन आहे, गांवसफाई आहे! सगळा गांव रोज पालथा घालावा लागतो त्यांना! आतां येतील की लागलींच पांच मिनिटांत जातील! उगीच त्यांचा वेळ नको मोडायला! काय फी आणली आहेत? ठीक आहे! धरा डाव्या हातांत! उजव्या हातानें दोन्ही पापण्या वर करून डोळे ताणून, जीभ लांब काढून असे रांगेनें उभे रहा! डॉक्टर आल्याबरोबर घडघडघड काय होतं तें सांगा! म्हणजे ते लागलींच रोग ओळखून औषध देतील! चला आटपा! पेशंटांच्या रोगांची काय डॉक्टरला स्वप्नें पडतात थोडींच? हे पहा आलेच. ही त्यांची मोटार! [डॉक्टर व कोकिला येतात.

डॉक्टरः—सकाळपासून शंभर व्हिजीटस् झाल्या! हा पहा खिसा फुगला आहे नोटांनीं! पोटीस बांधा, शेका, बर्फ ठेवा, दूधसोडा घ्या; हवा-पालट करा, ह्या कुशीचे त्या कुशीला व्हा; याशिवाय तोंडांतून शब्द काढला असेल तर शपथ! तुमचें कसं काय?

कोकिलाः—आपलाच कित्ता मी गिरवितें आहे!

डॉक्टरः—नो! नो! तुमचा कित्ता मी गिरवितों आहे! वेल! मीं हे रोगी प्रथम संपवितों! कायरे कसं काय आहे?

तिसरा रोगीः—एका वर्षामागं जसा होतों तसाच आहें.

डॉक्टरः—ठीक आहे! फीचा हात खालीं कर! (घेतो) धोंडू! नंबर एक क्विनीन मिक्श्चर! [रोगी धोंडूकडे जातो.

धोंडोपंतः—घे लेका, बापजाद्यापासूनचें क्विनीन मिक्श्चर!

तिसरा रोगीः—काय हो? किती दिवस असेंच औषध घ्यावें लागणार?

धोंडोपंतः—जगांतून क्विनीन, डॉक्टर किंवा तूं संपेपर्यंत! चल, बेतोस का नाहीं? नाहींतर तो पाहिलास ना? (एनिमा दाखवितो.)

तिसरा रोगीः—अबब्ब् घोड्याची देखील छाती नाहीं हा एनिमा घ्यायची!

डॉक्टरः—हात खालीं! जाव, टॉनिक मिक्श्चर! आज वर्षभर औषध देतों; कायरे झालं तुम्हांला बरें न व्हायला? [तिसरा रोगी जातो.

पांचवा रोगी:—डॉक्टरसाहेब, काय भयंकर ऊन लागतं आहे! उन्हाळे भयंकर लागले आहेत!

डॉक्टर:—धोंडू हाफ पाऊंड मॅग्नेशिया! अर्धा पाऊंड एरंडेल!

पांचवा रोगी:—कायहो धोंडोपंत, लवकर बरं वाटेल ना?

धोंडोपंत:—हं चला! आधीं औषध घ्या मग सांगतों! उन्हाळे लागले होते ना? जा आतां पावसाळे सुरू होतील!

कोकिला:—डॉक्टर, दर वेळेस थरमामेटर लावलंच पाहिजे का?

डॉक्टर:—तर? त्याशिवाय तपासणीला शोभाच नाहीं! अंगठ्याला नुसती ठेंच लागली असली तरी हा सेरिमनी झालाच पाहिजे! (इतक्यांत एकजण पत्र घेऊन येतो व देतो.)

डॉक्टर:—ओहो! वंडरफुल! काय? कपिला आणि धेनुवल्लभ एंगेज्ड्? कॉंग्रॅच्युलेशन्स्! कॉंग्रॅच्युलेशन्स! हार्टी कॉंग्रॅच्युलेशन्स! वेल्! कोकिल, सी धिस्! कपिलेनं अघाडी मारली शेवटीं तुमच्या!

कोकिला:—मला तरी वाटलंच होतं हें भाकित! बरं झालं! येवढं नाहीं कांहीं मोठंस वाखाणण्यासारखं झालं! आतां उगीच मनात चुरमुरे खाऊन काय उपयोग!

डॉक्टर:—हो, बरी आठवण झाली! धोंडू! हीं घे चार प्रिस्क्रिप्शन्स्! आपले गट्टुलाल कौन्सिलर! पोटॅश आयोडाईड, मिक्श्चर! तावडतोब रवाना कर! तसेंच प्रोफेसर ठोंब्यांना कोबायनामिक्श्चर! चल तावडतोब. तसेंच ६०६ सॅल्व्हरसम् इंजेक्शन् वराहशास्त्र्यांना घ्यायचं आहे तिकडे मी जातों! कमलांग, कोकिल लेट अस गो! चला प्रथम धेनुवल्लभाकडे जाऊं!

एक रोगी:—अं अं! अहो डॉक्टर, मला पहा हो!

डॉक्टर:—अरे, हा पुन्हा कण्हायला लागला! मीं म्हटलं यानं आपलं आख्यान आटपलं असेल! इतकी आम्ही ओढाताण करीत आहों तरी नशिबाची दोरी बरीच बळकट दिसते! धोंडू, त्याला काय होतं आहे पहा! विचार!

रंगराव:—(सलाम करतो) सर्व खैरियत आहे! नागमोडीच्या बोळांतलें मेन गटार तुंबून फुटल्यामुळें समोरच्या दोन घरांतलीं माणसें बुडून मेलीं! तुम्हांला वर्दी द्यायला प्रेसिडेंटनीं सांगितलं आहे! बाकी खैरियत!



डॉक्टरः—यू गो टु हेल् विथ युवर खैरियत !

[पृष्ठ ४७.

डॉक्टरः—ओ! ड्रॉऊनिंग केसिस! ऑल राईट! एनिथिंग मोअर?

रंगरावः—वेताळपेठ चौकांतील पाया खचल्यामुळें, आज चार महिने झुलत्या मनोऱ्यासारखीं झालेलीं दोन, तीन मजली घरें, कोसळून घरांतल्या भाडेकऱ्यांचीं बायकामुलें आणि रस्त्यांतल्या चार माणसांचा चेंदामेंदा झाला! बाकी सर्व खैरियत!

डॉक्टरः—ओ! कांपाउंड फ्रॅक्चर्स? स्कल फ्रॅक्चर्स! एनि मोअर?

रंगरावः—गांवच्या सेटलिंग टॅंकमध्यें कॉलऱ्याच्या रोग्यांचे कपडे धुतले गेल्यामुळें शहरांत धडाकून कालरा सुरू झाला आहे! बाकी खैरियत आहे!

डॉक्टरः—ओ! कॉलरा एपिडेमिक! कालरा केसिस! एनि मोअर?

रंगरावः—इन्फ्लुएन्झा, क्षय, देवी, प्लेगची मृत्युसंख्या कालरात्रीं बारा बाजेपर्यंत एकंदर १५० सच होती! बाकी सर्व खैरियत आहे!

डॉक्टरः—लिट्ल् मोअर, ए बिट मोअर, किंचित् जास्त आहे! वेल, एनि मोअर?

धोंडोपंतः—अहो रंगराव, सांगून टाका; सगळा गांव पेटायचाच काय तो शिल्लक आहे बाकी सगळी खैरियत आहे!

डॉक्टरः—गो टू हेल विथ युवर खैरियत! कमलांग! कोकिल!

रंगरावः—हो, बरी आठवण झाली धोंडू, माझ्या घरांत सगळीं माणसें ओळीनें अंथरूण पसरून पडलीं आहेत रे, हिंवानें पटईपर्यंत थडथड उडताहेत! कांहीं तरी तुझ्या बचनागाला सांगून चांगलें औषध बनवून देरे!

धोंडोपंतः—बचनाग देणार कपाळ तुझं! याचा गडबडगुंडा पहातां पहाता जन्म गेला माझा! आमच्या डॉक्टर बचनागाच्या गडबडगुंड्याचा एक कटाव केला आहे! तो पाठ करून टाक! (कांहीं रोगी येतात) ऐका लेकांनो, तुम्हीही ऐका. आज हा धोंडोपंत खलबत्ते सर्वत्रांना फुकट विद्यादान करतो आहे! म्हणजे कांहींतरी तुमच्या खेपा चुकतील. हं हा घे. म्हण मोठ्यानदां!

रंगराव:—

पद

डॉक्टरजीचा गडबडगुंडा पठण करा रे हा निका। पुन्हा न त्याच्या मुखावलोकनिं वरचेवर येइल घटिका। ॥ ध्रु० ॥ हिंवतापावरि घे क्विनाईन। डोकेंदुखिवरि फिनॅसिटिन। अमांश हगवणी क्लोरोडिन। घे जंतकृमीवरि सँटोनाइन ॥१॥ बलपुष्टीवरि ईस्टर्न सायरप्, लोह्, कॉडलिव्हर, स्ट्रीकनाइन! बद्धकोष्ठ जरि मॅग्निशिया घे, कानिं ओपियम ग्लिसराईन ॥२॥ नामर्दीवरि कॅनथार्डिस घे, ठणक सुजेला आयोडिन! दाढदुखीवर कापुर कोकेन, शिणभागावरि पोर्टवाईन ॥३॥ डोळ्यावरतीं बोरिकलोशन। गांठ गळूंला फोमेंटेशन। क्षयावरि घे स्कॉट् इमलशन। प्लेगालागीं इनाक्युलेशन। गोंवर मधुरा सेग्रीगेशन। देवीलागीं व्हॅक्सीनेशन। हिंवतापाला घे इन्जेक्शन। हड्यावर्ण जरि अँपुटेशन। कांहीं रोगां सरकमसेशन। उपदंशावरि आयोडाईड। उन्मादावरि घे ब्रोमाइड। खरूज नायटे झिंक आक्साईड। कामापुरतीं सांगितलीं हीं नित्य करावीं श्रवण पठण॥ ऐक प्रतिज्ञा गुण जरि न ये डॉक्टरजीचा बा लटका! ॥

घोंडोपंत:—आणि जिवाला कंटाळलाच असला तर चार मोठ्या डॉक्टरांची मीटिंग भरवून, ते, आपलें उंदराला घालतात तें बेरियम् सलफाईड? ह ढोसा! आणि पासोडी घेऊन निजून रहा! बिचारं असं मनमोकळं औषध आहे कीं, उंदीरघुशीला घाला, गोरगरिबाला घाला, संस्थानिकाला घाल, राजाला घाला! मुळींच दुजाभाव नाहीं! पंधरा मिनिटांत साफ! चंबूगवाळें आटपून एकदम महाबळेश्वरच्या ऐवजीं कैलासाचा रस्ता! बरेच दिवस तुम्ही खितपतां, पाहिजेका कोणाला? चला रंगराव, एवढीं कौन्सिलरांचीं औषधं बनवून आलोंच तुमच्या मागोमाग!

प्रवेश तिसरा

[स्थळः—धेनुवल्लभाचे घर. पात्रेंः—धेनुवल्लभ, कपिला व पांडोबा.]

धेनुवल्लभः—याला म्हणावं चातुर्य! याला म्हणावं नशीब! येवढी मोठी विद्वान् पंडिता; पण आणिली कीं नाहीं घेरून! पहिल्या दिवशींच मी तिच्या डोळ्यांतलं पाणी ओळखलं आणि मनांत खूणगांठ बांधली, कीं जरी हिच्या डोळ्याची भाषा मुकी असली तरी कधींना कधींतरी ही आपल्याशीं गुलगुल गोष्टी करणार! आमचं पहिलें कुटुंब मरून एक वर्ष झालें! लवकरच लग्नाचा योग जुळवून आणणार होतों! पण आतां आम्ही मुनसिपालिटीचे प्रेसिडेंट झालों म्हणजे चार विद्वान् मंडळी, मॅजिस्ट्रेट, शेटसावकार, कलेक्टर वगैरे आमच्या घरीं पार्टीला येणार, मला गव्हर्नरच्या लेव्हीला वरचेवर जावें लागणार! अशा वेळेस एखाद्या कोकणांतल्या रहाटगाडग्यांत कशाला मान अडकवून घ्यावी पुन्हा! बरं! एखादी कोकणदेवी पतकरलीच तर ती कसली शिकते इंग्रजी साहेबलोकांशीं बोलायला? आणि आम्ही तर आतां तावडतोब प्रेसिडेंट होणार! तेव्हां आतां हें जुळावं कसं, या विवचनेत पडलों होतों! एक दिवशीं केली जिवाची हिम्मत आणि स्पष्ट विचारलें, कीं कपिलाबाई! मी तुमच्या चरणाचा दास आहें, मला आपल्या कृपाछत्राखालीं, सांवलीखालीं, वळचणीखालीं, मला निवारा द्या. एकंदरींत तिला माझे सिमल्याच्या बँकेंतले पैसे, दागदागिने सर्व दाखविले आणि सांगितलें, कीं माझ्यासह हें सर्व तुमच्या चरणावर वाहिलें आहे! असं म्हणतांच तिचे डोळे किलबिले होऊन बोलूं लागले! लागलींच धिटाईनें हात धरून विचारलं कीं, ह्या डोळ्यांच्या मुक्या भाषेचं तुमच्या मुखानें एक वेळ भाषांतर करून सांगा. तावडतोब एप्रिल पहिलीचाच मुहूर्त ठरवून झटपट साखरपुडा केला आणि दोघांच्या सहीचीं कार्डे पाठविलीं सर्व लोकांना! पांडू, ये. वेळेवर आलास! काय रे पांडू! तुला आमची निवड आवडली कीं नाहीं? अगदीं खरंच सांग.

पांडोबाः—तें काय सांगावं महाराज! हंस नेहमीं मोतींच खाणार! नाहीं! नाहीं! नाहीं! तुमच्या धोरणापुढं हद्द आहे बुवा अगदीं! आतां

मोटारींत जवळ-जवळ बसलांत म्हणजे जोडा अगदीं लक्ष्मीनारायणासा
शोभेल !

धेनुवल्लभः—काय रे पांडू, तुला एक नाजूक प्रश्न विचारतों.

पांडोबाः—बेलाशक ! कोणच्याही नाजूक कामावर माझी मो
करा अन् मग पहा पराक्रम !

धेनुवल्लभः—कायरे हिची जात कोणची असावी ? मला विच
यला धीरच झाला नाहीं. नाहींतर रागावून म्हणायची कीं माझ्या जा
वर प्रेम आहे का माझ्यावर ?

पांडोबाः—खरें म्हणाल तर मला देखील अजून तिच्या जार्त
पत्ता नाहीं ! आपल्याला त्याच्याशीं काय करायचें ? कांहीं का असे
जगांतल्या कोणच्याही स्त्रीजातीच्या मूलतत्त्वांत भेद नसायचा !
बायको म्हटली म्हणजे इथून तिथून अडाणी, भित्री, उतावीळ अ
भांडकुदळ असायचीच, समजलांत !

धेनुवल्लभः—खरं आहे ! आणि ही फॅशन सुरू झाल्यापासून सां
तलें तरच धंदा आणि जात कळायची !

पांडोबाः—कांहीं असेना, ती जरी अगदीं तपस्वी ब्रह्मकुलां
नसली तरी अतिशूद्रही नसावी. फार उत्तम झालें. एंगेजमेंट ठ
टाकली.

धेनुवल्लभः—उगीच नाहीं ! काय तुमचं इंग्रजींत एंगेजमेंट म्हणत
अरे, नुसत्या विसारपावतीवर दोघांच्या सह्या झाल्याबरोबर वीस हजा
दागिने आणि पंचवीस हजारांचा चेक फाडून दिला ! काय रे अ
लग्न लावायचंना ?

पांडोबाः—कशाला जातां, जातकुळीच्या आणि सशास्त्र संस्कार
भानगडींत. सगळ्यांत उत्तम रजिस्टर करावें !

धेनुवल्लभः—पण त्याला तरी लग्नच म्हणतातना ?

पांडोबाः—हो तर ! त्याचाही अर्थ आणि परिणाम एकच !

धेनुवल्लभः—असो ! नेहमीं व्यापारांत म्हणतात कीं माल उता
नसतो, गिऱ्हाईक उतावीळ असतें; तें कांहीं खोटें नाहीं.

पांडोबाः—माल काय विचारतां ? रावसाहेब ! कपिलाबाई म्हणजे तुम्ही असें समजा कीं प्रेमाचं जणुं सरोवर आहे.

पद

लावण्याचें सुबक सरोवर चारुमुखीं दिसतें ॥ जनमन
हरुनी तनुविक्षेपें तरंग उसळवितें ॥ ध्रु० ॥ बाहुद्वय
मृदु मृणाल परि ते नेत्र मीन गमती ॥ केशपाश शैवाल,
कुंडलें मकरापरि गमती ॥ १ ॥ पीन घन स्तन, चक्र-
वाकखग हृदयस्थलिं असती ॥ करकंकण मधुमंजुरवानें
गमती कुजबुजती ॥ २ ॥

तिच्यावरून सर्व संपत्तीचं लिंबलोण करावं. असं माणूस मिळत नाहीं ! नुसतं निमित्ताला तिचं पहिलं लग्न झालं होतं ! अहो, खाकेंत प्रेमाचा गोळा घेऊनच नवरा बोहल्यावर उभा होता ! अंतरपाट पडला तोंच नवरा नवरी आणि अंतरपाट तीन दिशेला तिघेजण गेले ! खरे त्यांचे मालक तुम्ही होतां ! एप्रिल पहिलीचा मुहूर्तही आपण मोठ्या धोरणानें धरलांत ! त्या दिवशीं आपण राजमान्य, देशभक्त आणि कपिलापति अशा त्रयीच्या आनंदांत खास निमग्न होणार !

धेनुवल्लभः—तुझ्या या गोड स्वभावानं व इमानदारीनें तूं मला जन्माचं ऋणी करून टाकलं आहेस ! माझ्या प्रियेचं तूं किती मोहक वर्णन केलंस. इतक्या मार्मिक सौंदर्याची मला खरोखरच कल्पना नव्हती ! आम्हां धंदेवाल्यांचं अशा बाबतींत इतकं बारीक लक्ष नसतंच मुळापासून. नुसती वेळ मारून नेण्याकडेच मनाचा फार ओढा ! काय रे पांडू ? हें सगळें तर इसारपावतीपर्यंत ठीक जुळून आलं; पण ती आमची कपिला आमच्या घरीं कां अजून राहायला येत नाहीं ? आज आठ दिवस झाले इसारपावती होऊन, अजून मला एका हाताच्यादेखील अंतरावर येऊं देत नाहीं, तेव्हां हें कसं काय ? ह्या सुधारलेल्या बायकांशीं लग्न केलं म्हणजे असंच लांबून लांबून लेक्चर ऐकून जन्म काढायचा कीं काय ?

पांडोबाः—असं कुठं होतं रावसाहेब ! आपली नुसती एंगेजमेंट

ठरली आहे. अजून लग्न नाहीं झालं. अहो, आतां हां हां म्हणतां महिना निघून जाईल! ह्या पहा, नांव काढायचा अवकाश कीं हजर! त्या पहा कपिलाबाई कोणाशीं बोलत बोलतच इकडे येत आहेत.

धेनुवल्लभः—पाहूं! पाहूं! वारे वा! आपण डाव तर जिंकला! काय माणूस आहे. काय माल आहे!

पांडोबाः—रत्न आहे रत्न! आजपर्यंत यांना पारखी भेटला नव्हता. पहा! वारे वा!

धेनुवल्लभः—पांडू! पांडू! वर्णन कर रे! माझ्या आवडत्या वस्तूचं कोणीं वर्णन केलेलं मला फार आवडतं!

पांडोबाः—काय वर्णन करणार मी रावसाहेब यांचें? अहो! आपण दिलेल्या मोत्यांच्या दागिन्याच्या तेजाची आणि त्यांच्या लावण्यप्रभेची एकमेकांत चुरस लागली आहे पहा! तें पहा, ह्या दोन शुभ्र तेजांत मधून मधून हास्याच्या कशा लहरी उचंबळताहेत! हा पहा, मधेंच डावा डोळा जरा अल्लडपणानें आकुंचित केल्यामुळें आंतलें पाणी काय चमक मारतें आहे! हें कर्दळीवन! हें कमलवन! ही रत्नाची खाण! हा लावण्याचा उपसागर! म्हणूं तरी काय! कांहीं सुचत नाहीं!

धेनुवल्लभ—पांडू, तुला देऊं तरी काय! ओहो! काय चालती आहे पण; लाखांत बायको आहे!

पांडोबाः—तें काय विचारायचं रावसाहेब? पहा—

पद

लचकत मुरडत नट्टानि थटुनि पथ क्रमि युवति करिणी-
परि॥ कोकिलवैखरी वदुनि सुंदरी हास्यपीयुषा अधरिं
धरीं ॥ध्रु०॥ सकोप दावुनि किंचित् मुरडुनि अर्धोन्मी-
लित नयन करी॥ बालिश लाडिक हनु चिंचोळी
हलवुनि कुंतल सावरी ॥१॥ भृकुटि कार्मुकें नेत्रशरांनीं
विंधित नर सुरसुंदरी॥ दंत कुंद मधु हास्य तरंगे
अनंगरंगीं दंग करी॥२॥

फार काय सांगूं रावसाहेब! बालब्रह्मचाऱ्यानेंसुद्धां गोमुखी सोडून गृहस्थाश्रम पतकरावा, अशी यांची योग्यता आहे!

धेनुवल्लभः—तुझ्यावरून पंचप्राण ओवाळून टाकावेसे वाटतात! काय खोल आणि मार्मिक दृष्टि आहे तुझी. (कपिला येते) यावं! यावं! आतां अगदीं सत्तेनें तुमच्या घरांत यावं! आपला हा पांडुरंग म्हणजे अगदीं हिरा आहे! अगदीं अष्टपैलू आहे!

कपिलाः—म्हणूनच आपल्यासारख्या योग्य कोंदणांत योजना केली!

पांडोबाः—काय उगीच स्तुति ही गरीबाची करतां उभयतां!

शेखहुसेनः—(पत्र घेऊन येतो व धेनुवल्लभास देतो व तो कपिलेस दे म्हणतो.) अरे वा! ये मुनसिपालटीका गिरेबाज खबूतर यहां उडकर बैठा है. सुभानअल्ला! क्यां लटकतां है! क्यां मटकता है! जैसा जंगलमें मोर नाचता है!

धेनुवल्लभः—आमचीं सर्व पत्रें प्रथम यांना द्यायचीं समजत नाहीं तुला?

कपिलाः—नेव्हर माइंड डीअर! अच्छा जाव तुम. सब लोंगोकु सलाम बोलो! डीअर! हीप्स ऑफ कॉन्ग्रेच्युलेशन्स! सगळ्या गांवांतील मोठमोठ्या लोकांकडून आणि मुनसिपलकारपोरेशनकडून संतोषपत्रें व आशीर्वादपत्रें आलीं आहेत, यांना सर्वत्रांना आपल्या इथें ठरलेल्या पार्टीच्या निमंत्रणपत्रिका पाठवितें व त्यावरच स्वदस्तुरच्या आभाराचीं एकदोन अक्षरें लिहून पाठवितें. म्हणजे एटिकेटला बरें.

धेनुवल्लभः—ओ यस्. सरट्न्ली! माझीही सही आपणच करा. पांडू, तें सर्व सामान वगैरे दे त्यांना. [जवळ जातो.

कपिलाः—इश्! इतकं जवळ येऊं नये गडे इतक्यांतच! मग आहेच मी आपली कम्पॅनिअन! [लिहीत बसते.

धेनुवल्लभः—मला एप्रिल पहिली केव्हां उजाडेल असं झालं आहे! अं! अहाहा! पांडू, हिच्याकडे पहात पहात असेंच कायम संगमरवरी पुतळ्यासारखें व्हावसें वाटतं! माझ्या भाग्याला पारावार नाहीं. काय सांगूं पांडू; या माझ्या सर्व भूत, वर्तमान आणि भविष्यकाळाच्या भाग्योदयाची कल्पना डोळ्यासमोर वागडूं लागली म्हणजे एकच गोष्ट जिवाला कशी घरें पाडूं लागते! आमच्या पहिल्या कुटुंबाशीं दहा वर्षे

संसार केला आणि ह्या कुटुंबाशींही आतां होणारच. परंतु या सर्व अफाट संपत्तीला, मानमरातबाला त्या परमेश्वरानें कृपाळू होऊन जर लहानशा चिमकुल्या दुडुदुडु धावून गळ्याला मिठी मारणाऱ्या हंसऱ्या बालकाचा लाभ घडवून दिला, तर माझ्या भाग्याचा सार्वभौमाच्याही भाग्यानें हेवा करावा असें होईल! काय सांगूं? मला अलीकडे ही एकच चिंता आहे! काय करावं? ही परस्वाधीन गोष्ट पडली! केवळ देवाची कृपा पाहिजे!

पांडोबाः—हो, परस्वाधीन तर खरीच! बरं, म्हटलं तरी स्वाधीनही आहे!

धेनुवल्लभः—तें कसं! तें कसं?

पांडोबाः—अहो! व्रतें, दानें, जप, तप, यानें परमेश्वरीकृपा झालीच पाहिजे; तसेंच मंत्र, तंत्र, गंडे, दोरे हेही उपाय आहेत!

धेनुवल्लभः—पहा बोवा! सारखा निजध्यास लागला आहे!

पांडोबाः—रावसाहेब, ही चिंता व्यर्थ आहे तुम्हाला. आपलें हें भावी कुटुंब अगदीं तरुण आणि होतकरू आहे; तसेंच आपलेंही वय फारसें मर्यादेच्या बाहेर नाहीं. जर ह्या असल्या बहुमोल लावण्यखाणींतलें एखादें बालकरत्न जगांत खेळलें बागडलें नाहीं तर या जगांत मुळींच न्याय नसून अन्यायच आहे असें मी समजेन. रावसाहेब, मी सांगतों अशी गोष्ट होणार नाहीं!

धेनुवल्लभः—तूं तसा प्रसंगावधानी आहेस खरे, म्हणून तर अगदीं कलेजां-तल्या कलेजांतली ही गोष्ट तुला सांगितली! पांडू, तूं वाटेल तितका पैसा माग, मंत्रतंत्र, गंडेदोरे कर किंवा एखादें धार्मिक काय वाटेल तें कर, पण गोजिरवाण्या बालकाकडून या माझ्या मिशा ओढल्या गेल्याच पाहिजेत!

कपिलाः—संपलं गडे एकदांचं! डीअर, आपण आपली सिग्नेचर करा गडे याच्याखालीं.

धेनुवल्लभः—ठीक आहे. जशी तुमची आज्ञा. [तो सह्या करतो.

कपिलाः—पांडोबा, जगांत पैशाशिवाय सुख नाहीं तें अगदीं खोटं नाहीं आणि माझ्या सुखाच्या मार्गांतला एवढा पैशाचा वाटाडयाच कमी होता, तेवढा या कृत्यानें मीं मिळवून घेतला!

पांडोबाः—कपिलाबाई! या जगांत सुख आहे का सर्व दुःख आहे

याचं उत्तर अद्याप मिळालें नाहीं! या जगांत माझी पदोपदीं भयंकर फसगत होते आहे. कारण सुंदर वाटावा तो नुसता शृंगारलेला पोषाखी दिसतो! भोळाभाबडा वाटावा तो गळेकापू निघतो! देशभक्त म्हणावा तो उदरंभर सांपडतो! शूर म्हणून गौरव करावा तो सरळ पाहतांच उडी मारतो! कवि म्हणून वाटावा तो माधुकऱ्याच आढळतो! राजपुत्र म्हणून वाटावा तो स्त्रीपार्टीच ठरतो! ब्रह्मचारी म्हणावा तो रात्रीं गल्लीबोळ भटकतो! बरें, सावित्री म्हणून वंदन करावें, तो चमत्कार दृष्टीस पडतो!

कपिलाः—मनुष्य जसं आपल्याला मानून घेईल तसं त्याला सर्व जग आहे. (एकीकडे) हे गृहस्थ अजून माझ्या मोहिनीमंत्रांत पुरते सांपडले नाहींत (उघड) पांडोबा, जगांत एकटयालाच सुख नाहीं, हें तरी पटतं का तुम्हांला?

धेनुवल्लभः—हें पहा, तुम्ही अगदीं बरोबर बोललां आणि म्हणूनच मीं हा सुखाचा मार्ग शोधून काढला!

कपिलाः—होय डीअर! आणि म्हणूनच मी देखील या स्वयंभू तत्त्वाला, कवटाळून उभी राहिलें! कारण जिकडे पाहावं तिकडे ही सृष्टि अग कपिले, तूं दुःखी कां? तूं दुःखी कां? असे प्रश्न विचारीत असलीशी वाटली! खरंच डीअर—

पद

आनंदा घ्याया सृष्टीदेवी शिकवी जिवासी ॥ भृंगसंघ
गुंजारव करुनी, खगगण मंजुळ गानीं ॥ कुसुमालंकृत
डुल्लूनी लतिका॥ धावुनि तरु स्कंधासी ॥ध्रु०॥ अंबरिं
नाचुनि चपला चंचल ॥ पवन स्फुरुनि करि गान
सुमंगल॥ जलधर गर्जुनी गंभिर नादें ॥ सुचविती मोद
जिवासी ॥२॥

आणि माझा विचार करून शेवटीं मीं हेंच मत ठरविलं!

धेनुवल्लभः—माझेंही मत अगदीं तुमच्यासारखेंच आहे! आणि पांडू, तुझें रे?

पांडोबाः—आपल्या उभयतांचे मतांत मी कायमचा विकटला जाऊन आपलें सर्वांचेंही सृष्टिदेवीच्या शिकवणुकीबद्दल एकमत आहे! चला. रावसाहेब, आपल्या अभिनंदनार्थ कांहीं कौन्सिलर्स दिवाणखान्यांत आले आहेत! मला मात्र थोडी रजा असावी, कारण आजच मुनसिपालटीची खादा मीटिंग भरायची आहे. तेव्हां तिकडे तेवढा जाऊन आलोंच नंतर आपल्या सेवेला!

धेनुवल्लभः—ठीक आहे. चला आपणही आमच्याबरोबर यायचें!

कपिलाः—(लाजून) मला गडे इतक्यांत लाज वाटते यायला!

धेनुवल्लभः—ओ नेव्हर माइंड, जाईल हळुहळू लाज सगळी! लाज हा पदार्थच असा देवानें निर्माण केला आहे कीं, त्याच्यापासून जर मनुष्याला त्रास झाला तर तो वाटेल त्या वेळेस दूर सारून मनुष्याला त्याच्या भानगडींतून झटकन् मोकळें होतां येतें! [जातात.

प्रवेश चवथा

[स्थळः-रस्ता. पात्रेंः-धोंडोपंत, रंगराव, शेखहुसेन, अंबू व कोंडिबा.]

धोंडोपंतः—काय रे, तूं म्हणे पहिलें घर सोडून इकडे वराहशास्त्रीबोवांच्या घरीं भाड्यानं राहिलास? संसाराला त्यांचें घर मोठं आटपशीर आहे!

रंगरावः—दिसतो आहे खराच रंग तसा! आणखी चार महिने राहिलों तर सगळा संसारच आटपेल तिथें खरा!

धोंडोपंतः—म्हणजे?

रंगरावः—म्हणजे काय? तें घर सोडून दुसरीकडे मीं चार दिवसांपूर्वींच जागा पाहिली. त्या तुझ्या वराहशास्त्र्याच्या घरांत माझ्या आईबापांची पुण्याईच माझ्या उपयोगी पडली! उजेड नाहीं, ऊन नाहीं, हवा नाहीं, पाणी नाहीं, जमीन नाहीं! असल्या चिलटें, ढेकूण, पिसा, झुरळें, पाली, उंदीर यांच्या त्या पांजरपोळांत, नाहीतर काय प्राशा होती दोन वर्षें काढायची? केवळ वडिलांची पुण्याई!

धोंडोपंतः—काय म्हणतोस? येवढा प्रलय करणारीं पंचमहाभूतें म्हणतात, पण त्यांची देखील वराहशास्त्र्याच्या घरांत शिरण्याची प्राशा नव्हती आं? भाडेकऱ्यांची आणि त्यांची भेट देखील नाहीं?

रंगरावः—काय प्राशा आहे त्यांची, कीं उंबरठा ओलांडतील! भाडेकरी जेव्हां त्यांच्या विरहानें चारचौघांच्या खांद्यावर उंबरठा ओलांडून बाहेर पडेल तेव्हांच तो पंचमहाभूतांत नदीकांठीं मिसळायचा! काय लेकाचा शेतखाना होता पण! अहाहा! रांगत शिरावें आणि फरफटत बाहेर पडावें! बरं नाहणीवर, धुण्याची जागा, अंगण, सगळं शेवाळ्यानें आणि निसरडयानं हिरवेंगार! जरा पाय ठेवायचा अवकाश, कीं गेलाच चार हात लांब तिकडे पाय! माणसें घरांत वावरायला लागलीं कीं हीं मनुष्यें चालताहेत कां घसरफुगडी खेळताहेत अशी भ्रांत पडायची! बेशरम! आणि लेकाचा खर्णी दीड रुपया भाडें मागत होता! हे मालक म्हणजे भाडेकऱ्यांना जनावरें समजतात कीं काय?

धोंडोपंतः—बरें, पण मालक तरी कसा काय होता?

रंगरावः—अरे, कसला बेटा मालक तो वराहशास्त्री!

पद

अरे मालक कसला हरामि गमला निर्दय मारेकरी ॥
मारी घरांत भाडेकरी ॥ध्रु०॥ बापजाद्यांनीं बळदें बांधिलीं
त्यावरि तुकडे भरी। लावितो तूप मिशीला वरी ॥१॥
खांब मोडके पोकळ तुळया भृंगराज पोखरी॥ धुळीचा
पर्वत पटईवरी ॥२॥ अंधेराची शिकस्त लोंबति जळमटिं
शिंक्यापरी॥ पालही चुकचुक करि भींतरि ॥३॥ उंदिर-
घुस कंबरभर प्रतिदिन माजघरां पोखरी॥ नेला पाताळीं
भाडेकरी ॥४॥ घरीं न तोटी विहीर हिरवी शेवाळानें
वरी॥ पाझरे आळीचें गटारपाणी वरी ॥ ५ ॥ ढपला
पडला खिळा ठोकला मालकीण ही वरी॥ कडाडे वीज
गगनोदरीं ॥६॥ भीम बकासुर जरी नांदते सांप्रत तैशा
घरीं॥ वाळते कोळ सुदाम्यापरी ॥ ७ ॥ आयुष्याचा
काळ कंठितों बाळंतिणिचे परी। सोडिव चक्रगदाधर
हरी। हा अनाथ भाडेकरी ॥८॥

असा ह्या भाडेकऱ्यांचा छळवाद मांडला आहे ह्या घरवाल्यांनीं! आणि आमच्या मुनसिपालिटीची शेबंदशाही कौतुकानें मजा पहात बसली आहे!

धोंडोपंतः--पण काय रे, ही तुझी मुनसिपालिटी नाहीं कांहीं व्यवस्था करीत ह्या घरांच्या दुरुस्तीची किंवा घरें पाडण्याबद्दलची? चारचार घंटे हे सगळे मेंबरलोक डोक्यावर डोकीं हपटून करतात तरी काय?

रंगरावः--टेबलावर शेणाचा ढीग पाडतात! अरे, मुनसिपालिटी घर बांधण्याबद्दल कुठें परवानग्या देते आणि चौकशी करते, तें ती पाडण्याबद्दल उठाठेव करणार आहे? आपल्या गांवांत हीं जीं वेडींवांकडीं नवीन घरें किंवा झुलते मनोरे बांधले जात आहेत ते काय परवानगीनें होय? लोक परवानगीअर्ज करितात! दहावीस हेलपाटे मारतात! दांत किरकिट्या करून एक महिन्यानीं घर बांधायला लागतात! बरें, आम्ही गोरगरिबांना दमदाटी करून खिसा गरम करतों. बरें, एखादा कौन्सिलर बांधत असला तर त्यांच्यापुढं लोटांगण घालून चीफ् ऑफिसराकडे रडत येतों! बरें, चीफ ऑफिसर स्वतःचे आणि आमचे डोळे पुसून नाकासमोर पगारावर दृष्टि ठेवून स्वस्थ बसतो! एकंदरींत हें असें रहाटगाडगें चालू आहे! जिथें नवीन घरांची ही रड आहे तिथें भाडेकऱ्यांच्या सुखसोई पाहायला कोण सुजून बसला आहे!

धोंडोपंतः--आहे खरें बाबा भाडेकऱ्यांचें मरण या दिवसांत! चला बाबा! हा आजचा मीटिंगचा शेवटचाच दिवस आहे, वेळेवर गेलें पाहिजे!

रंगरावः--अहो, आज मीटिंग कशी असेल! आज पोळ्याची सुट्टी आहे. मीं स्वतः पाहिले, बेगडबाशिंग बांधून पाठीवर हिरवे तांबडे छाप मारलेले बैल गांवांतून मिरवतांना मीं स्वतः पाहिले!

धोंडोपंतः--छे, छे, आज जनरलबॉडीची मीटिंग आहे!

रंगरावः--असेल बोवा! काय सांगावें! बरें, पण हा शेखहुसेन कां रडत येतो आहे? [शेखहुसेन येतो.

शेखहुसेनः--इन मेंबरोंको खाना खराब हो जाय! साले उदरभी लोगोंका पैसा अडपझडप दबाते है और गरीबके घर भी गिराते है!

रंगरावः——अहो खरेंच, गांवांत चाललें आहे तरी काय! सगळें गांव उकरायला लागले आहेत!

धोंडोपंतः——म्हणजे म्हणतोस काय? आपल्या गांवच्या खालीं दुसरें एखादें ज्वालामुखींत गडप झालेलें गांव सांपडलें कीं काय?

रंगरावः——तसें नव्हे हो! मारून गांवांतले सगळे रस्ते खोदून भोंव-तालचीं घरें बुजवून टाकलीं आहेत!

शेखहुसेनः——लेकिन इन् मेबरोंके कैसे नही घर खुदवाये गये! तोबा! तोबा! गहजब मचाया है इन लोगोंने! हातमें कुदाली फावडा लेके दो हजार आदमी घुस पडा है गांवमें! क्या हमे जिंदेही कबरस्तानमें सुला देते हो! अजब तमाशा है!

रंगरावः——अरे बाबा, आतां आलें लक्षांत! हां! तेंच तें! तुम्हांला आठवतें आहे ना चार महिन्यांपूर्वी एकदां स्पेशल मीटिंग मुनसिपालिटी-ची झाली होती, मग तेंच बरें हें! ह्याला म्हणतात रोडवायडनिंग म्हणजे रस्तारुंदी! आणि ते रस्ते खोदताहेत ना? त्याला म्हणतात ड्रेनेज! अहो पण धोंडोपंत! शेषाच्या टाळूला भोंक पडेल इतकें खोल खणून हें ड्रेनेज पुढें मिळवायचें कुठें?

शेखहुसेनः——वा! भाई वा! और वो इनजणीरको, वो उल्लुके पट्ठे-को ये तो पुछना, सब गांवका कबरस्तान बनाकर वो चौडे रस्तोंपर कौन उसके बापजादेके भूत और शैतान सहेल करने वाले हैं?

रंगरावः——खरेंच, इतकें खोल ड्रेनेज खणून तें मिळवायचें तरी कुठें?

शेख हुसेनः——वो इनजणीरके मूमे?

धोंडोपंतः——कायहो, पण गांवाला आपल्या जवळच नदी आहे ना?

रंगरावः——पण इन्जनीरचें असें मत पडलें कीं, नदी उंचावर असून गांव खोलांत आहे!

धोंडोपंतः——काय काय म्हणतो? नदी उंचावर असून गांव खोलांत आहे? भले रे बिलायती पट्ठे! मग काय गांव नदींत असून नदी गांवांत आहे म्हणतो काय? म्हणूनच गांवचें पाणी पाताळांत घालून नदीचें पाणी गांवांत सोडलेंन् वाटतें? हा शेखहुसेन म्हणतो तसें खरोखरीच ह्या मीटिंगमध्यें झालें तरी काय? काय ठरविलें ह्या नंदीबैलांनीं?

शेखहुसेनः—सब लोगोंने हिंदुस्तान छोडकर अरबस्तान या कबर-स्तान में जाना! सो इनजणीरकी ऐसी तैसी!

रंगरावः—ऐका तर काय ठरलें आणि झालें त्या मीटिंगमध्यें—

पद

अहो झालें ड्रेनेज सँकशन बहुमोलाचें नवनवलाचें॥ कीं अगाध चातुर्याचें॥ कीं अलोट कौशल्याचें॥ जणुं इन्‌-जिनिअर, कांहीं ओव्हरशिअर, यांच्या प्रदर्शनचि अकलेचें ॥ध्रु०॥ पायवाटा गल्ली, बोळ पेठा शहर, लख्ख आरशा-परिस बघ व्हायचें॥ घरंदारं पाडून, रस्ते रुंद करून, व्हेंटिलेशन खालींवर द्यायचें ॥१॥ गली टूँपा धरून, मॅनहोल करून, एअर इन-लेट वर ठेवायचें॥ घरमोऱ्या जोडून, वॉटर फ्लशिंग करून, सॅनिटेशन मग वाढवायचें ॥२॥ पाताळांतील पाणी, पंपींग करून वरी, पितरांच्याकडे झुकवायचें॥ गटारांतील घाणी, खुड्डीमधील पाणी, स्वयंपाकघरांत सहजचि यायचें! ॥३॥ सांडपाणी साऱ्या शहराचें धरून, बांगडीयेवढ्या नळांत ढकलायचें॥ मोठे मोठे जिथें, आडवे पडले तिथें, आम्ही गरिबांनीं काय बोलायचें ॥४॥

समजलांत, त्याचा हा धूमधडाका गांवांत चालू आहे. अरे बाबा, ही युरोपांतून आलेली अकल आहे. आणि ती विकत घेण्याकरितां किती लक्ष रुपयांना बुक्का लागणार आहे कुणाला ठाऊक! मयासुरनगरीचें तुम्हीं नुसतें वर्णन वाचलें आहे, पण प्रत्यक्ष दर्शन इंजिनियरनें तुम्हांला घडवलें आहे. म्हणजे जिथें जमीन असेल तिथें पाणी दाखवायचें, पाणी असेल तिथें जमिनीचा भास करायचा. तलाव असेल तेथें कचऱ्याचा डोंगर दाखवायचा वगैरे वगैरे!

धोंडोपंतः—केलेंन् खरें बाबा त्याप्रमाणें, आतां उपयोग काय उगीच

वितंडवाद घालून ! त्या मयासुरानें मुनसिपालिटीला ड्रेनेजच्या घातलेल्या कोलदांड्यांतून ती आतां कशी सोडवावी म्हणून तर आतांची शेवटची मीटिंग आहे ! हें पहा ! मला आधीं जाऊं द्या ! चला, आमचे इन्फ्लुइंझा मोटारमधून डॉक्टर येतील तडफडत मीटिंगला ! मला दवाखान्यांत हजर असलेंच पाहिजे !

रंगरावः—काल सहज थोडासा पाऊस पडल्याबरोबर गांवांत शंभर ठिकाणीं मेनहोलच्या तोंडांतून हत्तीच्या सोंडेसारखीं कारंजीं उडायला लागलीं आणि घरचीं घमेलीं त्या कारंजाच्या धारेवर लिंबासारखीं नाचत नि तरंगत होतीं !

शेखहुसेनः—और कीचडतो ऐसा हद्‌का हो गया है, के हाथी कीभी ताकद नही उसमेंसे बाहेर निकलनेकी ! हंसते क्यों यारो, कसम है मेरे गंगुजानकी ! सच कहताहूं ! मैले कचरेके तो ऐसे ढेरके ढेर पडे हैं वो अल्लामियाही एकजानता है के कुंडीमें कचरा है या कचरेमें कुंडी पडी है ? चल भाई रंगराव ! आप दोनोबी आपने अंबू गंणूकू लेकर काबूलकंदहार चले जायेंगे ! उधरतो साली ये मुनसिपालिटी नही हैं ! मजेसे बकरीयां और दुंबे पालकर साफ सुथरे हरियालिके और नजरे रोशन फुलझाडोंकें तल्ले आपने कलेजेको अंबू गंणूकू बिठाकर बदाम, पिस्ते, आक्रोड, अंगोर, सालममिश्री, खूप खायंगे और खिलायंगे ! मछलिया उछलते हुवे तालाबका मीठा मीठा पानी पीकर आपने उंम्रके रहे हुवे दिन मीठे मीठे कांटेंगे ! चल, मिया चल ! अभी गंणूजानकू बुलाता हूं.

रंगरावः—अरे लेका, तिकडे गेल्यावर एखाद्या रोहिल्यानं किंवा पठाणानंच पळविल्यान् तर ? काबूलकंदाहरला जातो म्हणे ! मुंबईसारख्या राजधानींत भर दिवसां दरोडे घालायला जे पठाण भीत नाहींत ते काबूल-कंदाहारच्या बेबंदशाहींत अंबू गंणू आपल्याला कशा पचूं देतील ?

शेखहुसेनः—अरे हां यार ! येभी एक है ! सच कहता है ! इसी-वास्ते मै हरहमेश कहेतांहू, के हमारे हिंदूभाई बडे अक्कलमंद, और धीमे होते है ! और नही तो हम ! बकरेका गोश खाकर, बकरेके माफकही उलटे खोपडीसे चलते हैं ! अच्छा तो भाई ! रोहेलेके डंडेसे आपना मुनसि-

पाकिटीका कौवडी बेटेतर है ! एक दिन नसीबका चक्कर फिरजायगा !
[जातात. अंबू ओरडत प्रवेश करते.

अंबूः—खबरदार कोंडीबा, येडवांकड बोलाल तर ! मी साफ तुमच्या घराकडं झाडायला मोठ्या पहाटस यायची नाहीं. पाहिजेल तर ह्यो घ्या माझ्या नोकरीचा राजीनामा ! [खराटा नि घमेंलें पुढें ठेवते.

कोंडिबाः—कायग अवकला ? लई तोंड करतीस ! मी कोन है समजलं नाहीं तुला ? ह्या कोंडिबा पार्लमिंटाचा मिंबर आहे. कोन शिलेदार है ! समद्या गांवच्या लोकाचं परान माझ्या हातीं हायती ! मोटा पाति-बर्त्यांचा दिमाख दावतिया मला ! आजपर्यंत ह्यो पट्टयानें—कोंडिबानं, तेलणी, तांबोळणी, माळणी, कितीक वाटं लावल्यात ! तुझ्या म्हारनीची किंमत काय ? चल माज्यासंगं. मी तुझा पगार वाढवतो ! मनांत आनलं तर तुझ्या बालाबी हात धरून ओढत घेऊन जाईन !

अंबूः—मी न्हाई येनार, तुम्हीं जर धागडधिंगा केलात तर अशीच जाऊन पेरशिडेंटाला सांगेन पगा !

कोंडिबाः—पेरशिडेंट काय माझ्या डोकशीच क्येस काढनार हाय ? म्याच त्याची धा वेळ हजामत केली हाय. ह्यो पट्ट्याचा हिस्का आन् दरारा तुला ठाऊक न्हाय ? आम्ही कमिटीचं मेंबर म्हंजे, जस काय ब्रह्मराकुस हाओत. ऐक—

पद

निवडक पुंड। आम्ही कमेटिचे गांवगुंड ॥ध्रु०॥ आम्ही अधिकारमदांध धुंद ॥ आमचे रंगढंग छंदफंद ॥ ब्रह्मथास देऊं ना थांग ॥ बंड झोटिंग ॥१॥ थोतांडी वाद वितंडी ॥ अपसांत बसूं बोकांडीं ॥ बापाची मुरगळूं मुंडी ॥ चंड बोलभांड ॥ २ ॥ फत्तर कट्टर कोणी फेर ॥ कुणि नाफेर कुणिग चौफेर ॥ घराच्याच फोडुं उतरंड ॥ फंडगुंड ॥३॥ आम्ही ग्रामकर्दमिचे मंडुक ॥ गर्जना करुनि प्रचंड। ठेंगणें करूं ब्रह्मांड ॥ उद्दंड घमेंड ॥४॥ जन-

कल्याणाचें बंड ॥ माजवूं पाडुं मुळीं ना खंड ॥ बहुरुपीच
सोंगढोंग ॥ थोतांड कुभांड ॥५॥ तूं कोण कोठलिंग
भांड । काय लावलस इतुकं तोंड । तुझ्यापरीस किति-
काची नोंद ॥ केली सांगोपांग ॥६॥

चल बऱ्या बोलानं. माझ्यासंगं आल्यानें जर कांहीं बिघडलं तर देईन एखाद्या बामनास्नी सांगून तुला पराचित.

अंबू:—मी नाहीं येनार! मी जाऊन आतां सांगतें बघा पेरशिडेंटाला.

कोंडिबाः—अर्रर्र विथारलं काम. अग! अग! अग! अंबे! अग! थांब! थांब! थांब! जाऊन द्या! पाहून घेऊं पुढं कवा तरी!

प्रवेश पांचवा

[स्थळः–मुनसिपालिटीच्या सभेचा दिवाणखाना.]

पांडोबाः—लोकांच्या अर्जांचे ढीगच्या ढीग सातपुड्यायेवढे आडवे पडले आहेत आणि इकडे पहावें तों सगळा अंधेर! एकजण इमानें इतबारें पूर्वजांना स्मरून, काम करीत असेल तर शपथ! आमच्या मुनसिपालिटींतल्या मेंबरांच्यासारखा गरम मसाला मात्र कुठें पहायला सांपडायचा नाहीं! एक एक प्राणी आकाशांतून ताऱ्यांचे फुटून दगड पडतात ना, तसा अमर्दी जातिवंत पडलेला आहे! या मेंबरांना पाहून, चंद्रावर, मंगळावर आणि शुक्रावर आपल्या सारखेच लोक आहेत हें विधान खरें असल्याचा मला भास होत आहे! मला वाटतें, मासल्याकरितां देवानें यांना खालीं ढकलून दिलें असलें पाहिजे! वर्षांतून मुनसिपालिटींतला लाखो रुपयांचा चक्काचूर होतो आहे; पण पैसा कुठें आणि कसा गडुप होतो आहे, तो देव जाणे! देव कशाला जाणे हो, मेंबरच जाणे! नुसती अंधेरनगरी—झोंटिंग पादशाही आहे झालं! अरे! अरे दुर्दैवी हिंदुस्थाना! कधीं तुझा उदयकाल येईल तो येवो! ह्या लोकांचा हा दोष नाहीं! स्वातंत्र्याचा हा दोष आहे! कारण ज्या ज्या देशांना पारतंत्र्याच्या अंधार-कोठडीची शिक्षा भोगावी लागली, तेथील लोकांची अशीच स्थिती

होते. ह्या पारतंत्र्याच्या अंधारांतून, एकीच्या दिव्यप्रकाशांत दुर्दैवी हिंदुस्थानाला कोण महात्मा नेईल तो नेवो. तोंपर्यंत—

पद

रड हंबरडा फोडुनि हिंदुस्थाना। दिनवाणा केविलवाणा ॥ तव अश्रूंच्या वाहवि गंगा-यमुना, नच येई करुणा कोणा ॥ ध्रु०॥ तव हिमनगीं जे मुनि तपले। जनकल्याणा जे झटले। स्वात्मार्पण ज्यांनीं केलें। परवशता तव बघुनी। घालिति खालीं माना ॥१॥ तव वक्षःस्थळिं तडफडतीं। अन्नान्न करुनि जीं मरतीं। लेकरें पराधिन होतीं। संकटीं तयांनि करावा। देवा धांवा कोणा ॥ २ ॥ कां परमपुनित आत्म्यांनों। कां सकळ देवतांनों। कां शूर वीर पितरांनो। कलि-बलिनें केलें। सांप्रति गर्वा हरणा। म्हणुनि कां लपवितां वदना? ॥ ३ ॥ ही दशा किती सोसावी। कवणास हाक मारावी। नच अंत पहावा देवा। धांवा दीनोद्धरणा ॥ ४ ॥

आज मीटिंग आहे म्हणून सगळ्या मेंबरांना—मेंबरं कसलीं मेंढरंच हीं!—नोटिसा पाठविल्या. पण आतां दीड वाजायला आला; अजून एकाचाही पत्ता नाहीं! अरे! खूर वाजायला लागले! मेंढरं आलीं वाटतं? आपण प्रथम सुनावणीचे अर्ज काढून ठेवावेत झालं! [शेखहुसेन प्रवेश करतो.

शेखहुसेनः—

दोहा

क्या कहुं प्यारे भाईओं। हम दिन रों रों कर कटते है॥ हिंदुस्थानकी हालत देखकर॥ आखोंसें आसूं बहतें है॥ध्रु०॥ ठैरो प्यारो कहां तक डटोंगे। रोखनेसेभी नही रुखते है॥ मुल्ख सफाचट मैदान हूवे। देख-कर सीने फटतें है॥ १ ॥ जिस हिंदुस्तानमें धनधान खुषनुमा

फूल फूलते है ।। वहां अब लाखो गोर-गुरबां गेते भूखे सोते है ।। ३ ।। चिंधी नहीं कपडा नही जमीन परसो अस्मान ओढते है ।। बेवा औरतें और न्हन्नेबच्चे यारो हीरे मिट्टी मे मिलजाते है ।। ४ ।। क्या परवर दिगार ! दुनियाके सुलतान! । ये आवाज नही सुने आते है ।। यहांतो कत्तल देखकर पहाडभी सीने फोडकर आसूंओंके नदीया बहाते है ।।५।। ऐ हिंदु मुसलमिनो हिम्मत न छोडो, माधवजी ! कहते है ।। अलबत अपने लिये रामरहिम कुछ सला उपर करते है ।। ६ ।।

जाने देव ! ये टटे फिसाद ऐसेही चलनेवाला ! दिन किसीके रहे नही या किसीके रहेंगे ! ये दिन आ रहे है चाकोंके उलटपुलट तो खायेंगे ! यारो मष्करी नही! हसतेहो क्या? एक दिन आपेनेभि नसीबका चक्कर फिरजायगा ! अरे, हां यार, मै तो भूलगया ! अरे भाई पांडुरगराव ! वो आपना टोल-नाकेवाला मुझे कहताथा के, वो गट्टूलाल मारवाडीने चालिस गाडी माल बगर टोल देते हुवे अपने दुकानमे लेआया ! क्या साला ये लोक तो दिनदिवाले डाके मार रहे है ?

पांडोबा:—मरू देतरे बाबा ! मला कशाला ह्या कर्मकटकटी सांगतोस ? तुझं आणखीन् व्याह्याचं घोड पाहिजे कशाला ? नुसत्या कडबावैरण बैलांना पाठवण्याच्या पत्रव्यवहारांतच चाळीस बैल मरून पडल्याचा रिपोर्ट आला आहे. एक लाख रुपयांचा डेपोंतला कचरा वाऱ्यानें उडून गेला म्हणून टेलिफोन आला आहे. बँकेत पैसा भरणा करतांना पांच हजारांचा एक बदरा अचानक नाहीसा झाल्याचें कळलें आहे. ह्या नगाऱ्याच्या घाईत तुझ्या टोलनाक्याच्या टिमकीला कोण विचारतो ? अरर् मढरं आलीरे आली ! तोंड बद कर ! तोंड बद कर !

[डॉक्टर, चीफ ऑफिसर, ठोंबे, वराहशास्त्री, कोंडिबा, धेलुवल्लभ, प्रेसिडेंट अजागळ, गट्टुलाल मारवाडी प्रवेश करतात.]

डॉक्टरः—मिस्टर गायतोंडे, आज आपल्याला फार उशीर झाला बुवा! डोन्च्यू थिंक?

चीफ ऑफिसरः—कायहो पांडोबा? आमच्या आधींच मीटिंग भरून बरखास्त झाली नाहींना?

पांडोबाः—छे, छे! अजून कुणीच आलें नव्हतें! हे पहा गट्टूलाल, शास्त्रीबोवा, प्रो० ठोंबे वगैरे आलेच!

डॉक्टरः—होय ना? दॅट्स् ऑलराईट! मग आपण वेळेवरच आलों! हॅलो! कमलांग मिस्टर गट्टुलाल, प्रोफेसरसाहेब! कमलांग मिस्टर थापाडिया! मिस्टर ठोंबे कमलांग! यू ऑल जन्टल्मेन!

गट्टुलालः—जीगुपाळ! जीगुपाळ!!

प्रो० ठोंबेः—सरटूनली नॉट! वुइ आर रायव्हल्स फॉर मेंबर्स ऑफ पार्लमेंट! वुइ आर नॉट जन्ट्लमेन!

कोंडिबाः—पार्लमेंट हाय! हामिभी पारलमिंटाच मेंबरच हाय!

गट्टुलालः—हुं बी डॉमेजींग कमेटीका चोरमन है! चोरमन है!

चीफ ऑफिसरः—कसें काय कोंडिबा? आज आतां शेवटची मीटिंग म्हणून पायधूळ झाडलीत वाटत इथं?

कोंडिबाः—कसचं! कसच! अलीकडे आमच्या दुकानांत लई गर्दी; लई गर्दी; म्हूनशान मीटिंगला यायला येळच होत नाहीं! नुसतं साबुनपानी मारायापायीं, आन वस्तान्यासनी धार लावाया पायीं, धा पोरं ठेवलीयात नवीन. एकादशी नाहीं, तिथी नाहीं, दिवस नाहीं, रात नाहीं, अक्शी चोवीस तास खरडतुया बगा! नुसतं क्यास टाकाया मुनसिपालटीची गाडी लावलीया जादा! तुम्हासबी ठावं हायच गट्टुलालजी समदं! तुमचं कसं काय चाललं आहे?

गट्टुलालः—पेशा जाणो, के जेशी चांदरात है! घीणो पेशो और पेशोणो घी बे पेशो हुयोडो हैं! वेपार तो घणी चोखा हुयोडो है!

चीफ ऑफिसरः—हे पहा प्रेसिडेंटच अजागळच आले! अरे वा! धेनुवल्लभही आले आहेत बरोबर! अलभ्य लाभ!! अलभ्य लाभ!!!

[सर्वजण 'गुड डे!' 'गुड डे!' चा वर्षाव करतात.

प्रेसि० अजागळः—थोडें कलेक्टरच्या बंगल्यावर गेलों होतों म्हणून

उशीर झाला! एक्सक्यूज् मी! तसेंच येतांना आमच्या घेनुवल्लभानींही कृपा केली इकडे येण्याची, म्हणून त्यांच्या इथें थोडें चहापाणी घेऊन त्यांच्याच मोटारींतून इकडे आलों.

घेनुवल्लभः—सहज म्हटलें काम बघून ठेवलेलें असावें! म्हणजे पुन्हा अडचण नको! आज माझ्यामुळें सर्वत्रांना उशीर झाला त्याची माफी असावी!

सर्वजणः—नेव्हर माइंड!

चीफ ऑफिसरः—अहो, आमचें हें गुऱ्हाळघर नेहमींचंच आहे! पण आपल्यासारख्याचा लाभ अलभ्य आहे!

प्रेसि० अजागळः—या, असे माझ्याजवळ बसा.

कोंडिबाः—गट्टुलाल! मोटार! कल्टूर! मोटार! कल्टूर!

प्रेसि० अजागळः—अहो कारकून, कांहीं सुनावणी अर्ज आहेत का?

पांडोबाः—गळयाइतका पुरला गेलों आहें तक्रारी-अर्जांच्या ढिगांत! बरेच आहेत रावसाहेब.

प्रो० ठोंबेः—लेट अस् बिगिन अवर वर्क सीरिअस्ली! ठीक आहे! वाचायला सुरवात करा! सर्व मेंबर्सनीं सूचना उपसूचना खुल्या दिलानें द्याव्यात!

धेनुवल्लभः—ओहो! अजब आहे! काय शान आहे! मान आहे! दर्जा आहे! अधिकार आहे!

पांडोबाः—शेखहुसेन ते तक्रारीअर्जांचे गठ्ठे इकडे आण.

[शेखहुसेन गठ्ठे उचलतांना पडतो.

शेखहुसेनः—सरकार वो तो दसवीस गद्धोका बोजा है! क्यौं जी पांडोबा! कंत्राक्टरके गधे यहां बुलाऊं क्या उठानेके लिये?

पांडोबाः—आणखी कंट्राक्टरचीं गाढवें कशाला पाहिजेत इथें? यांतून ओळखून कशीं काढायचीं?

डॉक्टरः—अहो, त्याच्याशीं काय बाचाबाची करतां? चला, वाचा लवकर!

पांडोबाः—वाचतों रावसाहेब! धर्मशाळा आणि देवळांच्या ट्रस्टीज-

करून पाणीपट्टी आणि भंगीपट्टी माफ करण्याचा अर्ज आहे! गुरेंढोरें, गोरगरीब, वारकरी आणि पांथस्थ लोकांकरितां—

चीफ ऑफिसरः—शट् अप् दॅट पांथस्थ! बस्स्! पुरे झाला तुमचा धर्मादाय.

कोंडिबाः—धर्मादाय करून करून सगळी पेशवाई बुडवलीत, आतां राहिलेली मुनसिपालिटीही खड्डयांत घालायचा चालविलाहेत वाटतें विचार? काय डॉक्टर, तुमचें काय ओपियम् आहे?

गट्टुलालः—ये तो बात शत्य है! अरे डॉक्टर, चीपचाप कांई हुयो है? बोलोना तुम्हारी योपीयम?

डॉक्टरः—ह्या असल्या धर्मार्थ संस्थांतून पाण्याची सांडलवंड, घाण, फार होते व त्यामुळें गांवांत रोगप्रसार वाढतो! म्हणून तेथून अजीबात पायखाने व तोट्या उपटून टाकाव्यात!

वराहशास्त्रीः—वाः! अजिबात कांटाच उपटून काढलांत!

चीफ ऑफिसरः—माझ्या अगदीं हेंच मनांत आलें होतें. हा उत्पन्नाचा प्रश्न आहे. याचा अगदीं एकानोमीच्या दृष्टीनें विचार झाला पाहिजे!

प्रेसि० अजागळः—दॅट्स् राईट! तो अर्ज दप्तरीं दाखल करा! युसलेस रॅट! पुढे वाचा!

चीफ ऑफिसरः—पांडोबा! कचऱ्याच्या टोपलींत टाका! एकुण एकच!

पांडोबाः—अर्ज दुसरा! सगळ्या घराचा कोळसा झाल्यावर बंब आला—

डॉक्टरः—ऑल राइट्! लोणाऱ्याला कोळसे विकून जागा साफ करण्याविषयीं मालकाला हुकूम द्या!

पांडोबाः—तो म्हणतो कीं, इंजिनच बंद पडलें!

प्रो० ठोंबेः—बस् करा तो काय म्हणतो तें! म्युनिसिपालिटी कान्ट डू एनीमोअर!

चीफ ऑफिसरः—वेल्, वुइ कान्ट हेल्प इट! बोलून चालून यंत्रच तें! पडलें असेल बंद!

प्रो० ठोंबेः—वेल्! मिस्टर गायतोंडे ते कां बंद पडलें असावें? तुमचा काय तर्क आहे?

चीफ ऑफिसर:—वेल्! तें इंजिन अगदीं नवें करकरीत कोरें होतें! त्याची ट्रायल रन घेतलेली नव्हती! शिवाय तें इंजिन तीन इंच सॅक्शनचें असतांना रात्रीं जबरदस्तीनें मोठ्या डायमेन्शनचा नळ जोडण्यांत आला म्हणून ते सॅक्शन् घेईना! थोडेंसें निघालेलें पाणी कॅन्व्हास पाईप फाटका असल्यामुळें गळून गेलें! सध्यां रिपेरी चालू आहे कारखान्यांत! वुइ कान्ट हेल्प एनीमोअर!

प्रेसि० अजागळ:—एक्सप्लेनेशन क्वाइट सॅटीस-फॅक्टरी.

सर्वजण:—क्वाइट साटिस फॅक्टरी!

गट्टुलाल:—यस्, यस्! वाईड सॅटिस फॅटरी! वाईड सॅटिस फॅटरी!

प्रेसि० अजागळ:—नेव्हर माइंड! आय से पांडोबा, थ्रो दॅट रबिश केराच्या टोपलींत!

प्रो० ठोंबे:—त्या पाजी मनुष्याला लिहा कीं, हे मेंबर्स कांहीं त्याच्या काकाचे नोकर नाहींत! आम्ही हीं जीं कामें करतों तीं केवळ आमचा मानमरातब व दर्जा लोकांत वाढावा म्हणून करीत असतो! आम्हीं कांहीं लोककल्याणाचा मक्ता उचललेला नाहीं! स्वार्थ हा प्रत्येक प्राणी-मात्राला उपजत आहे!

सर्वजण:—बरोबर आहे.

चीफ ऑफिसर:—तसेंच त्याला आणखी लिहा, कीं फेरवाले, नाफेर-वाले, चक्करवाले, घनचक्करवाले या सगळ्यांच्या आमच्याविरुद्ध तक्रारीच्या सभा भरवून व्याख्याने देऊन रागावून रागावून काय मुनसि-पालिटीच्या जागेंतलें गवत कापून नेणें असेल तें खुशाल न्या म्हणावें. फूल्स्! राऊडीज्! ह्या लोकांना लाजा कशा नाहीं वाटत हेंच मला मोठं नवल वाटतं! आय् वंडर!

धेनुवल्लभ:—काय शान आहे! काय मान आहे! काय अधिकार आहे! माझे तर डोळे दिपून गेले!

पांडोबा:—याला म्हणतात कमालीची मानपानबाजी! ड्रेनेजच्या खळग्यात रात्रीं गाडीघोडा गडप झाला! खळग्याजवळ कंदील नव्हता तरी दिव्याऐवजीं दोन दोन मेंबर्स तरी ड्रेनेजमध्यें उभे करीत जाऊन मला कॉपेन्सेशन द्यावें! तो म्हणतो—

चीफ ऑफिसरः—अहो, तो काय म्हणतो तें नका आतां रड्डूं तुम्ही! त्याचें रडगाणें ऐकायला कांहीं आम्ही जमलों नाहीं!

प्रेसि० अजागळः—सरट्नली नॉट! थ्रो दॅट रबिश! फूल्स्! राऊडीज्! गो आन् नेक्स्ट्!

पांडोबाः—खाणावळवालीचा अर्ज आहे! तिच्या घरांतील सांड-पाण्याच्या मोरीला दिलेलें कनेक्शन नादुरुस्त असल्यामुळें पाणी तुंबून भिंतीला लोणा चढला आहे. जिवाला अपाय होण्याचा संभव आहे!

चीफ ऑफिसरः—तिला उत्तर लिहा! मोरी प्रायव्हेट असल्यास प्रायव्हेट्लीच दुरुस्त करून घ्यावी. मुनसिपालिटीचे लोक केवळ पब्लिक मोऱ्यांकडे पहात असतात!

पांडोबाः—दंताडीचा अर्ज आहे! घराच्या जोत्यापेक्षां ड्रेनेजची लेव्हल् उंच असल्यामुळें घरांतील चौकांत रंकाळ्याचा तलाव झाला आहे! आणखी चार दिवस हयगय झाल्यास माझ्या पोटापाण्याचें साधन बंद होऊन सतार, सारंगी, तंबोरे, तबले, कृष्णी फताडीच्या घरांत वाहून जाण्याचा संभव आहे. ती म्हणते—

कोंडिबाः—प्रेसिडेंटसाहेब! मी स्वतः पाहून आलों, तक्रार बरोबर आहे! तक्रार महत्त्वाची आहे! अन् इलाजबी लवकर झाला पाहिजे.

गट्टुलालः—तक्रार तो ठीक है पण इलाज क्या है? अरे कुंडीबा, कांई हुयो तो भी! आपणा पीच्छाणका माणश है, अरे भाई चीफ अफसर! आपणा पीछाणका माणश है! उसे बचावकी थारो खोपडीसे कांहीं जुगत तो निकालो!

चीफ ऑफिसरः—नेव्हर माइंड! आहे! इलाज सांपडला! तिथें एक पंपिंग स्टेशन उभारण्यांत यावें, अशी माझी सूचना आहे.

गट्टुलालः—हां हां! पंपिंग ठीशाण! पंपिंग ठीशाण, अरे कुंडीबा, जाणोके जुगत तो रामबाण है.

चीफ ऑफिसरः—माझें प्रपोजल सर्वानुमतें पास झाल्यास ठीकच! याला तीन हजार खर्च येईल!

प्रेसि० अजागळः—ब्रेहो! स्प्लेंडिड! सर्व मेंबर्सनीं हात वर करून आपलें मत दाखवावें!

गट्टुलालः—प्रेसिडेंटशाब, म्हारी एक बीणती है ! ईशी चांद्रीके घरमे काले राते हुं गयोडो छे ! आवते समय, मशकरीके साथ टीका टीपणी बातचीतमें, जीणो परसे पांव फीसल पडीयो तेमा खंदोमां घणी मार बीठा है ! शण्णक शण्ण शण्ण आवते है ! ईशी वासते हांतके बदले, पांव उपर करवाको परवाणा देणा ! [पाय वर करूं लागतो.

डॉक्टरः—अर्र् गट्टुलाल ! पाय खालीं करा ! पाय खालीं करा ! तुमचें मत दिसून आलें !

गट्टुलालः—अरे भाई, म्हारा मत दिखवाणा है !

वराहशास्त्रीः—अहो गट्टुलाल, पाय खालीं ठेवा. पुरें झालें तुमच्या मताचें प्रदर्शन !

प्रेसि० अजागळः—नमूद करा, ठराव सर्वानुमतें पास झाला म्हणून ! गो आन् नेक्स्ट् !

धेनुवल्लभः—काय सत्ता आहे ! काय ज्ञान आहे ! काय अधिकार आहे !

पांडोबाः—गांवांत पाऊस पडतांच गळ्याएवढ्या खोलीचा पातळ चिखल होतो तरी हजार पांचशें भोपळे व कांहीं होड्या खरेदी करण्यांत याव्या ! तो म्हणतो—

प्रोफे० ठोंबेः—तो झक मारतो ! आतां आमचें म्हणणें ऐका कीं एक वेळ ! द्या फेकून तो अर्ज !

डॉक्टरः—हा कारकून देखील पाजीच मनुष्य दिसतो ! आय् से, थ्रो दॅट रबिश !

कोंडिबाः—त्यासनी माझ्या सलूनमधी दे धाडून ! अक्शी त्याची बीन पान्यानं करून टाकतों ! दे धाडून ! ह्यो पठयानं ब्रह्मदेवाचंबी जावळ क्येलंया ! दे धाडून त्येला !

पांडोबाः—अहो, पण माझ्यावर कां गरिबावर रागावतां ? मी काय करणार ?

प्रेसि० अजागळः—अहो शंख ! [पांडोबा ओ देतो.

चीफ ऑफिसरः—आतां माझे आई, काय राहिले असतील नसतील ते सगळे अर्ज एकदम वाचा !

पांडोबाः—पण रावसाहेब मला गरिबाला कां ? मीं काय केलें ?

डॉक्टर—हा नमस्कार! कोंपरापासून अर्जाला! चला वाचा एकदम सगळे आणि सोडवा आम्हांला!

पांडोबाः--ठीक आहे! वाऱ्यामुळें गांवांत धुराळा फार उडतो—

डॉक्टरः--हां, उडूं द्या! तुमच्या काकाचें काय जातें? गो ऑन्!

पांडोबाः--खटारे खिळखिळे असल्यामुळें पेटींतील कचरा गांवांतच पडून--

चीफ ऑफिसरः—पडून (वेडावतो) पडूं द्या! तुमच्या बापाचें काय जातें? वाचा पुढें—

पांडोबाः--कचरा गांवांतच पडून खटारा मुक्कामीं रिकामाच जातो!

डॉक्टरः--जाऊं द्या! जाऊं द्या!

पांडोबाः—मग आला होता कशाला? गांवांत केर पसरायला? तो अर्जांत म्हणतो—

प्रेसि० अजागळः—छे, छे, हात टेकले या लोकांच्या पुढें! अहो शंख! (तो ओ देतो) गो ऑन्, बर्न ऑल दोज ॲप्लिकेशन्स! जाळून टाका ते सारे अर्ज. आणि नमूद करा सर्व प्रकरणांचा आज निकाल लागला.

[नाटक मंडळीचा मॅनेजर प्रवेश करतो.

शेखहुसेनः—अरे, अंदर किदर जाता है?

मॅनेजरः—अरे, मग माझी दाद कशी लागणार?

प्रेसि० अजागळः—तुम्ही कोण आहांत?

मॅनेजरः—महाराज, मी या गांवांत खेळ करीत असलेल्या नाटक मंडळीचा मॅनेजर आहें. माझा अर्ज आहे.

प्रेसि० अजागळः—शेखहुसेन, खुर्ची द्या! (स्वगत) पास आणले आहेत वाटतें? (उघड) काय आहे?

मॅनेजरः—आमच्या खेळावर हा जो आपण नादिरशाही कर बसवला आहे तो काढून टाकावा अशी प्रार्थना आहे! कारण पाणी बंद करीन म्हणून, भंगी बंद करीन म्हणून, थेटरचें लायसन्स बंद करीन म्हणून, आम्हांला दमदाटी करून आमच्याकडून नाटकाचे पास उकळले जातात! तुमच्या घरच्या मंडळ्या आणखी गांवांतल्या बाहेरच्या मंडळ्या यांनीं

आमचा खड्डा बहुतेक गच्च भरतो पण आमच्या पोटाचा खड्डा मात्र रिकामा रहातो! म्हणून कर माफ करण्याविषयीं विनंति आहे.

कोंडिबाः—आमच्या मेंबरांच्या तरी पोटाचा खड्डा कुठं भरतोया? म्हणून तर हतं येऊन तरफडतों आम्ही!

प्रेसि० अजागळः—शेखहुसेन, इसका कान पकडपर हकाल देव.

गट्टुलालः—साला कुंपणीका मणिजर हुयोडो है!

नळवालाः—अहो, आम्हांला नोटीस न देतांच नळाचें पाणी आज आठ दिवस बंद केलें आहेत. अहो, मांडलेंय काय तुम्हीं? आतां आम्हीं लोकांनीं पाणी कुठलें प्यांयचें? कारण तुम्हीं अक्कलहुषारीनें आमच्या गांवांतल्या विहिरी होत्या त्याही बुजवून टाकल्यात!

वराहशास्त्रीः—पुन्हा घरोघरीं विहिरी उकरा! त्यांत काय?

चीफ ऑफिसरः—अहो, कालवा खोदायचें काम सुरू आहे!

नळवालाः—अहो, इतके दिवस कालवा खोदतां आहांत; अजून नाहीं का कालव्याला पाणी लागले?

कोंडिबाः—सोडावॉटर प्या! शेखहुसेन, हकाल देव उस्कू!

एक गांवकरीः—अहो, आमच्या आळींतल्या मुत्र्यान् संडास मुनसिपालिटीनें आम्हाला न कळवतांच काढून टाकले. तुम्हीं हा काय जुलूम चालवला आहेत, लोकावर सरकार! लोकाचें एक राहूं द्या, पण मला गरिबाला तरी अडल्यापडल्या वेळीं इकडे यायची परवानगी द्या.

प्रेसि० अजागळः—बेशरम लेकाचा! शेखहुसेन, उस्कू हकाल देव.

शेखहुसेनः—अरे गधेकी दुं! तेरी अक्कल क्या मारे गई? अबे उल्लू, क्या तूं यहा पायखाना धुंडनेकूं आया था? चल निकल तेरी ऐसी तैसी?

प्रेसि० अजागळः—म्हणून आपले कोणकोणते ठराव आहेत ते पुढें करा.

प्रो० ठोंबेः—ठीक आहे! सार्वजनिक हौदावरील जातीजातींचे निर्बंध काढून टाकून सर्व जातींना सार्वजनिक हौद उघडा असावा. याला विरोध व्हायचाच मग जातिभेदाचें पुण्य कां वायां घालवावें?

चीफ ऑफिसरः—अहो, पण सार्वजनिक हौद झांकला होता कुणीं? उघडाच आहे!

वराहशास्त्रीः—याला माझा विरोध आहे! अद्याप महार, भंगी, कुणबी, मराठा, रोटीबेटीव्यवहार करूं लागल्याचा काळ जवळ आला नाहीं!

गट्टुलालः—पंडीतजीको म्हारोभी घाट इंजाणके माफक जोरसे टेंकु है! शुंदर सुंडीशी चोटी, गोरी पुटरीवाली, शोहावणी लुगाई औरोंके घरमा भीजवाणा नहीं हैं!

कोंडिबाः—मी माझी पोरगी कंदी म्हाराच्या घरांत देणार नाहीं!

वराहशास्त्रीः—आजच हा शिवाशिवीचा प्रकार सुरू केला तर गांवांत खून पडतील!

गट्टुलालः—खूण पडीयो! खून पडीयो.

[सर्वजण 'खून पडतील' ओरडतात.

प्रेसि० अजागळः—ठीक आहे! जशी तुमची इच्छा! ठीक आहे, नमूद करा ठराव नापास! या उपर दुसरा ठराव!

धेनुवल्लभः—काय शान आहे! काय राज्यपद्धति! काय भयंकर अधिकार हा!

प्रो० ठोंबेः—सक्तीच्या मोफत शिक्षणाचा दुसरा ठराव मी पुढें मांडतों! स्वराज्याच्या इमारतीचें स्थानिक-स्वराज्य हें जोतें आहे व त्याचा पाया सक्तीच्या शिक्षणानें भरभक्कम जर चिणला गेला नाहीं तर हे जोत्याचे दगड निखळून स्वराज्याचा राजवाडा जमीनदोस्त झाल्याशिवाय राहणार नाहीं. सरकारनें आपल्या हातांत मतांचें कोलीत दिलेलें आहे. या कोलितानें अन्न शिजवून पोटभर जेवतांही येतें, किंवा स्वतःच्या घराला आग लावून राखरांगोळी करितां येते! तरी मतांच्या जळत्या मशालीचा सदुपयोग करण्याकरितां शिक्षण सर्वत्रांना अवश्य दिलें पाहिजे. येवढें बोलून मी विराम पावतों.

पांडोबाः—येवढातरी ठराव कृपा करून पास कराच. कारण, शिक्षण-प्रसार झाल्याशिवाय लोकमत तयार होणार कसें? आपल्या देशांतल्या लोकांना मत आहेच कुठें? दर हजारीं ज्या देशांत पांचजणांनाच नुसती अक्षरओळख आहे आणि बाकीचे ९९५ आंगठाच दाखवतात,

त्या देशांतल्या लोकांना मत द्यायचा काय अधिकार आहे? कारण, मत म्हणजे अनुभव, अनुभव म्हणजे ज्ञान आणि ज्ञान म्हणजेच शिक्षण! म्हणून सर्वत्रांना माझी हात जोडून प्रार्थना आहे कीं, येवढा चुकून मांडला गेलेला सक्तीच्या मोफत शिक्षणाचा ठराव तरी पास करावा!

प्रेसि० अजागळः—अहो कारकून! चूप बसा. तुमच्या उपदेशाची आम्हांला जरूर नाहीं. तुमची अक्कल पुरे करा! पुन्हा असा आम्हांला उपदेश करण्याचा आंव घालाल तर ताबडतोब तुमची हकालपट्टी करण्यांत येईल, इतकेंच नव्हे तर कौन्सिलचा अपमान केल्याबद्दल खटला भरण्यांत येईल!

पांडोबाः—खरें बोललों! चुकलों रावसाहेब! क्षमा करा! हा खरें बोलण्याचा काळ नाहीं हें मी विसरलोंच!

चीफ ऑफिसरः—तुम्ही तेवढे शहाणे आणि आम्ही सर्व बोकड आहोंत समजतां कीं काय? खबरदार असला एक शब्द बोलाल तर!

प्रेसि०अजागळः—ऑनरेबल मेंबर्सनीं खुल्या मताने ठराव पास किंवा नापास करावा.

कोंडिबाः—आम्हासनी नग शिक्शान्! शिक्शन् दिखील कोलीतच हाय! आमच्या अस्तुरीला मडम बनवायची नाई!

गद्दुलालः—इंग्रेजी पढियो तो शेटाणी भाग जावे और फेशनमें शेटजी व्यापार खोवें?

कोंडिबाः—हा ठोंब्या लई उलट्या खोपडीचा दिसतुया! साबुन-पान्याचं कोनी काई बी म्हनत नाहीं! काय हो! महार भंग्यांसनी शिक्शान देऊन त्येंचा मैला मंग काय आमी काढणार व्हय? लई राव सांगतासा!

प्रो० ठोंबेः—तशी वेळ येणार नाहीं. इंग्लंडमध्यें भंगी आहेत, हॉलंडमध्यें भंगी आहेत, गांवोगांवीं सुशिक्षित भंगी आहेत, चोहोंकडे भंगी आहेत. या गोष्टीचा पूर्ण विचार करून माझा ठराव सर्वानुमतें पास करावा. (सर्वजण ओरडतात, 'ठराव नापास! ठराव नापास!') ठीक आहे. सध्यां गांवांत चालू असलेल्या ड्रेनेजमुळें सगळा गांव उकरून पडला आहे! ड्रेनेजचें पाणी गांवाबाहेर नेऊन उसाची लागवड करण्याची

प्रथम योजना होती. परंतु लेव्हलिंग चुकल्यामुळें व सांडपाण्याचा नळ फुंकणीयेवढा लहान असल्यामुळें उकरून टाकलेली गांवांतील जमीन दोनदोन उंट खोल भिजून चिंब झाली आहे. तरी त्या ड्रेनेजची रिपेरी करण्यांत पुन्हा लक्षावधी रुपये न घालतां त्याच पैशानें लागवडीकरितां घेतलेल्या जमिनीवर नवीन वसाहत करून गांवांतच ऊंस लावण्यांत यावा! (सर्वजण ऊंस लावा! ऊंस लावा! घरांतच ऊंस लावा असें म्हणतात.)

शेखहुसेनः—वा भाई वा! सुभान अल्ला! घरदार तो सफा चट हो गये! अब उपर गन्नाभी लगा जाता है? घरमें गन्ना लगाव! चुलेमें गन्ना लगाव!

चीफ ऑफिसरः—प्रोफेसरांचें म्हणणें चुकीचें आहे. पुनः रिपेरीकरितां भरभक्कम रक्कम सँक्शन करून, पुन्हा माणसें पाहून, त्यांना कॉंट्रॅक्ट्स् देण्यांत यावीं! आपल्याच देशबांधवांचा, कॉंट्रॅक्टरांचा व मोलमजुरांचा त्यावर निर्वाह होणार आहे!

सर्वजणः—योग्य सूचना! योग्य सूचना!

प्रेसि०अजागळः—नमूद करा. थैलीचें तोंड सैल करून, रिपेरीबद्दल निरनिराळ्या व्यापाऱ्यांना व कॉंट्रॅक्टर्सना पुन्हा कॉंट्रॅक्ट्स् देण्यात यावीं. तेही आपलेच लोक आहेत व आपणही तेच लोक आहोंत. [ठराव पास.]

धेनुवल्लभः—काय ज्ञान आहे! काय अधिकार आहे! काय सत्ता आहे! काय फायदा आहे! काय हो, हें मुनसिपालिटीचें काम कायदा शिकल्याशिवाय मला चालवितां येणार नाहीं काहो?

प्रेसि०अजागळः—अहो,करायचा काय कायदा? इतके हजारों ऑनररी मॅजिस्ट्रेट्स आहेत! कुठें आहे त्यांची आणि कायद्याची जन्मांत ओळख? पण कोर्टांत हांकलतातच कीं नाहीं काम? गो ऑन नेक्स्ट्!

प्रो० ठोंबेः—ठीक! चीफ ऑफिसर, हेल्थ ऑफिसर, वगैरे सर्व तीनशेपेक्षां वरच्या अधिकाऱ्यांचा पगार शेंकडा ऐशीं टक्के वाढविण्यांत यावा. तसेंच त्यांना स्वतंत्र मोटारी देऊन, शापूर व पेट्रोल जादा देण्यांत यावें. त्यांचें गुणवर्णन मी करीत नाहीं; कारण जनतेला हीं माणसें विदित आहेतच.

वराहशास्त्रीः—ठोंबेसाहेबांच्या म्हणण्याला मी जबरदस्त टेंकू देऊन

अनुमोदन देतों. त्यांची पगारवाढ व्हावी इतकेंच नव्हे, तर उद्यांपासून नवीन निवडणुकींत येणाऱ्या प्रेसिडेंट, मेंबर्स लोकांना प्रोत्साहन मिळावें याकरितां सध्यांच्या सर्व अंमलदारांचे, कौन्सिलरांचे, प्रेसिडेंटसाहेबांचे, संगमरवरी पुतळे तयार करवून गांवाच्या प्रमुख चौकांतून ते स्थापन करण्यांत यावेत म्हणजे त्यांनीं चालविलेल्या अलौकिक देशसेवेबद्दल शहरवासी लोकांना पुतळ्यांच्या गळ्यांतून माळा वगैरे घालून त्यांचा योग्य गौरव—सन्मान करण्याची संधि मिळेल. एवढी उपसूचना करून मी पुन्हा विराम पावतों.

[सर्वजण 'पगारवाढीचा व पुतळ्यांचा ठराव पास' म्हणून म्हणतात.]

प्रेसि० अजागळः—सूचना-उपसूचना दोन्ही अलौकिक आहेत! पगारवाढीच्या व पुतळ्यांच्या ठरावाला सर्वांनीं हात वर करून अनुमोदन द्यावें. (सर्व 'ठराव पास' म्हणतात.) नमूद करा ठराव पास म्हणून! चला आटपा, आणा कोणते ठराव असतील ते पुढें!

गट्टुलालः—अहो प्रोफेसर, आमचा आधीं, आमचा आधीं!

प्रो० ठोंबेः—गट्टुलालच्या पिछाडीची मोकळी जागा, टांगास्टॅंडकरितां व मुतारी बांधण्याकरितां वीस रुपये यार्डाप्रमाणें पधरारो यार्ड घेण्यांत यावी! ही जागा महत्त्वाच्या रस्त्यावर असून फारच किंमतीची आहे. एकंदर रक्कम अजमासें तीस हजार होते.

कोंडिबाः—ठोंबेसाहेब, माझा दुसरा मांडा! अर ईच्या! हे समदं आपआपलं पुढं करूनशान पैका दाबत्यात पगा!

प्रो० ठोंबेः—कोंडिबा सलूनवाले यांच्या सलूनच्या डाव्या हातचें पडकें घर शाळेकरितां अडीचशें रुपये दरमहा भाड्यानें दहा वर्षे घेऊन उजव्या हातचें धडकें घर पाडून त्याचें मच्छीमार्केट करावें. किंमत पंचवीस हजार.

[डॉक्टर, चीफ ऑफिसर, प्रोफेसर कुजबुजतात.

चीफ ऑफिसरः—या महत्त्वाच्या ठरावाचा विचार करण्याला पांच मिनिटें सवड द्यावी!

प्रेसि० अजागळः—ग्रॅंटेड! कसं काय धेनुवल्लभ? तुमचे घोड्यावर बसायला शिकण्याचें कुठपर्यंत आलें?

धेनुवल्लभः—जिवंत घोडा लाथ मारण्याचा संभव म्हणून लांकडी घोड्यावर बसायला सुरवात केली आहे.

प्रो० ठोंबेः—हें पहा शेटजी, तें कांहीं चालायचें नाहीं! आम्हा प्रत्येकाला चार चार हजारांच्या प्रॉमिसरी नोटांवर सही करून देत असलां तर हें तुमचें गाडें पुढें ढकलतों! पहा बोवा!

डॉक्टरः—नाहींतर आतां हाणून पाडतों; त्याला काय उशीर? पहा बोवा, विचार करा!

[सर्वजण होकार भरतात. कोंडिबा व गट्टुलाल शेवटीं चिडतात.]

गट्टुलालः—साला पैसा खाते, खाते, खाते, किती खाते! रातदिन गधेडोंके माफक ये डाक्तरलोगोंका पीपा चरतो है!

कोंडिबाः—छदाम देणार नाहीं! नाहीं तर नाहीं! आतांपावतर लई खाल्ला पैका बापाचा तुम्ही.

गट्टुलालः—अरे ए! जा जा जा साला! बाटली हेलवीचा! परमेश्वरी होणा!

कोंडिबाः—खिशांतच वस्तरा आनला हाय! हतंच बिन पाण्यानं करतों!

वराहशास्त्रीः—तोंड संभाळ! मुस्काड फिरवून देईन!

चीफ ऑफिसरः—ए नाव्हड्या, रस्ता रुंद करून टाकून घरासमोरचें ड्रेनेज उपसून काढीन!

गट्टुलालः—अरे जा! गम्पलाण्टर! वो कांई दवाखाणेका पीपा खाणा नही हैं!

डॉक्टरः—अरे होय! कीर्दखतावणीच्या! तें कांहीं खडीच्या राशींत माती दडपणें नाहीं आहे!

कोंडिबाः—त्यें काई लेका कडबा वैरणींत पैसा उडवणं नाहीं आहे!

वराहशास्त्रीः—तोंड संभाळ! वस्ताऱ्याचा नांगर करीन! वस्ताऱ्याचा नांगर करीन!!

कोंडिबाः—तें कांहीं माळणीला फुकट गाळा देऊन भाजी खाणं नाहीं!

गट्टुलालः—लोखंड लकडी चूणा भगवाकर बंगला बंधवाणा नहीं है!

प्रो० ठोंबेः—ए मारवाड्या! चरबी बाहेर काढीन!

डॉक्टरः—टेबलावर आडवा घालून ऑपरेशन करीन.

गट्टुलालः—अरे जा! जा!! छुरीकैचीवाला! माणसके कषाई, वो कांई रखेलीको सुईण नेमणा नही है!

कोंडिबाः—सैपाकनीला मास्तरीण नेमून मजा उडवणं नाहीं आहे.

प्रो० ठोंबेः—ए नॉमिनेटेडा तीन शेंड्या! तोंड पूस, तोंड पूस! काळं लागलं आहे बूट चाटल्याचं!

प्रेसि०अजागळः—ऑर्डर इन दि मीटिंग! ऑर्डर इन दि मीटिंग!

कोंडिबाः—बसली धाण्यावर आतां मीटिंग!

चीफ ऑफिसरः—थांब लेका सलूनवाल्या, दाखवतों तुला हात!

[एकमेकांत कुस्ती.

कोंडिबाः—थांब! तुझं वस्तऱ्यानं नाक कापतों! [त्यास धरतो.

पांडोबाः—घाल पालथा! घाल पालथा!

[एकमेकांवर खुर्च्या, तक्के, कागद फेंकून मारतात.

प्रे०अजागळः—आय डिझॉल्व्ह् धिस मीटिंग!

पांडोबाः—आजच्या सभेचें काम इतकेंच पुरे! [सर्वजण मध्यें पडून कुस्ती सोडवितात. आश्चर्यानें 'हे काय, हें काय' असे म्हणतात.]

धेनुवल्लभः—सभ्यगृहस्थ हो! झाला हा प्रकार फार वाईट झाला! आता या शेवटच्या दिवशीं आपसांत एकमेकांबद्दल द्वेष, सूड, मत्सर वगैरे ठेवून जाणें, मलाही ठीक दिसत नाहीं. तरी सर्वत्रांनीं सर्वत्रांना क्षमा करून दसऱ्याच्या दिवशीं सोनें वांटतांना जसे भेटतात, तसे भेटावें अशी माझी पदर पसरून सर्वांस प्रार्थना आहे. (प्रत्येकापुढें पदर पसरतो; प्रत्येकजण 'माझी तयारी आहे' असें म्हणतो. व दुसऱ्यास कुंभार, चांभार, धनगर असें म्हणतात. शेवटीं, 'झालें तें होऊन गेलें' असें म्हणून सर्व एकमेकांस भेटतात. 'धेनुवल्लभ लाख माणूस आहे' असें म्हणतात.)

प्रेसि० अजागळः—हा शेवट गोड करण्याचें सर्व श्रेय, धेनुवल्लभ, तुम्हांला आहे.

प्रो०ठोंबेः—काय गोष्ट आहे त्यांची! या कोंडीबा! आपण सगळे भाऊ भाऊ आहोंत. (सर्व–'सर्टन्ली! वुइ आर ऑल ब्रदर्स! वुइ आर ऑल ब्रदर्स!!', आहांतना? तर मग जोरानें इलेक्शनच्या मागें हात

धुवून लागून पुन्हा निवडून येऊं या! अगदीं इलेक्ट होऊन येण्याबद्दल प्रत्येकानं जिवाची देखील पर्वा करतां कामा नये. (सर्वजण:–अलबत्.) चला तर मग.

पद

चला बंधुंनो म्युनिसिपॅलिटी मेंबर आपण होउं या ॥
बापशेटीची पेंड येथली खस्थ बसुन मग चावुं या ॥ध्रु०॥
खोट्या कंत्राटास देउनी मुबलक पैसा खाउं या ॥
काका मामा टेंडर घालिल, पास करुन तें देउं या ॥१॥
मार्केट-गाळे फुकट वांटुनी तरुण माळिणी स्थापुं या ॥
आपआपल्या आवडत्यांना सुइण मास्तरिण नेमुं या ॥ २॥
नाक्यावरची मालगाडी टॅक्स् चुकवुनी आणुं या ॥
दारापुढती गटार कंदिल पाणी शिंपुनि घेउं या ॥ ३ ॥
बहुतां शब्दीं मुळीं न गोडी एक्या शब्दीं सांगुं या ॥
'स्वार्थ' खरा परमार्थ झूट है मूलतत्त्व जगिं स्थापुं या ॥ ४ ॥

दुसरा अंक समाप्त

अंक तिसरा

प्रवेश पहिला

[स्थळः-रस्ता.]

वराहशास्त्रीः—आहे काय जुलूम! शंभर ठिकाणीं हिंडलों! जिथें तिथें हा धेनुवल्लभ मधें आडवा पडतो! ज्याला विचारावं तो आपला धेनुवल्लभाला मतें द्यावयाचीं म्हणून सांगतो! प्रश्न विचारायचा अवकाश कीं आपले धेनुवल्लभाला द्यायचीं कबूल केलीं आहेत असं उत्तर येतें. पैसा ओतायचा ओतायचा किती! सगळ्या गांवाचीं मतें आपल्याच पेटींत कोंबून घेऊन एकट्याचीच मुनसिपालिटी करतो कीं काय? तो गट्टुलाल मारवाडी, कोंड्या न्हावी, खंडू परीट, तो हरामचे खाऊन माजलेला बलभीम आखाड्याचा पेहेलवान बक्करखां, सगळेच उभे राहिले आहेत यंदां! त्यांच्यापुढें आपला निभाव कसा लागावा? अरे! कोण हा? होय, तोच तो! आपण आतां याच्याशीं अगदीं बेमुर्वतपणानेंच वागावे!

धेनुवल्लभः—वराहशास्त्रीबुवा अगदीं गहन विचारांत गढून गेलेले दिसतात! (जवळ जाऊन नमस्कार करतो.)

वराहशास्त्रीः—याला मी म्हणजे परसांतली भाजी वाटलों होय? शास्त्री म्हणजे काय चीज असते तें यालाही कळलेंच पाहिजे!

धेनुवल्लभः—शास्त्रीबुवा, नमस्कार. हें पहा, मी एका अत्यंत नाजूक कामाकरितां मुद्दाम तुमच्या भेटीला आलों आहे!

वराहशास्त्रीः—तुमची जरा भाषासरणी बदलाल तर बरें! माझ्यासारख्या विद्वान् तत्त्वमीमांसक पंडिताला तुमचें भाषण अत्यंत विसंगत वाटत आहे! म्हणून म्हणतों कीं, भाषासरणी बदला! म्हणा तर प्रथम, मी मुद्दाम आलों नसून मी केवळ आल्याचा भास होत आहे!

धेनुवल्लभः—म्हणजे काय? मी आल्याचा भास होत आहे? अहो पण, धडधडीत तुमच्यासमोर उभा आहे ना?

वराहशास्त्रीः—शंकास्पद आहे!

धेनुवल्लभः—वाहवा शास्त्रीबुवा! तुम्ही आणि मी प्रत्यक्ष संवाद करीत आहोंत, हें सर्व भासमय आहे म्हणतां?

वराहशास्त्रीः—निश्चयेंकरून हेंच सत्य आहे, असें मात्र म्हणतां येणार नाहीं!

धेनुवल्लभः—बरें, तें जाऊं द्या. उगीच नको रिकामा त्याचा काथ्याकूट या वेळेस! मी तुमच्याशीं अत्यंत नाजूक गोष्टीविषयीं विचारपूस करण्यासाठीं आलों आहें. मी एका कुलीन स्त्रीशीं लग्न करण्याचें योजिलें आहे!

वराहशास्त्रीः—मोठे शहाणेच अहांत! मला पण त्याचें ज्ञान नाहीं!

धेनुवल्लभः—अहो, पण मी सांगतोंना, विस्तार पावती होऊन ठरलें आहे म्हणून!

वराहशास्त्रीः—असें काय? शक्य आहे!

धेनुवल्लभः—हें पहा, मला कांहीं तरी एक सांगा!

वराहशास्त्रीः—चला लांब सरा. (स्वगत) हा पुन्हा लाडीगोडी लावून सलगीच्या गोष्टी बोलायला लागला. तें कांहीं नाहीं, आपण याच्यावर आपल्या पांडित्याची आणि निस्पृहतेची छाप ठेवून भारलाच पाहिजे.

धेनुवल्लभः—हें पहा शास्त्रीबुवा, असें हिडिसफिडिस करूं नका! त्या स्त्रीविषयीं—

वराहशास्त्रीः—हां, हां, चुकी होत आहे! आत्म्याच्या ठिकाणीं लिंगभेदादि उपसर्ग लावणें धर्मबाह्य असून शास्त्रसंमत नाहीं!

धेनुवल्लभः—वा महाराज! असें कसें शास्त्र सांगतें? म्हणजे काय? ती स्त्रीच नव्हे म्हणतां?

वराहशास्त्रीः—तें काय सांगावें? असंभवनीय नाहीं?

धेनुवल्लभः—आणि मी पुरुष?

वराहशास्त्रीः—तुम्ही तसे असल्याचा तुम्हांस भास होत आहे!

धेनुवल्लभः—मी पुरुष असल्याचा मला मुळींच भास नाहीं! मला प्रत्यक्ष डॉक्टरनीं सांगितलें आहे. मी पुरुष त्या स्त्रीशीं लग्न लावणार!

वराहशास्त्रीः—हें काय भलतेंच भाषण करीत आहां? केवळ आत्म्याच्या दृष्टीनें विचार करितां, तिचें तुमच्याशीं लग्न लागलें काय, माझ्याशीं

लागलें काय, किंवा गांवच्या पाटील–रामोशाशीं लागलें काय; आध्यात्मिक. दृष्टया एकच आहे! कर्म हें फलाशेचा त्याग करून, केवळ लोकसंग्रहार्थ केलें पाहिजे!

धेनुवल्लभः—हा नमस्कार तुमच्या प्रचंड कर्मकांडाला! ह्यानें लोकसंग्रहाची ही काय भानगड उपस्थित केलीन्!

वराहशास्त्रीः—तुम्हांला ग्राह्य नसेल तर सोडून द्या. काय बिशाद आहे! माझ्या ज्ञानाची छाप पडलीच पाहिजे! हा जो थोडा घुटमळतो आहे, तोंच आपण येथून पाय काढावा. ठीक आहे, मला लोकोपयोगी कामाची अत्यंत निकड असल्यामुळें तिकडे गेलेंच पाहिजे. [जातो.

धेनुवल्लभः—हा तरी मला मोठा विलक्षणच गृहस्थ दिसतो! लग्नकर्मदेखील लोकसंग्रहार्थ करावें, असें शास्त्रवचन आहे म्हणतो! काय सांगावें, असेलही धर्मसिंधूंत तसें लिहिलेलें! आपल्यासारख्या व्यावहारिक व्यापारी माणसाला कशाला घडणार धर्मसिंधूचें स्नान! अशाच कुणीं येतांजातां चार घागरी डोक्यावर ओतल्या तर स्नान घडायचें! तें कांहीं नाहीं. असा बावनकशी माल हातचा गमवायचा थोडाच? (शेख व गंगू मुजरा करून लखोटा देतात) हा तर सरकारी दिसतो.

[लखोटा फोडून पत्र वाचतो.

शेखहुसेनः—हां साहेब! वो पट्टेवालेने आपको देनेके वास्ते मेरेपास दिया!!

धेनुवल्लभः—(पत्र वाचून) काय! काय! काय! काय! "मेहेरबान अळूपिष्टणसाहेब बहादुर इलाखे मुंबई यांजकडून कळविण्यांत हर्ष होत आहे कीं, सरकारची आपणावर मेहेरनजर झाली असून, आपणास रायबहादुरचा किताब देण्यांत आला आहे. सदरील किताबाचा बिल्लेपट्टा, वगैरे देण्याचा समारंभ, तारीख, लवकरच कळविली जाईल." बस् बस्! मेरे पितर सरग भये! (पत्राचा मुका घेतो व धावून शेखहुसेनला मिठी मारतो.) अरे अस्मानांतल्या देवदूता, बोल! हे नागकन्ये, बोला तुम्हांला काय देऊं! (सलकडीं दोघांसही देतो) अरे धरा मला, अरे पकडा मला! मला हा आनंद आवरेनासा झाला आहे! मी अगदीं हर्षाच्या भरांत हंबरडा फोडण्याच्या बेतांत आलों आहें. (दोघें दोही-

करून त्यास धरतात. घेनुवल्लभ पत्राचा मुका घेऊन वर हात जोडतो.) हे जन्म-जन्मांतरीच्या सोयऱ्या! अल्लुपिछ्छणसाहेब बहादुरा! पंचप्राणेश्वरा! तुझ्या उपकाराच्या पर्वतानें पिष्ट होऊन, तुझ्या बुटाखालील केवळ पायधूळरूपी मी आतां जगांत उरलों आहें! हे उपकार मी आतां फेडूं तरी कसे? [illegible] की हिंदुमुसलमानांत भांडणें लावूं का सत्य-शोधकांना कलेवर देऊं! का ब्राह्मणांना शिव्या देऊं? सहकुटुंब पंक्त्या-वर येऊं! का तुकाराम घरीं बोलावूं? घराला आग लावूं? कीं सगळें हिंदुस्थान पेटवूं? काय करूं? काय करूं न् काय न करूं!

शेखहुसेनः—काय करूं, काय करूं नही करना? सरकार, अभी आप जो बोले, वो सब बाते करना! एक दो करके नही चलेगा! सब करना चाहिये! हां! हां! सब बडे बडे सरदार लोक, क्या दूसरा करते है?

धेनुवल्लभः—काय म्हणतोस? बहुतेक मोठमोठे विश्वासू मानकरी असेच वागतात? तर मग मी तरी माणसांतून कशाला उठून जाऊं? काय करूं? हे हिंदु-मुसलमानांच्या सापमुंगसांना, ब्राह्मण-शूद्रांच्या कुत्र्या-मांजरांना, स्पृश्य-अस्पृश्यांच्या टोणगेबोकडांना, निरंतर हक्कदानाच्या मधुर मुरलीनें गुंगवून त्यांचा खेळ करणाऱ्या [illegible], आतां तुझे उपकार फेडूं तरी कसे! याउप्पर अंशतः तुझें उतराई होण्याकरितां, हे मांत्रिका, तुझें माझें हेंच नातें अखंड राहणार! तूं शंकर तर मी नंदी; तूं गारुडी, मी मदारी; तूं दरवेशी, मी अस्वल! जा, जा, सर्व मुनसिपालिटींतील चतू-साऱ्या झाडूमास्तर, भंगीमास्तर, कचरामास्तर, वगैरे सर्व मास्तरांना व मेंबरांना घरीं मेजवानीला व [illegible] घेऊन या.

शेखहुसेनः—सरकार, इसकोलके मास्तर बुलाऊं?

धेनुवल्लभः—होय, होय. शाळामास्तर देखील! भरूं दे एक दिवस तरी पोट त्या बिचाऱ्यांचं माझ्या घरीं! ही बातमी माझ्या पांड्याला आणि कपिलेला केव्हां सांगेन असें झालें आहे! [जातो.

शेखहुसेनः—टांगेवाले, छकडेवालोंको, छकडे टांगोका लायसन मिलनेके बखत, उन्होंकी जितनी तालाशी होती है, अगर वो उतनीभी तालाशी इनलोगोंकी होगी, तो इन् बेवकूफोंपर ये मुसीबत आ न पडती! जाने दो! क्यौं! तुझे क्या कहता था? नसीबका चक्कर फिरजायगा!

सिग्रॉउडपर घोडा लगनेके बदला, घर बैठे यहांके यहां, रास्तेमेंही घेनु-
ल्लभका गधा लग गया! देख चालीस तोले सुना है!

गंगूः—अन् हुसन्या, (अंग घुसळते) माझ्यावर तुझं प्यार हाय का नाय! खरंच सांग, अगदीं तुज्या बाची आन!

शेखहुसेनः—अरे प्यारी! क्या पूछती है! मेरी जान तुजपर कुरबान है!

गंगूः—मंग ले सलकडं आन् इकड. तवा म्हनन तुझी खरीच पीरीत है!

शेखहुसेनः—बस्! अच्छा तो लेले! लेकिन देख, मेरी चांदबिबी, मेरेसे बेइमान तो न होगी! वो इंजर्णीर, और डॉक्टरकूं देखतेही आखोंकी मांदमारी तो नहीं चलायगी! वो मोतीवाले मेंबर के यहां, सुबेही झाडू देनेके बहानेसे गडप तो न हो जायगी! देख! याद रखना, मै मुसलमीन हूं! नाकही काटलेउंगा! अच्छा तो, ये लेजानी!

गंगूः—नाहीं, नाहीं, नाहीं. अशी तुज्या जिवाचा उतारा होऊन-शान् पडून न्हाईन, मंग तर झालं!

शेखहुसेनः—इतना प्यार करती है तो ला! दोनोभी इधर दे. अभी सुनारके यहां जाकर मोहनमाला बनवा ले आतहूं! (ती दोन्ही कडीं देते) आखर औरतसो औरतही होती है! अब ये लगातां हूं! अब यारकू क्या कम् है—

पद

सुलतान शहरके यार हम तो मुनसिपालटीवाले!। नवाब
बने है यार हमतो मुनसिपालटीवाले ॥ ध्रु० ॥ ये है
पगलों का बाजार!। हमपर नहिं रखना इतबार!। अडप
झडपका, माल दबाकर मजा उडानेवाले! ॥ १ ॥
सीनेसे खींच लगाले। बोंसोंके भरदे प्याले। भरी
जवानी, शराब तेरी मुझे पिळादे पीले ॥ २ ॥

प्रवेश दुसरा

[स्थळः-धेनुवल्लभाचा दिवाणखाना.]

कपिलाः—भारी बाई खोडकर स्वभाव आहे हो तुमचा! आज इतके दिवस सहवास झाला असून देखील, तुमच्या स्वभावाचा मला तुम्हीं थांग लागूं दिला नाहीं! मी मात्र अगदीं भोळीभाबडी हो! माझं मेलं पोटांत आलं कीं ओठांत येतं. अगदीं कसं तें मनांत ठरत नाहीं. आतांशे अगदीं मुनसिपालिटीच्या कामांत अगदीं इकडचं इकडे व्हावयाला फुरसत होत नाहीं ना? माझं स्मरण तरी होतं का!

पांडोबाः—हें पहा कपिलाबाई, आजउद्यांत इलेक्शनला सुरवात आहे! तेव्हां कुठे जाऊन प्राण द्यायलासुद्धां मला फुरसत नाहीं. शिवाय हें पहा, आतां मला तुमचें स्मरण मुळींच होणार नाहीं! तुम्हीच माझें निरंतर स्मरण करीत जा! समजलांत!

कपिलाः—पुरुषांची जातच बेमान म्हणतात तें उगीच नाहीं! धेनु-वल्लभाच्या संपत्तीच्या पिकलेल्या रानांत, धेनुवल्लभाच बुजगावणं उभं करून, तुमच्या सहवासांत खुशाल चारा खाऊन उड्डं बागडूं म्हटलं, त्याचं असंच का परिमार्जन करणार तुम्ही? बरं हो! बरं, बरं, समजलं तुमचं एकदांचं! खोटे कुठले!

पद

नरमनिं मुळिं नये कल्पना त्यांना॥ निजहृदयापरि
गणिती ललना॥ध्रु०॥ वागवि प्रेमा, किती मानिं ललना,
करिती अवमाना॥ कटुवचना वदुनिया, करिती
अपमाना॥ १॥

बरं हो! समजलं तुमचं सर्व अंतरंग! खोटे कुठले! [रडूं लागते.

पांडोबाः—हें काय वेड्यासारखें! झालें, झालें, आल्या का गंगा-यमुना पाण्यावर! आज हिनें कांगावा सुरू केलेला दिसतो, मुनसिपालिटी-च्या आख्यानाचा इलेक्शनचा आतां तिसरा अंक सुरू झाला आहे. तेव्हां थोडी उरली म्हणून थोडी कळ सोसून हिचा कांगावा असाच थोडा वेळ

सहन केला पाहिजे! हें पहा, मनाच्या निरनिराळ्या रागरंगांत मीं तुम्हांला पाहिलें आहे. पण या रुसण्याफुगण्याच्या आविर्भावांत मीं तुम्हांला मुळींच पाहिलें नव्हतें, म्हणून जरा चुणुक बघितली! बाकी आपल्या प्रिय वस्तूला, ह्या आविर्भावांत बघण्यांत मोठी मौज असते खरीच! पाहतां पाहतां, ह्या ओंठांनीं, गालांनीं, हनुवटीनें, भुवयांनीं, काय दंगा केला! उष्ण श्वासांचे झंझावात सुटून, कांचनमेरु कंपायमान होऊन, डोळ्यांत विजा चमकून मोठा गडगडाट होऊन शेवटीं शेवटीं पर्जन्य पडूं लागला! हें पहा, मी मघाशीं जें म्हणालो, त्यांत एक अक्षरसुद्धां खोटें नाहीं! मला तुमचें स्मरण कसें होणार? ज्या मनाचा धर्म स्मरण, त्या मनाचेंच जर सर्वस्व हरण तुम्हीं केलेंत, तर मग मी काय करणार?

कपिलाः—(हंसून) असं का? मी उगीच नाहीं म्हणत तुम्हांला खोडकर! काव्यालंकारांत बरेच निपुण आहांत तुम्ही देखील! पण हें ठाऊक आहेना? सुंदर कवितावधू, ही देखील वैदिक-वैय्याकरणीयांना पित्यासारखे समजून, मीमांसकरूक्षांना झिडकारून देते. शब्दच्छल करणाऱ्या राक्षसांना माधुर्यरसाचा कुंभ हातीं लागूं न देतां रसिकांच्या मात्र आपण होऊन सर्व स्वाधीन करते! काय? मी म्हणतें यांतलं मर्म आलंना लक्षांत?

पांडोबाः—आलें लक्षांत! कवितारूपी ललनेचें पुष्कळांना चुंबन घडतें पण तिचें हृदय हस्तगत होणें फारच थोड्यांच्या नशिबीं असतें, असाच कीं नाहीं तुमचा भावार्थ—?

कपिलाः—असाच हो भावार्थ—

पद

कळती या रसिकां सुजनां। हृदयभावना कामना ॥ध्रु०॥
लवगुणांसि देउनि महती। विस्तारुनि करिती कौतुकां-
ना ॥ १ ॥ त्यजुनि दोष करिति सेवना। गुणगणचि
रुचे गुणिजना ॥ २ ॥

म्हणूनच मी तुम्हांला रसिक म्हणतें. रसिक विनोदानें जरी विपरीत बोलला

तरी वाणींतलं सरसत्व जात नाहीं. परंतु नुसते साक्षर मात्र जरा विपरीत झाले कीं राक्षसांच्या पंक्तीला जातात!

पांडोबाः—ही पटाईत विदुषी मला थोडीच हार जाणार आहे! इतक्यांतच आपलें स्वरूप प्रगट करूं नये. थोडीशी अधीच कळ सोसून हिला झुलवावी, त्याशिवाय मुनसिपालिटीचें समग्र प्रहसन दृष्टीस पडणार नाहीं. हें पहा, येवढें धेनुवल्लभाचें घोडें मुनसिपालिटीच्या गांवगंगेत आपण करामतीनें ढकलून, त्याला स्नान घातलें म्हणजे आपलें काम झालें! त्याच्याच जिवावर स्वार होऊन आपणाला वाटेल तिकडे फेर-फटका करतां येईल. पुढील बेत कसा ठरवायचा तो मीं या पत्रांतच लिहून आणला होता. म्हटलें, कदाचित् म्हसोबा इथें असलाच तर बेत ठरवायला संधि सांपडणार नाहीं, म्हणून पत्रच लिहून आणलें होतें झालें. हें घ्या! (पत्र देतो) हे पहा! आठवण करतांच हजर!

[धेनुवल्लभ हातांत लखोटा घेऊन प्रवेश करतो.

धेनुवल्लभः—पांड्या! मी कोण आहें? नीट लक्ष देऊन सांग.

पांडोबाः—कोण आहे म्हणजे? सरदार, आपण धूर्त लोकांचे अन्नदाते!

धेनुवल्लभः—छट्! नाहीं! सांगा! ऐकलेंत का? तुम्ही सांगा! मी कोण आहें? आज माझ्यांत तुम्हांला फरक नाहीं दिसत? काय? नाहींच ओळखायचें!

कपिलाः—इश्श्! त्यांत काय ओळखायचें? आपण या इलेक्शनमध्यें खात्रीनें निवडून येणारे काउन्सिलर नव्हे प्रेसिडेन्ट आहांत!

धेनुवल्लभः—छट्, नाहीं! सांगा मी कोण आहें?


पांडोबाः—सरदार, आपण मनुष्य आहांत!

धेनुवल्लभः—छट्! नाहीं! पुन्हा पहा.

पांडोबाः—नाहीं? तर मग, (सभोंवार पाहतो) छट्! मनुष्यच आहांत! कोण म्हणतो नाहीं? मनुष्यच!

धेनुवल्लभः—नाहीं!

पांडोबाः—अस्सं? मग आहे खरं कोडं! आपण मनुष्यरूपानें कोण बरें आहांत? काय सांगावें?



धेनुवल्लभः—सरकारच्या विश्वासांतला, कृपेतला, रायबहादुर सरदार धेनुवल्लभ ! [पृष्ठ ८९.

धेनुवल्लभः—हा लखोटा वाचा! सरकारच्या विश्वासांतला, कृपेंतला, रायबहादुर सरदार धेनुवल्लभ!

पांडोबाः—रायबहादुर झाला तरी पण मनुष्यच!

कपिलाः—छट्, नाहीं? सर्वच रायबहादुर मनुष्य असतात असं नाहीं!

पांडोबाः—असं, असं, हे मनुष्यांत श्रेष्ठ, असें तुमचें म्हणणें? असें! नरश्रेष्ठ रायबहादुर सरदार धेनुवल्लभ!! पाहिलेंत सरदार, आत्तांपासूनच काय कैवार घेणें चाललें आहे तुमचा?

धेनुवल्लभः—त्यांत काय आहे! आहेच माल तसा बावनकशी!

पांडोबाः—व्यापारी माणूस एकंदरींत चौकस असतें खरेंच!

धेनुवल्लभः—आतां ह्या ईश्वरी देणग्यांच्या वर्षावावर एकदां मुनसिपालिटींत निवडून येऊन, यांचा कळस चढला, म्हणजे झालें!

पांडोबाः—तुम्हांला मुळीं काळजी नको, कपिलाबाई रात्रंदिवस कळस घेऊन हजर आहेत! आपलें निवडणुकीचें मंदीर उभें राहिलें, कीं ह्यांनीं कळस स्वाधीन केलाच!

धेनुवल्लभः—हें पहा, आतां इतक्यांत सर्व मंडळी जमणार आहेत! तसेंच नायकिणीचें गाणेंही होणार आहे. तरी सर्व व्यवस्था चहा, कॉफी, सोडा, लेमन, वगैरे तावडतोब करवा. तुमच्याशिवाय आमच्या श्रीमंतीला साजेसा थाट उडणार नाहीं!

कपिलाः—आपल्या आज्ञेबाहेर कां मी आतां आहे? तेवढ्या आंतल्या तिजोराच्या किल्ल्या द्यायच्या बरें!

धेनुवल्लभः—ह्या घ्या! नोटा वगैरे वरच्या खणांत आहेत. तावडतोब नोकराचाकरांना सांगून व्यवस्था करा! (जाते.) पांडया, इंग्रजी राज्य म्हणजे, बस् बस्! कल्पनातीत आहे! काय मान आहे! काय पदवीदान आहे! कायरे पण, मी हटकून निवडून येईनच ना पण?

पांडोबाः—त्याची काळजी नको. हा दासानुदास काय करामत करतो आहे, कल्पना नाहीं तुम्हांला! काल गांवांतले झाडून आपल्या वगीचे सारे लोक, आपल्या अन्नछत्रांत चारून आणून तुम्हांला व्होट देण्याविषयीं बेलभंडार उचलविलें! कालच दोनशें बेवारशी कुत्र्यांना पट्टे अडकवून, चांभारवाड्याच्या प्रत्येक माणसाच्या नांवावर कुत्रेपट्टी

देऊन कुत्रें नोंदवलें! बिचारा? बेवारशी कुत्रें, एक तरी गांवांत फिरकतें का तें! दिसलं कुत्रें की धर, दिसलें कुत्रें की धर, असा सपाटा चाल-विला आहे! मी सांगतों तुम्हांला तुमच्या नांवाची लहान पेटी ठेवण्या-ऐवजीं, मोठी कचऱ्याची पेटी, सँक्शन घेऊन ठेवणार आहे. त्याशिवाय तुमचीं सर्व मतें मावणार नाहींत!

घेनुवल्लभः—शाबास! हे पहा, या वेळेस पैशाकडे पाहण्याची वेळ नाहीं! कायरे, पण हा कांहीं गुन्हा होत नाहींना कायद्यानें?

पांडोबाः—छट्! काय बिशाद आहे कायद्यांची! श्रीमंत, सरदार, रायबहादुर, खानबहादुर वगैरे सरदारांच्या हातून गुन्हा घडूंच शकत नाहीं! शक्यच नाहीं! इतरेजनाला, गुन्ह्याबद्दल शिक्षा होते, पण श्रीमंतांना, अधिकाऱ्यांना, कधींही होत नाहीं; म्हणजे काय, तर ते गुन्हाच करीत नाहींत! गुन्हा करण्याला असमर्थच असतात!

धेनुवल्लभः—काय कायद्यांचा खोल अर्थ जाणतोस!

पांडोबाः—काय बिशाद कायद्यांची, बलवंताकडे वक्रदृष्टि करण्याची! कवड्या पैसे लावून जुवा खेळा, शिक्षा होते! रेसीसला यात्रा जमते! वशीकरण, कामोद्दीपक जाहिराती छापा, शिक्षा होते! लेडीच्या नम्या नाचाला मोटारींची गर्दी होते! अनंत सूक्ष्म भेद आहेत! गरीब मारामारी करूं दे, शिक्षा होते! अधिकारी बूट मारूं दे, पानथरी वांचवते! गरीब बोळांत, गल्लीत बसूं दे, शिक्षा होते! कौन्सिलर मार्केटाच्या चव्हाटयावर बसूं दे, सुटका होते!

धेनुवल्लभः—पांड्या! पांड्या! गहजब केलास तूं! बेटया, बॅरिस्टर कां झाला नाहींस?

पांडोबाः—हा पहा शेखहुसेन आलाच.

[शेखहुसेन, अंबू, गंगू, धोंडोपंत प्रवेश करतात.

शेखहुसेनः—सरकार! सब मेंबरलोग दौडते आ रहे है!

पांडोबाः—कायहो धोंडोपंत, मग ते टांगेवाले ऐकताहेत का आठशें रुपयांला?

धोंडोपंतः—छेः! ते भलतेंच धरून बसले आहेत!

पांडोबाः—काय, काय ते असें भलतेंच धरून बसले आहेत? काय ह्मणतात तरी काय?

धोंडोपंतः—रोख पंधराशें अगोदर हातांत पाहिजे म्हणतात. नाहींतर ते कोंडीबा न्हावी याला देतों म्हणतात.

पांडोबाः—चढले आहेत लेकाचे फार! नुसतेंच स्वस्थ धरून बसा म्हणावें! बरें, ते तालमीतले काय म्हणतात?

शेखहुसेनः—सरकार, वो कहते हैं, हर एक पेहेलवानकू एक महिना बदाम, पिस्ते, खुरमा, मुर्गी, खुराक खिलावेंगे तो ऑठ मिल जायंगे, और कहते है, उन लोगोंके महेलेमे, मुनसीपालटीके पायखाने नही है! इसलिये खुराक चालू करनेके अव्वल, पायखानेका बंदोबस्त किया जावे! और नही तो साफ कहते है की हम उस्तादजीको ऊंठ देंगे?

धोंडोपंतः—बदमाश लेकाचे, आम्हांला त्यांच्या उंटाची साफ जरूर नाहीं! खुशाल बस्तादजीला उंट देऊन त्याचेच घर भरवा म्हणावें!

धेनुवल्लभः—हें पहा धोंडोपंत, पांड्या, थोडक्याकरितां मागेंपुढें पाहूं नका. जाऊं द्या गेले तर पांच चार हजार. ही वेळ नाहीं फार ओढून धरण्याची! पांड्या, प्रोफेसर लोक काय म्हणतात रे?

पांडोबाः—सरदार, प्रोफेसरांची तर या गांवांत अशी खिचडी माजली आहे, कीं कांहीं विचारूं नका. नुसती गर्दी झालेली पाहून एक धोंडा मारा दहा पांच प्रोफेसर्स खालीं पडतील. मिसरूड न फुटलेलें युनिव्हर्सिटीच्या अंड्यांतलें नुकतेच बाहेर पडलेलें पोर एकजात प्रोफेसर म्हणवतें आहे. नुसतें नाक धुतां येत नाहीं त्या पोराला. मग इतर साफसफाई दूरच राहिली! आणखी प्रोफेसरांच्या गर्दींत प्रो० विडीवाले, प्रो० सर्कसवाले प्रो० चिवडेवाले, प्रो० चहावाले वगैरे मिसळल्यामुळें, प्रोफेसरांचा नुसता धुमाकूळ उडून गेला आहे! यांच्या मुळींच नादांत पडायला नको! अहो, कुत्रापट्टीवाल्याची आणि प्रोफेसराची, मतांच्या दृष्टीनें एकच किंमत! या बावळटांच्या नादीं लागण्यापेक्षां, पांचशें कुत्रीं सोडतां प्रोफेसरांच्या ऐवजीं! तुम्ही कां भितां?

धेनुवल्लभः—पांड्या, पांड्या, काय, काय करामत आहे तुझी!

बस्, बस्, गहजब करतो आहेस तूं! गंपू, तुझें कशें काय? तें कांहीं चालायचें नाहीं. तुझ्या वेटाळांतलीं सगळीं मतें इकडे आलींच पाहिजेत!

धोंडोपंतः—कां समजलीस ना? गंगे, सगळा महारवाडा तुमच्याकडे लागला!

गंगूः—सरकार, आतां महारोडा हाय कुठें बाहेर! संमदा गांवांतच आलाया उठून!

धोंडोपंतः—हो, पण त्यांच्या घरोघर जाऊन काम केलं पाहिजे तुम्हीं.

गंगूः—पण घरं उमगत नाहींत हो! इचारा अंबीला, दहा वेळ फसलों बगा. योक वेळ पिन्या म्हणून शिंद्याच्या घरांत शिरलों! रकम्या म्हून बामनाच्या शिरलों! तवा दिला नाद सोडूनशान्. लई लई फसगत होतीया महारवाडा उठल्यापासन! कांहीं इचारूं नका! काल बगा, ही अंबी तुमच्याच घरांत शिरली, आन् जवाका तुमची बायको धावली खराटा घेऊन शिव्या येत आमच्या मागं, तवा उमगलं ह्यो तुमचंच घर हाय, अहो खरं म्हनल्येना! मीं सांगितलं अंबीला, कीं ह्यो म्हाराचं घर नाहीं दिसत. तवा मला दाटून आणि झिडकून ही अंबी म्हणते कसं, कीं अग चल बया! ह्यो तर माझ्या म्हेवन्याचं घर हाय! पण जवा का खराटा बसला पाटाणींत तवा उमगलं तिला! असं होतया. म्हून म्हटलं कसं करावं?

धेनुवल्लभः—मनापासून कामें करा म्हणजे झालें. हो खरेंच, काय रे पांड्या, आम्ही आतां एक दोन दिवस उजाडतांच, मुनसिपल करपुरेशनचे अध्यक्ष होणार! त्यांतून पडलों रायबहादुर! तेव्हां राजकीय धोरण काय ठेवूं? कारण, माझी आतां देशभक्तांत—पुढाऱ्यांत गणना होईल!

पांडोबाः—सरकार! बरोबर आहे! कौन्सिलर लोक बिचारे खरोखरीच मुनसिपालिटीचा धंदा करणारे असून, मूर्ख नागरिक लोकांनीं त्यांच्यावरती देशभक्तीचा नुसता जुलूम चालविला आहे. त्यांच्या नांवें श्रीयुत देशभक्त [illegible]; किंवा राष्ट्रीयसभाभक्त वगैरे पदव्यांचे भाले ठोंकून, नुसती भर दिवसां मोंगलाई माजविली आहे! [illegible], [illegible], [illegible], वगैरे [illegible] [illegible] [illegible] देऊन, त्यांच्या [illegible] [illegible] [illegible] आहे! [illegible] भयंकर [illegible]

~~आक्षेप त्यांच्यावर करून त्यांना लोक [illegible] [illegible]~~

धोंडोपंतः—बिचारे गाईसारखे ते निरपराधी असून, हे मूर्ख नागरिक कसाई, त्यांचा गळा कापताहेत. हर ! हर ! इंग्रजी आहे का मोंगलाई आहे ? काय करतील बिचारे ! पोटासाठीं निमूटपणें जुलूम सोसताहेत हो !

घेनुवल्लभः—अरे, अरे, अरे, काय रे पांड्या ? धोंडोपंत, असे गहिंवरूं नका ! कायरे, मग हे बिचारे मनांत नसून जुलमानें भलतींच लेक्चरें देतात कारे ?

पांडोबाः—काय करतील बिचारे ! कणीक ! कणीक ! निर्जीव मृदंगाला देखील कणकेचा गोळा चिटकवतांच, अवघड बोल बोलायला लागून घुमूं लागतो ! आणि हे तर बिचारे हाडामांसाचे चालतेबोलते धंदेवाईक मृदंग ! चांगली कणीक तिंबून गोळा लावतांच, धृपद, धमार, गजपर्णाचा अवघड बोल काढून घ्या !

धोंडोपंतः—पांडोबा, म्हणजे काय ?

पांडोबाः—अहो धोंडोपंत, तळिराम गार झाला, म्हणजे देशभक्ति जगदुद्धार, जगत्कल्याण, वाटेल तशी बडबड करायला जीभ वळवळ करायला लागते !

घेनुवल्लभः—पांड्या, बस्, बस्. गहजब केलास तूं ! काय मान आहे ! काय लोककल्याण आहे ! मला वाटतें नुसतीं पुस्तकें वाचून, तुझ्यासारखा पंडित व्हायला मला किती तरी जन्म घ्यावे लागतील ! अरे यक्ष-गंधर्वा ! मला कडकडून भेट, म्हणजे तावडतोब मी विद्वान् होईन ! काय रे पांडुरंग ! माझीं राजकीय मतें तरी काय आहेतरे ?

पांडोबाः—सरकार, आपण मुळींच कानकोंडे होऊं नका ! हे जे छापखानेवाले वर्तमानपत्रें भरवीत आहेत, सभा भरविणारे सभा भरवीत आहे, लेक्चरें झोडणारे लेक्चरं झोडताहेत, हे जे फत्तर, कट्टर, मच्छिंदर, गोरख, जालंदर, देशभर गर्जना करीत आहेत, त्यांना काय मतें ठाऊक आहेत म्हणतां स्वतःचीं ? छट् ! नांव कशाला घेतां ! विद्युल्लतेचें स्फुरण देखील क्षणक्षर टिकेल, पण यांचें मत टिकायचें नाहीं. या प्रदेशांतल्या तेहतीस कोटी ढगांत, असे दहा पांचच करुणाघन महात्मे सांपडतील कीं,

जे केवळ ज्ञानानें, जीवकल्याणाच्या भावनेनें, ओथंबून जाऊन जीवांचा यातनारूपी भयंकर दाह शमविण्याकरितां, परोपकाराच्या पर्जन्या-नें कोसळून पडतील! पण सरदार, नवल पहा! गर्जना नाहीं! सिंह-नाद नाहीं! हें पहा, तुम्ही या अवडंबरांत मुळींच शिरूं नका, आपले चार संभावित लोक वागतात तसे वागा. उजव्याच कानावर पगडीच्या झिरमळ्या लोंबल्या पाहिजेत, असा कांहीं सिद्धांत नाहीं! अहो, डाव्या कानावर झिरमळी लोंबवली! कौन्सिलरचा एक हात सारखा पगडी-वर पाहिजे!

धोंडोपंतः—दुसरा हात मोकळाच ठेवायचा?

पांडोबाः—छट्, दुसरा हात आसन स्थिर करण्याकडे!

धेनुवल्लभः—पांड्या, तुला काय करूं? कुठें ठेवूं? असें झालें आहे! आज तूं अगदीं मात नव्हे हुचमल्ली केलीस! कायरे, मुख्य तर राहिलेंच! लोकांशीं आणि सरकारी अधिकाऱ्यांशीं साधारण वर्तन?

पांडोबाः—वर्तन? जवळ जवळ नर्तनासारखेंच! सरदार, शंभर वर्षें आपण परकीयांच्या सहवासांत, दिवसाचे रात्रीचे असून, अजून त्यांच्या स्वभावांतलें मर्म ओळखूं नये, ही दिलगिरीची गोष्ट आहे! त्या लोकांना स्पष्ट खरें स्वरूप आवडतें. अधिकाऱ्यांना आणि मतदारसंघांना, उभयतांना खूष ठेवण्याचें वर्तन, केवळ असिधाराव्रतच! थोडक्यांत सांगतों सरदार! आपण नेहमीं रात्रंदिवस सिंहाचें चामडें पांघरून मतदारसंघांत वावरलें पाहिजे! मेघनादासारखी गर्जना केली पाहिजे! आणि अधिकाऱ्यांचें बोलावणें येतांच, सिंहाचा पोषाख बंगल्याच्या फाटकाशीं ठेवून, मूळ स्वयंभू स्वरूपांत प्रगट झालें पाहिजे! साहेबबहादुरांनीं क्रुद्ध मुद्रा केल्यास, शंका दाखविल्यास, सी. आय. डी.च्या रिपोर्टानें कुलषित मन करून घेतलें असल्यास, स्वयंभू स्वरूपांत तावडतोब लोळण घेऊन, ईश्वरदत्त कंठमाधुर्याच्या देणगीनें, त्यांचा भ्रम घालवून आपल्या जातीबद्दल खात्री पटविली पाहिजे! इंग्रज खऱ्याचा भोक्ता आहे! इंग्रज खऱ्याचा वाली आहे!

धेनुवल्लभः—पांड्या, अरे, कोहिनुरा! मी तुला ठेवूं तरी कुठें? नाहीं! नाहीं! नाहीं मी बोलत आतां! जीवजीवेश्वरा! साहेबबहादुरा! बस्! बस्! काय, नर्तन, वर्तन आणि तुझें संकीर्तन आहे!!

पांडोबाः—सरदार! हें सगळें ज्ञान मला स्वप्नांत मिळालें बरें! स्वप्नांत दृष्टान्तच झाला म्हणानात! [कपिला प्रवेश करते.

कपिलाः—अगबाई! काय दृष्टान्त झाला तुम्हांला! सांगाच गडे एकदां आम्हांला!

धेनुवल्लभः—बरें का? ह्यानें आता नुसता गजब केला होता इथें! पांचशें प्रेसिडेंटांनीं लोळण घ्यावी याच्या चरणापाशीं!

धोंडोपंतः—हे पहा, गायतोंडे, प्रोफेसर ठोंबे, कोंडिबा, गट्टूलाल, आणि वराहशास्त्री आलेच!

धेनुवल्लभः—काय म्हणतां! या, या, या. (रायबहादुर धेनुवल्लभ की जय!) सर्व आपल्या कृपेचें फळ आहे! आज मी अगदीं धन्य आहें! आजच माझ्या घरचा दसरा आहे! पांडया, खरं कीं नाहीं?

पांडोबाः—संतजन आले घरा!

धेनुवल्लभः—तोचि दिवाळी दसरा! (सर्वजणः—काय ज्ञानी, विनयी, विनोदी, मार्मिक आहे. असें म्हणून स्तुति करितात.) नाहीं, तें सर्व माझ्या गुरुजींच्या शिक्षणाचें फळ आहे. बस्! बस्! पांडया म्हणजे किन्नर आहे! सांग, सांग! तुझा स्वप्नदृष्टान्त सांगच आम्हांला सगळ्यांना! पांडुरंगा सांगाच!

धोंडोपंतः—सरदार! यांच्या शीघ्रकवित्वाचा नाहीं वाटतें अनुभव आपल्याला!

धेनुवल्लभः—काय म्हणतां? तें कांहीं नाहीं! अगदीं स्वप्नदृष्टान्त काव्यमयच सांग तर!

गट्टुलालः—बोलो भाई, पांडोबा बोलो! अरे कुंडीबा! शुणो, पांडोबाका सपणा शुणो!

पांडोबाः—अहो मला अजीर्णामुळें, पित्तामुळें स्वप्नें पडतात झालें! काय पित्तानें पडलेल्या स्वप्नांचा दृष्टान्त ऐकतां? (सर्वजण आग्रह करितात.)

कपिलाः—तुमचीं स्वप्नें देखील अगदीं खऱ्यांच्या तोडीचीं असतात! तें कांहीं नाहीं, सांगाच एकवेळ!

पांडोबाः—बरें तर, ऐका. काल असा पडवींत निजलों होतों. पहाटेचा गार वारा लागला, आणि ढेकूणपिसांना न जुमानतां डोळा लागला.

तो जसा काय मी गांवाबाहेर रानांत चाललों आहें! तारकायुवतींशीं रतिसंगरांत पराभूत झालेला निस्तेज चंद्र विश्रांतीला जात असून, पूर्व-दिशा कुंकुम-गुलाल उधळीत आहे, सर्व वृक्षलता, दंवबिंदूंच्या मौक्तिकांनीं विभूषित झालेल्या आहेत, मंद वारा सुटलेला आहे, अशा वेळेला, दूर लांबीवर, चिंचेच्या झाडोंत एक जुनाट शंकराचें देवालय दृष्टीस पडलें. जवळपास चिटपांखरूं देखील नव्हतें. मी जवळ गेलों, थोडासा बसलों. तों इतक्यांत देवळाच्या पिछाडीच्या झाडींतून मंजुळ वीणारव ऐकूं येऊं लागला! तसा मी जरा गायनाचा लोभी असल्यामुळें तिकडे गेलों आणि पाहतों तों एका झाडाच्या खांदीवर एक प्राणी वीणारव करीत असून, सभोंवतालीं दुसरे प्राणी, नाचत, बागडत असून जलशाला रंग आला होता. सरदार, ते प्राणी हिंस्र पशु नसल्यामुळें, थोडी हिम्मत धरून जवळ गेलों आणि पाहतों तों---

पद

नवल गवसलें नयना हो विपिनीं कपी वाजवी वीणा ॥ध्रु०॥
घुःघुःकारें घुबड ताल धरि, ग्रामसिंह करि गाना ॥
अंबर कोंदे निनादिं, घालिती नवरस थैमाना ॥ १ ॥
साळू मैना हावभाव करी मंजुल चिवचिवतांना ॥
हंसी कोकिल मयूर पंक्ती केका आलापिताना ॥ २ ॥
हरिण, शहामृग, शशक, मतंगज दिसले मज झुलतांना ।
निवडक नंदी पुच्छ उभारुनि तुकविति आपुल्या माना ॥ ३ ॥
गर्दभ, खेचर, बोकड, महिषी काय पुरावी दैना ॥
कपिवदनावरी छटा विलोकुनी सकल घेति ताना ॥ ४ ॥

धोंडोपंतः—पांडोबा, काय तुमच्या स्पष्टोक्तीची तारीफ करावी! काय वीणा वाजविला तुम्हीं या वेळेला ! तुमच्या स्वप्नसृष्टींतील सर्व मंडळी अगदा दृश्य स्वरूपांत माझ्या दृष्टीसमोर खाडकन् उभी राहिली!

पांडोबाः—पित्तानें पडलेल्या स्वप्नाचा उगीच गौरव करतां झालें, तुम्ही सगळे!

कपिला:—मी खात्रीनें सांगतें, तुम्ही स्वप्नांतल्या गोष्टीनें देखील वेड लावाल बाई!

धेनुवल्लभ:—पांड्या, तुझ्यावरून कुरवंडून जाऊं कारे! हें पहा, तूं आतां अगदीं आमच्याशीं हा खोटा मानमरातब ठेवूं नकोस. आम्ही तुला आमच्यासारखाच योग्यतेचा समजतों! तूं आतां अगदीं आमच्यां-तला आहेस. ये इकडे ये, पांडुरंगा, असा गादीवर बैस!

गट्टुलाल:—अरे माई पांडोबा, अठीं आव! अठीं आव! बस! पांडू तो धण्य है! पांडू तो सुण्णा है! पांडू तो माणकमोती है!

पांडोबा:—छे! छे! सरदार! मी माझी किंमत ओळखून आहें! असा अपमान कसा करीन गादीचा!

कोंडिबा:—पांडोबा म्हनजी नुसता कुरूपचा वस्तरा हाय! अक्शी बिनपान्यानं शाप! अक्शी निर्मळ!

वराहशास्त्री:—पांडोबा म्हणजे, पुन्हा मंथन करून काढलेलें पंधरावें रत्न आहे! तुम्ही आतां आमच्यांत गादीवर बसून मिसळाच!

धेनुवल्लभ:—चंद्राजी अजून कां बरं आल्या नाहींत? गंगे, जरा जाऊन सांग बरं तिला निरोप.

धोंडोपंत:—जा सांग जा, म्हणावें, सगळेजण वाट पहात बसले आहेत. सरंजाम, हत्यारेंपात्यारें जरी नसलीं, तरी इथें सर्व सरंजाम आहे, हत्यारेंपात्यारें आहेत, अगदीं धांवत ये म्हणावें!

धेनुवल्लभ:—आज आपण सर्वजण जमल्यामुळे माझा हर्ष गगनांत मावेनासा झाला आहे. पांडोबा, धोंडोपंत, जा! जा! सर्व सामान घेऊन या! शेखहुसेन, तुझ्याकडे नुसतें सोडा व्हिस्कीचें काम अं! जा!

गंगू:—सरदार! चंद्रीच्याकडला अतांच साजिंदा बाहीर भेटला. चंद्री म्हनतीया रुस्तुमजी थापाडिया, लवेअली, मुडदेअली, अन् तो जगद्-गुरु वकील, हथं येऊनशान् सारा धिंगाना घातलाया, कुठं हालूं बी देत न्हाईत. गाऊनशान् नरडं अन् वाजवूनशान् डग्गा दोनीबी फुटलया! आतां येत नाहीं म्हनतीया.

धेनुवल्लभ:—ठीक आहे, मरूं दे त्या रांडेला घरींच! तूं जा शेख-हुसेनच्या हाताखालीं.

[शेख सोडा व्हिस्कीचे ग्लासेस ठेवतो इतक्यांत डॉक्टर बडबडत येतात.]

डॉक्टरः—पाजी! हरामखोर! ये म्हणावें, मी ऑरग्युमेंटनें सिद्ध करून दाखवतों (सर्वजण समजावितात) म्हणे दगडूशेट मेला. मरेल कसा? ये म्हणावें, मी ऑरग्युमेंटनें सिद्ध करून दाखवितों! मरणें शक्यच नाहीं! म्हणे त्याला ब्युबोनिक प्लेग झाला, होईल कसा? ठेच लागून बिबो येतो! खाकमांजरींत बिबो येतो! गनोरियांत बिबो येतो! खरचटल्यानं बिबो येतो! गळवें हीं बिबोच आहेत! मरेल कसा! ये म्हणावें, मी सिद्ध करून देतों!

वराहशास्त्रीः—डॉक्टर जाऊं द्या! अहो! पण तो धडधडीत मेला, आतां काय कपाळ करतां सिद्ध! हें पहा, मी तुम्हांला विचारतों—

डॉक्टरः—काय, काय विचारतां? गो ऑन. कोणता विषय?

चीफ ऑफिसरः—जाऊंद्या डॉक्टर, हें पहा मी सांगतों तें ऐका. तुमच्या अकलेची का आम्हांला शंका आहे! मरूंदे मेला तर दगडूशेट, तुम्हीं त्यांची गोष्ट नाहीं ऐकली—

डॉक्टरः—काय, काय, सांगतां? असे इकडे या. या कानांत सांगा! केवळ मेडिकल विषयाकरितां, आणि कोकिलेकरितां, हा कान राखून ठेवला आहे.

चीफ ऑफिसरः—याला म्हणावें प्रेम! हें पहा डॉक्टर, तुम्ही म्हणालां तेंच खरें. दगडूशेट मेला नाहीं! मुनसिपालिटींतला चाळीस हजारांचा खोटा चेक उपटून पैसे लांबविल्याचें उघडकीस आल्यामुळें त्यानें जीव दिला, मेला नाहीं!

कपिलाः—हें पहा बाई, बसायचं सगळ्यांनीं इकडे असं, आणि हा समारंभ साजरा करायचा!

वराहशास्त्रीः—हें पहा, आतां अपील नाहीं.

[सर्वजण बसतात, शेख, गंपू, सोडा-दारू पाजतात, सर्व पितात.]

कोंडिबाः—कशाला त्योकानं जीव दिला पैशापाई! दावा मला, अशी कोणती मुनसिपालिटी हाय, कीं जिथं मेंबरलोक पैका दावत न्हाइती?

गट्टुलालः—हं! हं! येतो चळणेवाळा. उशमे क्या बडी बात है.

इलेक्शणका पैसा नही तो कैसा लाणा ! साला इलेक्शणकेबदले आज महिणाभर लोगोकूं शिरापुरी खिला रहाहूं !

डॉक्टरः—चालायचेंच ! चालायचेंच ! गांवोगांवीं महारवाडा आहेच. करें काय रायबहादुर ! तुम्हीं तर अगदीं चीत मारलेंत बुवा ! काय कोंडिबा, तुम्हींतर मत कॅन्व्हॅास करायचा धुमधडाका लावला आहे !

कोंडिबाः—काई इचारूं नका ! सुरवातीला पांच हजार ठार झालेत ! घेऊंया पुढं मागं काढून ! सोडतों थोडंच ! कां हंसतां सास्त्रीबुवा ! बगा आवंदा आमी बामनास चीत मारतोया बगा !

कपिलाः—हें पहा बाई, असं हमरीतुमरीवर येऊन जातिद्वेष वाढवून घ्यायचं कांहीं कारण नाहीं. सगळ्या बाळगोपाळांनीं मिळून गुण्यां-गोविंदानं हा मुनसिपालिटीचा संसार चालवावा झालं ! (सर्वजण 'बस् अपील नाहीं' म्हणतात.)

वराहशास्त्रीः—आतां अपील नाहीं ! उचला सगळ्यांनीं ! हं ! डॉक्टर, कोंडिबा, अहो ठोंबे, लागा एकदम संसाराला ! (दारू पितात.)

धेनुवल्लभः—हें पहा, उद्यां सुरू होणाऱ्या इलेक्शनची मुळीं इथें बाटाघाट नको ! घ्या ! घ्या ! गंगीच्या आग्रहाकरितां. घाल, घाल, आणखी थोडी गंगे घाल !

शेखहुसेनः—पिलाव ! खूब पिलाव ! आपने बापका क्या जाता है ? होनेदे देर ! होजानेदे ! (दर ग्लास भरून देतांना थोडी पितो आणि तिला पाजतो.)

गंगूः—अन् घ्या कीं थोडी शेटसाब !

गट्टुलालः—ऑं. ऑं. ऑं. गंगू नहीं होणा, नहीं होणा, बश्, बश् !

गंगूः—अन् कोंडिबा तुम्हासनी काय रोग झालाया ! मला ठाव हाय, घरीं घेन्यापक्षीं, असं फुकटांतच दाबून घ्यावं ! हतं नाहीं थट्टा करायची ! नाहींतर त्या दिसावानी कराल !

चीफ ऑफिसरः—गंगे घाल, घाल, काय ऐकतेस त्या कोंड्याचें. हात धरून घाल, तुमचें, सरदार दाबून चालू द्या काम ! आज चंद्रीच्या ऐवजीं, गंगे, तूंच एक ठणकाव ! एक चांगलेसं गाणे होऊं दे. (सर्व-

जण आग्रह करतात.) तें कांहीं नाहीं, सकाळीं गुणगुणतांना तुला स्वतः ऐकलें आहे !

गंगूः—सरकार, मी नव्ह-ती अंबी ! [अंबू प्रवेश करते.

प्रो० ठोंबेः—नेव्हर माइंड ! एनी पोर्ट इन दी स्टार्म ! चल, अंबे ! होऊन दे तुझ्या अंबराईतलें एक कोकिळेसारखें गोड गाणें !

शेखहुसेनः—क्या देखती है ! होनेदे दौलतजादा ! अरे, वो पांडोबासे तूं लिखवा लाई है वोहि दबादे ! क्यों डरती है. देख अंबू ! हमकू एक गधा चालीस तोले सोना देगया, ह्या तों इतने गधे है कीं एकदम् तेरे नसीबका चक्कर फिरजायगा ! [सर्व आग्रह करतात.

अंबूः—पांडोबानं उद्यांच्या मुनसिपालिटीच्या इलक्शनवर लावनी केलीया ! पन् बाई, हथं म्हनूनशान् कोनाला येडंवाकडं लागलं तर, गरिबाच्या पोटावर पाय यायचा पगा !

कपिलाः—अगबाई, पांडोबांनीं का लिहून दिली ? मग ऐकायचीच गडे.

कोंडिबाः—असूं दे ग एडंवांकडं, हथं कोणासनी लागतया न् हाय कुनाला सुद आतां ! अंबे ! म्हन विगी, बिगी, हं ! कसंकसं ?

धोंडोपंतः—आहे कोणता लेकाचा शुद्धीवर इथें !

धेनुवल्लभः—तें कांहीं नाहीं, एकदम सुरू कर. अगदीं ॲक्टिंगसहित उडाला पाहिजे बार !

गद्दुलालः—अंबू इशी, इशी, हात, पाय हिल्वाकर ! अरे हो जाणे दे !

अंबूः—आतां म्हनतांच तर गरिबाचा नाविलाज हाय !

[सगळे सरसावून बसतात.

पद

व्होटासाठीं, झाली गांवामधें दाटी ।। झिंमड मोठी हो
पोटासाठीं झाली ।।ध्रु०।। काय सांगूं करती लटपटी ।।
मिळविती व्होट खोटींनाटीं ।। हेलपाटे घालुनि लाळ
घोटी ।। तिन वर्सांची ही तुपरोटी, बांधिती गांठी ।।१।।

अन्नावारीं किती मॅजिस्ट्रेटी रावबहादुरांची धेंडं मोठीं ॥
पेस्तमजी, रुस्तुमजी जमशेटी ॥ शिंपी, सोनार, साळी,
कोष्टी ॥ धावधावुनि कुत्रीं भांडती, हो हडकासाठीं ॥२॥
इंदु, सिंधु, चिंगू मास्तरणी ॥ रंगू, चंद्रा, अंबिका सुईणी ॥
नाकीं घालुनी चमकी मोरणी ॥ थोडं हांसुनि मुरका
हानी ॥ नेसल्या पातळ जरीकाठी, मतासाठीं ॥ ३ ॥
टांगेवाल्यांची आली वरणी ॥ मोटारींची करिती मन-
धरणी ॥ अठरापगड जाती जमुनी ॥ एकमेकांशीं
शिव्यागाळी करुनी ॥ झाली भंगीचांभार सगळ्यांची
हो लट्टालट्टी ॥ ४ ॥

शेखहुसेनः—अरे अंबू ! तूं तो गजब करदी, मारडाली ! यार मारडाली !

अंबूः—माझं गरिबाचं येडंवांकड लागलं असलं, तर पोटांत घाला !

कोंडिबाः—तूं कशापाई भितेस ! मी घालतो पोटांत ! मी घालतों पोटांत ! गट्टुलाल तूं पण घाल पोटांत ! शास्त्रीबुवा, तुम्हीबी घाला पोटांत !

शेखहुसेनः—दबाव ! और दबाव ! दो बाटल !

चीफ ऑफिसरः—घाल, घाल, अं गंगे, अंबे, आणखी एक म्हण सावकाराची !

गंगूः—अरे हुसन्या, दारू संपली कीं समदी ! आतां काय घालूं ?

शेखहुसेनः—क्या, घालुं घालुं करती है ! अंदर घासलेटका डबा भरा हुवा है ! दो बॉटल घासलेटही पिलादे इनको ! इस वखत सब चलताहै ! चलादे ! दबा देव !

चीफ ऑफिसरः—घाल, त्या मारवाड्याच्या शेंडींत घाल ! म्हण, ती गहूंहरबऱ्याची लावणी म्हण, [सर्वजण राकेल पिऊन आग्रह चालवतात.

शेखहुसेनः—दबादे, डरना नहीं ! गजबके हैवान है !

अंबूः—आतां काय म्हणूं तरी !

कोंडिबाः—शास्त्रीबुवा ! माझं समदं हायनाहो जाग्यावर ? तुमचं

हायना! का नाय? अंबे! आज तुझा चेहरा बघून लई चढलीया बघ दारू? म्हन, गहूंहरवऱ्याची म्हन! [सर्वजण 'राधागवळण गहूंहरबरा, राधागवळण गहूंहरबरा' म्हणतात.]

धोंडोपंतः—पांडोबा! आतां उचला यांना, हे आले आहेत एकेक ठराव बाहेर काढण्याच्या रंगांत!

प्रवेश चवथा

[स्थळः-इलेक्शनच्या मंडपाचा रस्ता.]

कोकिलाः—बरं म्हणावं बैला! माझं प्रेम असं लाथाडलंस का? तुझ्या नाकांत वेसण घालून जर न बिनभाड्याच्या घरांत पोंचवीन तर नांवाची ही कोकिलाच नव्हे. काल मेल्यानं मला घरीं बोलावलं होतं पदवीदानाच्या उत्सवाला! येतें बरं त्या टवळीचा—कपिलेचा—डामडौल आणि शृंगार पाहायला! आतांशें मेली चार यत्ता शिकलेली ती नटवी, काय तोरा करती आहे! नटती आहे! मुरडती आहे! तिला ह्या बैलोबा-मुळं अगदीं आकाश ठेंगणं झाल्यासारखं वाटत आहे! बरं म्हणावं! मला दुखवली आहेस, लक्षांत ठेव! अंबे, अंबे! राहूं दे तें झाडणं-झुडणं! ये इकडे अशी, काय ग, मग ते तयार आहेत ना?

अंबूः—अक्षी तुम्हापाई जीव द्याया तयार हायती. आन् असं कसं म्हणता? पन आमची आपली अडानी जात, ह्ये म्हनत्यात, पांच विसा रुपये अगुदर हातांत पाहिजेत, आन काम झाल्यावर पन्नास पन्नास! मंग काम माझ्याकडे लागलं. अक्षी जिवासनी जीव देत्याल!

कोकिलाः—हे घे! ज्यांचे त्यांना देऊन तिकडे घेऊन ये म्हणजे मी सांगेन समजावून. जा पळ लवकर, हें घे तुला बक्षीस. (ती जाते.) ही टवळी कपिला आमच्या मुनसिपालिटींत शिरल्यापासून, माझं कसं तें वजन राहिलं नाहीं! नाहींतर माझ्याकडे म्हणजे कधीं मेंबर चहाला, मन-धरणी करायला नाहीं, असा एक दिवस गेला नाहीं; कोणच्या ना कोणच्या निमित्तांनीं शेंपन्नास रुपये घरीं आले नाहींत, असं झालं नाहीं. आतां कशाला माझी मेल्यांना गरज उरली आहे? ती आहे ना सटवी!

बरं! जर ना सगळ्यांचे दांत घशांत घालीन, तर नांवाची ही सुईणच नव्हे! जाईना ही अंबी बळी गेली तर ह्या कामाकरितां! चला, आधीं जाऊन व्यवस्था केली पाहिजे. [शेख व गंगू प्रवेश करतात.

शेखहुसेनः—

गझल

सुनो मेरे भाई! कमेटीका गाना। हरामीसे मोफतका खाना पिना ॥ ध्रु०॥ कंदिल लगाना। सफाई करवाना॥ पानी छिनकाना। झाडू दिलांना मेंबरोका दिलखुश बयान!॥ १॥ मालोंके खरेदिमे ये कमिशन उडाते हैं। नाना, चचा या सुसरेकु कंत्राट देते है॥ स्टोअरका माल कंडम करके लीलांम-करते है। सालेके हात खरीद लेके बंगला उठाते है॥ २॥ बाजारके आम तरकारी ये खूब चरते हैं। लैसनके जोरसे दूध-मलाई हजम करते है॥ होटेलवाले पानवाले गुलाम होते है। पेटकेलिये कदमो पर सिर झुकाते है॥३॥ लाईन लगाके घरकु ये बरबाद करते है। टाऊन प्लानिंगमे गांवका कबरस्तान करते है॥ महेसूल खाके लोगोंका पेट फुलते है। माले मुफ्त दिल-बेरहम इनके होते है॥ ४॥ आंखें मिलाके कंचनिसे पान खाते है। गांवके बगीचेके फूल गले चढाते है॥ मोफत मिला तो जम जमके रंग उडाते है। पहिचानका कोई टपक पडा तो संदू-कमे छुपते है॥५॥ गोरगरीब देखके उसे डराते है। जोरावर कोई नजर पडा तो दुमदबाते है॥ साहेब नाम सुनते ही होश उडते है। दे भाग घरकु पैजामा धोती बदलते है॥ ६॥

कोन गंगूजान! अरे वारे बुलबुल! क्यौं आज तेरे चेहेरेकां चांद घुंगटके बादलसे क्यौं छुपा रही है! क्यारी? तबियत बेमार है? फिर इतना कायकू, पीतीथी कल दबाके! आव, मै तेरा हातपांव दबा देता हूं! क्या

साली कल तेरे अंबीने मजा उडाई! बस् बस् बस् गजब करदी! इ गांवमे कंचनी तंबोरेलंबोरे, सारंगीसुरंगी, खींच खिंजवाकर बाग्ड बिल्ले तर्‍हे उचकउचक कर चिल्लाती है, लेकिन मैं कसम खा कर कहता ह के एक मेरी मुनसिपालिटीकी गरीब झाडूवाली ये सब रंडीयांपर झा फेर देइंगी!

गंगूः––आन् लई चतुराई गातुसया! आन् समदा कालचा पैका, आन

शेखहुसेनः––अरे प्यारी लीलमपरी, ये सालीम के सालीम शेख ते है! पैसेकू क्या करती है!

गंगूः––तुझी कायी भाजी करूं व्हय?

शेखहुसेनः––बुलबुल तेरेपर ये बंदे गुलामकी जान कुरबान है! भा करले, बिरयानी करले, खीमा करले! जो दिल चाहे सो करले! च प्यारी! अभी सब लोगां इधरसेही मंडपमे जायेगे! चल! अभी शुरु जायेंगे! चल आगे, बंदोबस्तके लिये मेरेकू जाने दे.

गंगूः––व्हय्! व्हय्! तूं हो म्होरं! ह्यो बघ गट्टुलाल मारवाड्या चरात हकडच येतीया! [जाता

[आंत 'गट्टुलालकी जय!' असा ओरडा होतो. चंद्रा नायकीण, तबलज सारंगीवाले, ठुमरी गाऊन चंद्राजी नाचत येते. पायघड्यांवरून लग्नाला सजलेला गट्टुलाल मळवट भरलेला मिरवतो. यांचे मागें मारवाडणी गात जातात.

पद

चंद्राः––

मेरे गट्टुलालकु तुम व्होट देनाजी व्होट देनाजी, मत
देनाजी ॥ ध्रु०॥ गलेमें मोती, कानोंमे कुंडल, बालोंमे
लालडी, गुंदलायेजी ॥ १ ॥ मुंडी मरोडकर बंगला
बंधवाकर, हरामीसे पेटकू बढायेजी ॥ २ ॥ मारवाडसे
चिठ्ठी आयी बिटवा भयो है ॥ गट्टुलालजी ब्राह्मन
जिमायेजी ॥ ३ ॥



गद्दुलालः—मेरे प्राण चंद्राजी ! ये सब मूणपीबाटली तुमपर कुरबाण है ! [पृष्ठ १०८.

गट्टुलाल:—जीतें रहो! जीतें रहो! मेरे प्राण चंद्राजी! ये षब मुणषीबाटलीं तुमपर कुरवान है! अरे भाई, खटमलजी, कांई बोल्या! अरे प्राण चंद्राजी!

दोहा

कमळ बदणका भंबर बणाहूं। थारे मिरगा नयणी।
चूषण दे रष गट्टुलालको, चंद्रावदन कंचीणी॥ ध्रु०॥
तूं चंपा जूं खील रही है, जिवडो गयो लुभाय।
काई बोल्या! रूपशोभा मुखसे कही न जाय॥ १॥
रूप बागमां, थारि लगी हय निंबू आंब अनार।
जुई मोगरा, गुलाब चमेली, फूली अपरंपार॥ २॥
मणमां लागे तुझें बणादूं सुंदर शेटाणी।
कूण बातकी कमती घरमां हूं राजा तूं राणी॥ ३॥
खड्डीमांतो माटि मिलावूं, घासलेटमां पाणी।
चूणामां तो राख ढकेलूं करदूं आबादाणी॥ ४॥
घीडब्बोंमां चरबि घुसेडूं गहुं आटांमां भूंस।
मूंषिबाटलिके घरमां लागी मारवाडकी घूस॥ ५॥
प्रेसिडंटकूं बगल दबादूं चीप् अफशरकू लाथ।
रंग देखकर ढंग बदलदूं हुशिआरी के साथ॥ ६॥

घणी खम्मा! घणी खम्मा! चंद्राजी! अरे भाई, खटमलजी! ओ गुडमलजी! ये तबलेवाला, ओर सारंगीवाला भी खूप करामत कियो है! ओ बाळाजी! ओ ठाकुरजी! आज म्हारे इरेक्षण में जय देणा!

तबलेवाला:—शेठसाहेब! आपकेबिगर बंदेकी करामत जाननेवाला भी कोन है! आज आपके इरपशनके वास्ते तबलेमे बोल भी बिटा दिया हूं! देखिये जनाब! 'तुम्, शेट, जी, कूं, मत, देना. तुम शेट देना, तुम मत देना, शेटजीकुं देना. शिरापुरी खां, शिरापुरी खां, शिरापुरी खां!

गद्दुलालः—बष, बष, बष, भाई! तबलजी तुम तो कमाल कियो है! चालो, लोगण चालो, जलदी जलदी चालो! महिणा भरकी शिरापुरी खांके भग जावेंगे, इषीवास्ते दुपट्टेसे गांठ मारकर लाया हूं! चालो भाई! एषा न होवे के मारो इरक्षण अठी के अठी ठंडा होवे! चालो, आज मिहिणाभरकी शिरापुरी ख्याल रखणा.

खटमलजीः—लालाजी, बेगुमाण रहणा. बोलो भाई, 'रामनाम मिथ्या है, शिरापुरी सत्य है.'

[त्यांच्या मागून मारवाडणी गाणें म्हणत जातात.

मारवाडणीः—म्हारा राणाजी, चाल्यो है गामविलक्षणकू ॥
नवलभयो है लुगाइ लोगणकू ॥ [जातात.

वराहशास्त्रीः—(प्रवेश करून) आहे काय जुलूम? लोक आपले माझ्या नांवानें बाजा करताहेत! आणि मीही माझ्याकडून लोकांची मर्जी संपादन करण्याकरितां प्राण सोडतों आहें. सत्याग्रह करा! खारका खाऊन सत्याग्रह करतों आहें! असहकारिता पुकारा! घरांत कर्डी लावून प्राण सोडतों आहें! खादी वापरा! नखशिखांत पासोड्यामारुती बनलों आहें! फंड काढा! गुंडांत फंड सांठवतों आहें! प्रतियोगी सहकारिता पुकारा! पायां पडतों, शिव्या देतों! पायां पडतों, शिव्या देतों! कौन्सिलांत शिरा! कौन्सिलांत शिरतों आहें! रात्रंदिवस, 'घटं भिन्द्यात् पटं छिन्द्यांत् कुर्यात् रासभस्वरं' तरी देखील हे बेइमान लोक मला प्रसिद्ध पुरुष समजून आपलीं मतें देत नाहींत. काय तर म्हणे माझ्या भाचाला मुनसिपल शाळेंत सुपरिंटेंडेंट नेमला! माझें एवढेंसें कुसळ देखील खुपूं लागतें, आणि दुसऱ्याचें तेवढें चालतें! तो चिचुंद्राकर! त्याच्या घराच्या मागच्या लोकांचीं घरें शाळेकरितां मुनसिपालिटीकडून घेऊन आतां जागा घाण ठरवून खासगी बागेकरितां आपण स्वतः थोड्या भाड्यानें उपटतो! तो मोतीवाला! घरासमोरचें फायर एंजिन काढून, आपला तबेला करतो आहे! तो नकटा! अकौंटटला तंबी देऊन अधिकारांत फुकटचे पैसे वापरतो आहे! तो दाढीवाला! जटावाला! घरापुढची मोकळी मुनसिपालिटीची जागा फुकटांत वापरावी

म्हणून मारुति बसवतो आहे! आणि गंमत पहा! मुनसिपालिटीनें आणि लोकांनीं बोलूं नये म्हणून त्याला लोकमान्य मारुती म्हणतो आहे! हें सगळें पचतें आहे, आणि माझ्या भाचाचें तेवढें पोटांत दवळत आहे! जाऊं द्या झालें! (धोंडोपंत प्रवेश करतो.) बरें झालें! काय धोंडोपंत, मग ती मालकीण होते आहे का कबूल? कां मारती आहे नुसती थापा?

धोंडोपंतः—तुम्ही तिच्यावर विश्वास टाकूं नका! तिच्याबद्दल गांवांत फार ओरडा आहे. प्रत्येकजण मला असेंच म्हणतो आहे, कीं ती मलाच देणार म्हणून! आतां, बॅलटिंगनें व्होटिंग आहे, ती हळूच जाऊन कुणाला देऊन येईल मत, काय सांगावें!

वराहशास्त्रीः—बरें, मरूं दे तिला! तुमचं कसें काय? तुम्हीही गुंगाराच देणार?

धोंडोपंतः—मी माझीं मतें द्यायला केव्हांही कबूल आहें, पण डॉक्टर सारखा मागें लागला आहे, त्याला काय करूं?

वराहशास्त्रीः—मरा तुम्ही सगळे! जें काय होईल तें होईल! चला तर! चला इथून तोंड काळें करा!

धोंडोपंतः—अहो, पण माझ्या गरिबावर कां रागावतां—माझ्या गरिबावर कां रागावतां? (जातात. बक्करखां प्रवेश करतो. व त्याचे समोरून खंडूं धोबी जातो.)

बक्करखांः—कौन साला हमारे बिगर दुसरेकू ऊंठ देता है, सो देखता हू! ये करेलेके एक समाठेसे खोपडी और भेजा अलग कर देऊंगा! ए साले धोबी, किधर चला है! इधर आ! तेरी ऐसीतैसी! इधर आ! क्यारे, तू व्होट किसकू देयगा?

खंडू धोबीः—किसकू देएंगा म्हंजी? मीच उभा हाय ना इलक्शणला! मीच उमेदवार उभा हाय!

बक्करखांः—(वेडावून) मीच उभा है! हम क्या साले बैठे है! हरामजादे! मुनसिपालटीमे धोबीका क्या काम है?

खंडू धोबीः—(स्वगत) मंग त्येका, पयलवानाचं तरी काय काम हये? पन इचारावं कसं? कारल्यानं कंबरडं शाफ करायचा!

बक्करखां:—साले अंट् संट् क्या बात कर रहा है? क्या रे धोबी, मुनसिपालटीके मेंबरलोगोंने क्या जमालगोटेका जुल्लाब लिया है? जो तू उनके कपडे धोनेके वास्ते भाग रहा है!

खंडू धोबी:—(स्वगत) अर इच्या! मंग तूं तरी ल्येका, त्यांचं काय आंग ठनकतया म्हून रगडाया निगालाच व्हय? पन इचारावं कसं? हातांत याच्या येताळ हायंना!

बक्करखां:—बकवा बंद कर! बेइमान साला! क्यारे लौंडे! तेरे पीछे कुई चमार भी आ रहे है?

खंडू धोबी:—चमार? त्ये तर आतां तुमच्या म्होरंच गेल! त्ये बी समदे उभे हायेत माज्या संगच!

बक्करखां:—(वेडावून) उभ्मे है, उभ्मे है! बेशरम साला! तुम सब उभ्मे है तो यार क्या बैठे है? ठहरो! अब तुम सब लोगोंकू बिठाकर और सुलाकर यारही अकेले खडे रहनेवाले! ला इधर सब कपडे!

[बोचके हिसकतो.

खंडू धोबी:—अरे, अरे! लोकांचे हैत, लोकांचे हैत!—

बक्करखां:—लोकांचे हैत तो लोगोंकूही बांठ देतां हूं! बंदरके माफक तो सुरत है और कहता है के उमेदवार हूं! तूं उमेदवार है तो यार क्या बुड्ढे है! बेशरम साला! मेरेकू कहता है, उभ्मा है! अच्छा तो, भाग साले घरकू, सो जा! याद रखना बेटा, फिरके उभ्मा रहा, तो ये करेले शरीफके एक सपाटेसे सुलाई देऊंगा. फिर उठनेका टंटाही मिट जायगा. चलो. यारके आखाडेके सब पेहेलवान् लोगोंकू और चेलोंकू बाट देएंगे!

[शिंदेशाई पगडी घातलेला, सजलेला कोंडिबा न्हावी मुंडावळीसकट प्रवेश करतो.]

सर्व न्हावी:—स्थानिक राज्याचा मेळा। व्होट करूं या गोळा॥
स्थानिक सोन्याचा गोळा। गट्ट करूं या सगळा॥

[नंतर दंगल करतात. 'व्होट द्या, मत द्या' म्हणून एकमेकांच्या खांद्यावर उड्या मारतात.]



कांडेबाः—शिकशान् ! शिगशान् ! म्हनुन् मांगत्याल भीक प्रोफेश्वर !

[पृष्ठ १०९.

कोंडिबा:—चलार गड्यांनो बिगिबिगि! लिवनंपुसनं शिकुनशान हे दुसर लोक आमासनी लई आडावत्यात. औंदा हा कोंडिबा समद्या-सनी चीत मारतुया बगा. लई पारशास्नी, बामनास्नी, समद्यास्नी, ग्यानाची घमेंड हाय! कायहो जोतिबा, मुनसिपालिटींत व्होवं कशाला लिवनत् पुसनं?

जोतिबा:—रस्ता झाडायान् केर टाकाया व्होवं कशाला ग्यान?

कोंडिबा:—हां हिंग अरसं! खरंच बगा जोतिबा!

पद

न्हावी तेली परीट चांभार सुतार सोनार। रावभादर शेट सावकार। महार मराठ भंगी नोडग समद शुकनार। औंदा निवडुन मेंबर होनार ॥ध्रु०॥ काय विशाद है संग कामाची। खिनांत करनार। खेड्याचं दिल्ली शहर ॥ धंदेवाले अम्ही मर्द गडि नाहीं जाणार। कुणाच्या काकाला हार ॥ १ ॥ नगर-कामिन्या डागडागिन्यानं सजविल सोनार। धुत्याल कपड परीट, बांधिल सुतार घरंदारं ॥ २ ॥ घाना लाविल तेली, शिवत्याल जोड चांभार। शिकशान् शिकशान् म्हणुन् मागत्याल भीक प्रोफेश्वर!॥ गड्यार फिरुन घरोघर ॥ ३ ॥

समद्या बामनांचा म्हणजे खुळचटांचा वाजार हाय झालं! चलार, बिगि-बिगि, ए गेन्या, ए सांवळ्या, ए म्हाद्या, चलार समद! योक महिना हजामत फुकाट! मलाच भरार मतं तुमचीं! काल रातभर भाड्यान घेतलेल्या घरामंदी सवाशें मानुस बेवडा पाजुनशान् कोंडुन घातलंया! त्याची निशा उतरायच्या आंतमंदी, त्येसनी मोटारींत घालून, तथ नेऊन व्होटाचा कागद पेटीमंदी कोंबून घेतला पाहिजे बगा! चलार, महिनाभर हजामत फुकाट! [तेंच गाणें म्हणत जातात.

[मुलांचा मेळा. पांडोबा, प्रो० ठोंबे, डॉक्टर, कोकिला वगैरे प्रवेश करतात.]

पद

चला रे मत द्याया जाऊं। जबरिनें मत द्याया जाऊं ॥
मेंढीमागें मेंढि पळतसे तसे अम्ही धावूं ॥ १ ॥
विद्यागुण न मुळीं पाहूं ॥ न्हावी तेली परिट भंगि जरि
मत त्यासी देऊं ॥२॥ केवळ अम्हि भोजनभाऊ ॥ नवरा-
नवरी मरो, जळो घर, पिंड अम्ही खाऊं ॥ ३ ॥

बोला! ~~हिंदुमुसलमानकी जय~~! ~~परिटचांभारकी जय~~! ~~महारमांगकी जय~~! ~~ब्राह्मणयुरोपियनकी जय! वसुधैवकुटुंबकी जय~~!

डॉक्टरः--(आग्रहानें सर्वांस पुढें घालून) आमच्या इलेक्शनकरितां तुम्हांला त्रास पडतो आहे.

कोकिलाः--ओ, नेव्हर माइंड! एकमेकांच्याकरितां जर त्रास घेतला नाहीं तर जगाचा गाडा कसा चालू रहाणार! (स्वगत) बरं, पाहतें अं, कपिले, आतां तुझ्या गमजा! सोयीनें घेतली तर गाईसारखी सुईण; पण दुखवली म्हणजे वाघीण होते, हें ठाऊक नाहीं तुला!

[जाते; धोंडोपंत येतात.

डॉक्टरः--चला! नाहींतर मतदार जातील निघून सगळे!

प्रो० ठोंबेः--त्याची कांहीं काळजी नको. सगळ्या मतदारांना असा तोबरा दिला आहे, कीं त्यांचे पायच हलणार नाहींत जाग्यावरून!

[डॉक्टर व ठोंबे जातात.

धोंडोपंतः--अहो, इथें काय करतां? तिकडे मांडवामध्यें नुसता तुमच्या नांवानें शंख सुरू आहे! चला, चला! त्या चीफ ऑफिसरचा घसा कोरडा झाला! तुम्ही इथें काय करतां?

पांडोबाः--धोंडोपंत, गंमत पहातों आहें! आतां अगदीं रंग भरला आहे! आतां ह्या तुमच्यापुढेंच, लग्नमुंजीच्या अक्षती-वराती पाहून नुसात

थक झालों बोवा! धोंडोपंत, आज तुमचे डॉक्टर आणि कोकिला तर अगदीं रंगांत दिसले!

धोंडोपंतः—आमचा डॉक्टर म्हणजे काय विचारतां, गोलंदाज डाक्टर! गोळीबार चुकायचा नाहीं! त्याची गोळी खाणें आणि बंदुकीची गोळी एकच! अगदीं रामबाण! डॉक्टर-कोकिलेची ही गोलंदाज तिरंदाजांची दुक्कल एकाद्याच्या घरांत शिरली म्हणजे रोगी तर लंबे होतोच, पण आसपासचे शेजारी, नातलग, वगैरेसुद्धां तिरंदाज जखमी करून येतो!

पांडोबाः—या इन्फ्ल्युएंझापासून पिकली खरेंच लेकांची पोळी! ज्या धोंडयाला हुंगून कुत्रें देखील समाचार घ्यायचें नाहीं, अशा सगळ्या धोंडयांना आतां शेंदूर लावला गेला खराच!

धोंडोपंतः—तुम्ही आतां पर्यायानें आमचीच शोभा आरंभिलीत! चला! मी जातों पुढें. या कुठें आहेत त्या किल्ल्या! चला बरेंका. मागोमाग! [जाते

पांडोबाः—चला, आलोंच. मरा सगळे त्या मांडवांत! आग का लागेना त्या मांडवाला! काय काळ आला आहे बोवा! नुसता काळ नाहीं, अगदीं विक्राळ काळ आला आहे!

पद

आला रे काळ देवा जगीं उफराटा ॥ ध्रु० ॥ व्होटा देउनि
लोक निवडती शिफारशी तट्टा। मिडेभिडेनें अम्ही
लावितों हिंददेशिं बट्टा ॥ १ ॥ ओ-ची ज्याला ठोहि
कळेना पंडित तो मोठा। ऐसे ठोंबे मिळुनि फिरविती
ग्रामीं वरवंटा ॥ २ ॥ करवसुली करि कोल्हा, शिक्षण
अजापुत्र-हाता। कोठीवर नेमिला लांडगा। आरोग्या
उंटा ॥ ३ ॥ एकंदरिनें सुतारकामा लावियले परिटा ॥
अखिल निरीक्षण करित धूर्त तो जादुगार मोठा ॥ ४ ॥

नुसते आगगाडी-तारायंत्रानेंच आम्ही दुधखुळे आज दोन पिढ्या अचंब्यानें चारीमुंडी चीत होतों; आणि आतां तर पाश्चात्य सुधारणेच्या गाड्या! विमानें, झेपोलिनें, मशीनगन्स, ट्रॅंक, वायरलेस तारायंत्र काढून आमची सात पिढ्यांची मिचिती केलीस! या अचंब्यांतून आम्ही बावळे कसलें डोकें वर काढणार आणि स्वराज्य मिळविणार?–आणि हवें आहे तरी कोणाला इथें? दहा हजार कोसांवरून मोहमास्त्र टाकणाऱ्या मांत्रिका! चातुर्यानें आणि भाषालालित्यानें शब्दांच्या मालमसाल्यांची मयसभा निर्माण करणाऱ्या मयासुरा! एकांत एक मिसळून तीन सिद्ध करून दाखविणाऱ्या गणितशास्त्रविशारदा! होय-नाहीं, खरें-खोटें, सत्य-मिथ्या, भूत-भविष्य यांचे विरोधी अर्थ दोन्हीही एकाच शब्दांतून निर्माण करून प्रत्यक्ष घडघडीत अनुभव घडवून देणाऱ्या विद्वान् चतुर पंडिता! तुझ्या बलसामर्थ्यापुढें हा दुबळा हिंद तुला शरण आहे! तुझ्या शक्तीला आम्हां हिंदवासीयांच्या अकलेची शरणचिठ्ठी आहे! चला! आज आमच्या कपिलाबाई कोणच्या कामांत गर्क झाल्या आहेत? बहुतेक आमच्या पत्रांतील मजकूर वाचून भडका उडाला असेल! ह्या पहा! आठवण काढतांच हजर! [कपिला येते.

कपिला:—(रागानें) चांगला–चांगला ऐन वेळेस गळा कापलात हो! तुम्ही इतके काळसर्पासारखे विषारी असाल, अशी माझी मुळींच कल्पना नव्हती!

पांडोबा:—हें पहा! मला क्षमा करा! मी काळसर्प मुळींच नाहीं. आतांपर्यंत मीं जें कांहीं वर्तन केलें, तें केवळ, तुमच्या प्रेमाच्या आणि शिफारशीच्या जोरावर, ह्या लोकनियुक्त संस्थेच्या अंतरंगांतील कारभार पाहण्याकरितांच केलें. कपिलाबाई, मी काळसर्प नाहीं, आणि तुम्हीही नागिणीचें स्वरूप टाकून द्या. ज्या बिचाऱ्यानें तुमच्याकरितां आपल्या सर्वस्वावर पाणी सोडून तुम्हांला जगांत योग्यतेस आणलें, तुमच्यावर सर्व विश्वास टाकला, त्यालाच तुमच्या खऱ्या खऱ्या प्रेमाचा आहेर करा. त्याच्या कुबेरासारख्या संपत्तीचा, त्याला नीट उपदेश करून, सदुपयोग करा; आणि तुमच्या प्रेमाचें रूपांतर करून या क्षणापासून मला आपला बंधु समजा. हे पहा! सरदार इकडे आलेच!

कपिला:—(त्याच्या पायां पडते.) पांडोबा!

धेनुवल्लभः—मी स्वतः पाकिटांत घालून सही करून आलों! तुला त्याची काळजी नको! मी खात्रीनें निवडून आलों. जा तूं तावडतोब! त्यांना हाक मारून, अत्तरगुलाब वांटायला घ्या! अहो पोलीस ऑफिसर!

पोलीस ऑफिसरः—चूप बसा! (पुडकें फाडून काढतो) कोण आहे रे, ह्यांना कैद करा! (पोलीस कैद करतात.) कायहो पोलिंग ऑफिसर, जानेवारी फेब्रुवारी १९२५ सालांत हीं दहा माणसें मेलेलीं आहेत, त्यांचें व्होटिंग झालेलें आहे कीं काय तें पहा! कायरे बेशरम! ह्या नोटा कुणीं दिल्या! बोल लवकर! नाहींतर पाठच फोडतों!

महारः—ह्या सुइणीनें दिल्या! पिऱ्याच्या नांवानें सही करून कागद घालायला लावला त्यांनीं!

पोलीस ऑफिसरः—आणखी किती असामी आहेत! कायहो दहा असामींचें व्होटिंग झालें आहे का?

महारः—चारजण आहेत! चला दाखवितों! मी कशाला खोटें बोलूं?

पोलिंग ऑफिसरः—सुपरिंटेंडंटसाहेब, या दहांपैकीं आठ असामींचीं मतें पडलीं आहेत.

गट्टुलालः—अरे भाई जाणादो! दोनसों तीनसों तुमभी वांट लेणा! जाणादो! ए तो खुल्लो शवदो है!

पोलीस ऑफिसरः—पोलीस, ह्याला बेडी घाल! हें तुमचें वारंट! तेवढा दरवडयांतून चोरीचा माल मिळवलेला बऱ्या बोलानें काढा; नाहींतर बच्याराम आत्तां तिन्ही शेंडया उपटून हातांत देईन! पोलिंग ऑफिसर, सर्व पेट्या पुन्हा मोहोरबंद करून सरकारांत रवाना करा! हें इलेक्शन रद्द झाल्याचा हा सरकारी हुकूम जाहीर करा!

गट्टुलालः—अरे मारा बाप! अभितो मरिगयो! विलक्षणमें १० हजीयारको ठार हुइ गयो! और वारंटमें जेलखाना सात बरस जाईयो! अरे मरीगयो!

कोकिलाः—अहो फौजदार, मला सोडवा हो! तुमच्या पाया पडतें!

पोलीस ऑफिसरः—चूप बदमाश! दुसऱ्यांच्याइकडे बाळंतपणांत कशा लोकांच्या गळ्याला फास लावतां, उन्मत्तपणानें झिडकारतां,

मला ठाऊक आहे! आतां तुमच्या ह्या खटल्याचें बाळंतपण माझ्याकडे आहे! भोगा आतां केल्या कर्मांचीं फळें!

कपिला:--(माळ घेऊन येते व चकित होते) अगबाई, हें काय अहो, यांना सोडा हो! मी पदर पसरतें! हे निरापराधी आहेत, यांना सोडवा हो! मला येवढी भीक घाला!

धेनुवल्लभ:--हें माझें नशीब! ही माझी साडेसाती! परमेश्वरा! सर्वस्वी नागवलों! मूर्खासारखा ह्या बाह्यात्कारी दंभाला लालचावलों! ह्या स्वार्थसाधू हरामखोरांच्या नादानें पदव्या, कीर्ति व डामडौलाच्या भरीस पडून लोककल्याणाच्या पवित्र कामाचा आंव घातला! आम्हांला नुसता ठाकठिकीनें घरचा संसार करतां येईना; ते बेशरमपणानें, स्वार्थाच्या बुद्धीनें, बडेजावीच्या लालचीने, नानाप्रकारच्या पांघरुणांखालीं दडून, लोककल्याणाचे आम्ही बहुरूपी, गांवांच्या संसाराकडे धांवलों!

पोलीस ऑफिसर:--चला लवकर! गरीब विचारा ह्या कावेबाज लोकांच्या नादानें बुडाला!

धेनुवल्लभ:--लोकहो हंसूं नका! माझी कींव करा! मी यांत स्वार्थ साधण्याच्या नादानें पडलों नाहीं, उलट सर्वस्वी बुडालों आहें!

[illegible]डोबा:--तुम्ही कशाला लोकांच्या गयावया येतां? सज्जनहो!

तुम्हांला अत्यंत नम्रपणाने विनंति करून विचारतों कीं, अहो, कुणाला? ९॥ वाजल्यापासून २॥ वाजेपर्यंत ५ तास हा पचवीस फूट लांबाचा आणि वीस फूट उंचीचा बिलोरी आरसा तुम्हां आबालवृद्धांच्या पुढें धरला होता, हें नाहीं का उमगले तुम्हांला? कुणाला हंसतां? तुमचे तुम्हांलाच? या ठिकाणीं ब्राह्मण, शूद्र, मुसलमान, पार्शी, धेड, बेरड, वगैरे जातवार राखीव जागा पाहिजेत कशाला? खरोखर विद्वान्, अनुभवी आणि लोककल्याणाची कळकळ बाळगणारा जो निःस्वार्थी असेल, त्याचेंच इथें काम आहे! राखीव जागा आणि मापीव तोबरे कशाला हवेत! सामर्थ्य, शक्ति आणि सत्ता, हीं निरंतर ज्ञानाच्याच स्वाधीन ठेवलीं पाहिजेत! सत्याच्या हातून-ज्ञानाच्या हातून-जेव्हां सत्ता सामर्थ्य शक्ति, हे असे निर्बुद्ध अडाणी, अक्षरशत्रु ठोंबे हिसकावून आपणा[illegible] घेऊं लागतात तेव्हां तीं तीं शहरें, ते ते प्रांत, ते ते देश धुळीस मिळत[illegible]

कथाही रहात नाहींत. जोंपर्यंत तुम्ही आपआपल्या सदसद्विवेकबुद्धीशीं युद्ध पुकारलें आहे, व्यवहारश ! तारतम्याशीं वैर करून, स्वार्थसाधू बहुरूप्यांच्या लोभाला, स्तुतीला, मोहाला, भिडेला पडून तुमच्यांतील निवडक कपिला-धेनुवल्लभ तुमच्या गांवच्या संसारांत निवडून पाठवितां आहांत तोंपर्यंत तुमच्या स्थानिक स्वराज्याचा गाडा असाच माळरानांतून सैरावैरां खडपडत पळून मोडायचा! हंसू नका! या गोष्टीची सर्वत्रांना खंत वाटली पाहिजे! किळस वाटली पाहिजे!

पोलीस ऑफिसरः—चलो पोलीस, सबकू निकालो.

पांडोबाः—अहो, थांबा. आलांत कां आपल्या दंडुकेशाहीच्या जोरांत? हा आरसा आहे! तेव्हां आरसाच बंद करूं म्हणजे झालं.

धेनुवल्लभः—बरें तर, आपल्या नाटककर्त्यांच्या लहरीप्रमाणें सर्व उभे राहून परमेश्वराची करुणा भाकूं! नंतर या रंगभूमीच्या आरशाला गवसणी घालूं! [सर्वजण ओळीनें उभे राहून कोरस म्हणतात.]

कोरस

पारतंत्र्य-पंकांतूनि देश सोडवावा । हिंददेश
माझा जीवप्राण माझा ॥ ध्रु०॥ ज्ञानदीप
उजळोनि मार्ग दाखवावा। सत्य, प्रेम, ऐक्य,
यांत लोक लोभवावा ॥१॥

समाप्त